NEW ERA
PUBLISHING HOUSE

आशय-विषयांनी समृध्द पुस्तकं!

मराठी साहित्यविश्वात नवनिर्मिती आणि परिवर्तनाची बिजे रोवण्याचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून २०१७ मध्ये उदयास आलेली प्रकाशन संस्था म्हणजे **न्यू ईरा पब्लिशिंग हाऊस!**

पदार्पणाच्या केवळ चारच वर्षांत मराठी साहित्यक्षेत्रात स्वतःचा एक वेगळा ठसा उमटवण्यात यशस्वी ठरली आहे.


आजवर विविध धाटणीतल्या अनेक दर्जेदार साहित्यकृती प्रकाशित करून महाराष्ट्रातील नव्या दमाच्या लेखकांना प्रकाशन संस्थेनं हक्काचं व्यासपीठ उपलब्ध करून दिलं आहे.

भविष्यातही, केवळ जास्तीत जास्त गुणवत्ता पूर्ण साहित्य प्रकाशित करून मराठी साहित्याला जागतिक पातळीवर सिद्ध करण्याचा मानस ठेवून 'न्यू इरा पब्लिशिंग हाऊस' मार्गक्रमण करत राहील.


NEW ERA
PUBLISHING HOUSE




# ऐतिहासिक पुस्तके




४५०/-





४५०/-




४००/-





३५०/-





४५०/-



३२०/-





४००/-



३००/-




३००/-





३००/-


# कविता संग्रह





३००/-




२५०/-





२५०/-





२००/-





२००/-




२००/-





२५०/-





३५०/-




२५०/-




३००/-




मराठी कादंबरी

# रावण राजा राक्षसांचा

लेखक : शरद तांदळे


**४३२ पाने । ४५० रुपये**

एका छोट्याशा जिज्ञासेतून सुरू झालेला अभ्यास आणि त्या अभ्यासातून निर्माण झालेली एक उत्कृष्ट कलाकृती म्हणजे ही कादंबरी!

पिढ्यानपिढ्या खलनायक म्हणून रंगवल्या गेलेल्या रावणाला तो होता तसा मांडण्याचा विचार वाचकांनी अक्षरशः डोक्यावर घेतला. रावणाची आसमंत भेदणारी महत्त्वाकांक्षा, प्रबळ इच्छाशक्ती, दृढ आत्मविश्वास, धैर्य, सामर्थ्य, न्याय नीतिमत्ता आदी गुणांनी संपन्न समुच्चयाचे संचित बरोबर घेऊन स्व-अस्तित्व सिद्ध करून बुद्धीच्या जोरावर एल्गार करत स्वतःचं साम्राज्य उभं केलेलं कर्तृत्व अगदी प्रभावीपणे मांडले आहे.

हजारो वर्षांपासून अनुत्तरीत असलेल्या रावणाच्या वैयक्तिक आयुष्याचा, त्याच्याअंगभूत व्यक्तिमत्त्वाचा धांडोळा कादंबरीत घेतला असून रोमहर्षक प्रसंगांनी आणि चित्तथरारक कर्तृत्वानं भारलेलं रावणाचं आयुष्य लेखकाने अप्रतिम पद्धतीने मांडलेलं आहे.

जवळपास सर्व संदर्भग्रंथांचा अभ्यास करून एक अप्रतिम अशी साहित्यकृती आहे. गेली तीन वर्षे मराठी साहित्यविश्वात चर्चिली जात असलेली ही कादंबरी एक मैलाचा दगड ठरली आहे.




English Novel

# Ravan The King Of Rakshasas

## Writer : Sharad Tandale

**430 Pages I 450 Rs**

Born unknown to the true self losing my identity to the cruelty of the Devas, I rose out of the ashes with an nceasable spirit and unstoppable tempest within me.

I made my own paths expanded my own horizons and raised my own empire with nothing but ambition, determination and the gift of intelligence.You have burned me for a thousand years year over year and I am still alive.


You have never understood me and as they say it is easier to hate what you do not understand. I became the king of an empire that was defeated and I taught it how to win.

I did not inherit the crown like some other kings from the comfortable laps of their fathers. I have lived as a spiteful myth in your hearts, but have you ever bothered to look inside me?

Have you ever bothered to know who I really was? I pity you, who burn me every year in your ignorance. You say many things about me but many more have been hidden...

Listen to me if you have the courage.. Let me tell you the story of myself..

Ravana the king of the Rakshasas!




हिंदी उपन्यास

## रावण राजा राक्षसों का

लेखक : शरद तांदळे


**४३४ पृष्ठों । ४५० रुपये**

छोटी-सी जिज्ञासा से शुरू हुआ अध्ययन और उस अध्ययन से निर्माण हुई एक उत्कृष्ट कलाकृति यानी ‘रावण: राजा राक्षसों का’ यह उपन्यास!

दर्शन, व्यापार, राज्यशास्त्र, आयुर्वेद जैसे कई विषयों में पांडित्य अर्जित करने पर भी खलनायक करार दिए गए रावण की निरंतर उपेक्षा ही की गई।

हजारों वर्षों से अनुत्तरित रावण के व्यक्तिगत जीवन, उसकी अंगभूत क्षमताओं का लेखा-जोखा शरद तांदळे ने प्रस्तुत उपन्यास में लिया है। रोमहर्षक प्रसंगों और विस्मयकारी कर्तृत्व से भारित रावण का जीवन लेखक ने अप्रतिम रूप से प्रस्तुत किया है।

विगत तीन वर्षों से मराठी साहित्य विश्व में चर्चित यह उपन्यास मील का पत्थर साबित हुआ है।




Kannada Novel

# ರಾವಣ ರಾಕ್ಷಸರ ರಾಜ

ಬರಹಗಾರ : ಶರದ್ ತಾಂದಳೆ

472 ಪುಟಗಳು | ₹ 450

ನನನ್ ನಿಜವಾದ ಅಸಿತ್ತವ್ದ ಅರಿವಿಲಲ್ದೆ, ದೇವತೆಗಳ ಕೂರ್ರತೆಯಿಂದಾಗಿ ನನನ್ ಗುರುತನುನ್ ಕಳೆದುಕೊಂಡ ನಂತರ, ನನೊನ್ಳಗಿನ ಅದಮಯ್ ಆತಮ್ವಿಶಾವ್ಸ ಮತುತ್ ತಡೆಯಲಾಗದ ಚಂಡಮಾರುತದೊಂದಿಗೆ ನಾನು ಬೂದಿಯಿಂದ ಮತೆತ್ ಎದುದ್ ಬಂದೆ. ನಾನು ನನನ್ದೇ ಆದ ಮಾರ್ಗಗಳನುನ್ ನಿರ್ಮಿಸಿಕೊಂಡೆ, ನನನ್ ಕಷ್ಿತಿಜವನುನ್ ವಿಸತ್ರಿಸಿದೆ ಮತುತ್ ಕೇವಲ ಮಹತಾವ್ಕಾಂಕಷ್ೆ, ದೃಢಸಂಕಲಪ್ ಮತುತ್ ಬುದಿದ್ವಂತಿಕೆಯ ಬಲದಿಂದ ನನನ್ದೇ ಆದ ಸಾಮಾರ್ಜಯ್ವನುನ್ ಕಟಿಟ್ದೆ.

ನೀವು ನನನ್ನುನ್ ಸಾವಿರಾರು ವರ್ಷಗಳಿಂದ, ವರ್ಷಾನುಗಟಟ್ಲೆ ಸುಡುತತ್ಲೇ ಬಂದಿದಿದ್ೕರಿ, ಆದರೂ ನಾನು ಇಂದಿಗೂ ಜೀವಂತವಾಗಿದೆದ್ೕನೆ. ನಿಮಗೆ ನಾನು ಎಂದಿಗೂ ಅರ್ಥವಾಗಲೇ ಇಲಲ್: ಮತುತ್ ಹೇಳುತಾತ್ರಲಲ್ - ಯಾವುದು ನಮಗೆ ಅರ್ಥವಾಗುವುದಿಲಲ್ವೋ ಅದನುನ್ ದೆವ್ೕಷಿಸುವುದು ಸುಲಭ!

ಸೋತು ಹೋಗಿದದ್ ಸಾಮಾರ್ಜಯ್ಕೆಕ್ ನಾನು ರಾಜನಾದೆ ಮತುತ್ ಅದಕೆಕ್ ಹೇಗೆ ಗೆಲಲ್ಬೇಕೆಂದು ಕಲಿಸಿಕೊಟೆಟ್. ಉಳಿದ ರಾಜರಂತೆ ನಾನು ನನನ್ ತಂದೆಯ ಮಡಿಲಲಿಲ್ ಕುಳಿತು ಈ ಕಿರೀಟವನುನ್ ಪರಂಪರೆಯಾಗಿ ಪಡೆದವನಲಲ್. ನಿಮಮ್ ಹೃದಯಗಳಲಿಲ್ ನಾನು ದೆವ್ೕಷದ ಪುರಾಣವಾಗಿ ಬದುಕಿದೆದ್ೕನೆ, ಆದರೆ ನನನ್ ಒಳಗಿನ ಸತಯ್ವನನ್ರಿಯಲು ನೀವು ಎಂದಾದರೂ ಪರ್ಯತಿನ್ಸಿದಿದ್ೕರಾ? ನಾನು ನಿಜವಾಗಿಯೂ ಯಾರೆಂದು ನೋಡುವ ತಲೆಬಿಸಿ ನಿಮಗಿದೆಯೇ? ನಿಮಮ್ ಅಜಞ್ಾನದಿಂದ ಪರ್ತಿ ವರ್ಷ ನನನ್ನುನ್ ಸುಡುವ ನಿಮಮ್ ಬಗೆಗ್ ನನಗೆ ಕರುಣೆ ಎನಿಸುತತ್ದೆ.

ನನನ್ ಬಗೆಗ್ ನೀವು ಸಾಕಷುಟ್ ಹೇಳುತಿತ್ೕರಿ, ಆದರೆ ಇನೂನ್ ಹೆಚಿಚ್ನ ವಿಷಯಗಳನುನ್ ಮುಚಿಚ್ಡಲಾಗಿದೆ. ನಿಮಗೆಧೈರ್ಯವಿದದ್ರೆ ನನನ್ ಮಾತನುನ್ ಕೇಳಿ...

ನನನ್ ಕಥೆಯನುನ್ ನಾನೇ ಹೇಳುತೆತ್ೕನೆ ಕೇಳಿ.. ರಾವಣ: ರಾಕಷ್ಸರ ರಾಜ!




मराठी पुस्तक

## द आंत्रप्रेन्युअर


लेखक : शरद तांदळे

**१८४ पाने । ३०० रुपये**

प्रिन्स चार्ल्स यांच्या हस्ते २०१३ मध्ये 'द यंग आंत्रप्रेन्युअर' हा जागतिक दर्जाचा पुरस्कार मिळाल्यानंतर शरद तांदळे महाराष्ट्रातील नवउद्योजकांच्या गळ्यातील ताईत झाले. खरंतर त्यांची सुरुवात शून्यातून झाली होती, हे मोजक्या मंडळींनाच माहीत होतं. त्यातल्याच काहींनी आजवरचा प्रवास पुस्तकरूपात मांडण्याचा आग्रह केला.

आपला प्रवास जर इतरांसाठी प्रेरणादायी ठरू शकणार असेल तर आपण तो नक्कीच मांडला पाहिजे असा विचार करून साकार झाले, शरद तांदळे यांचे 'द आंत्रप्रेन्युअर' हे पुस्तक!

मराठी तरुणांना कुठलेही पोकळ स्वप्न न दाखवता उद्योगविश्वाची ओळख करून देण्यात शरद तांदळे यशस्वी झाले आहेत. स्वप्नांना वास्तवाशी जोडून, स्वतःच्या क्षमता आणि मर्यादा ओळखून स्वतःला घडवणं म्हणजेच यशस्वी आयुष्याचे गमक शरद तांदळे यांनी तरुणांना या पुस्तकामार्फत दिले आहे.




English Book

# The Entrepreneur

## Writer : Sharad Tandale

**188 Pages I 250 Rs**

The Entrepreneur is a book by Sharad Tandale, A Pune - based businessman and author.

The book has won hearts of Marathi readers And now it's available for the world wide English readers.

His honesty of reflection of his desires, aspirations and the decisions he took, the way he failed, the mistakes he made, Makes this book connect with you on a personal level.

Everyone will tell you what success looks like, but the One who means well for you, will tell you what it costs.




हिंदी किताब

## आंत्रप्रेन्युअर

लेखक : शरद तांदळे

**१९२ पाने । २५० रुपये**

“आंत्रप्रेन्यूअर” पुस्तक में लेखक शरद तांदळे सर ने मराठी युवाओं को बिना कोई कोरे सपने दिखाए बिजनेस की दुनिया से परिचित कराया है। शरद तांदळे सर ने शून्य से शुरू हुई अपनी यात्रा को लिखते हुए महाराष्ट्र के सभी मध्यमवर्गीय युवाओं की यात्रा को लिखा है।

शरद तांदळे सर ने इस पुस्तक के माध्यम से युवाओं को बताया है कि सिर्फ उद्यमी बनने का सपना देखना नहीं, बल्कि उन सपनों को हकीकत से जोड़ना और अपनी क्षमताओं और सीमाओं को पहचानना ही सफल जीवन का सूत्र है।




मराठी पुस्तक

# नरकातला स्वर्ग

लेखक : संजय राऊत

**२४० पाने । ३५० रुपये**

मिट्ट काळोखाची अखेर नजरेला सवय होतेच. समाजाला आणि माणसांनाही. म्हणून कोणालाही मिट्ट काळोखाची भीती वाटणं काही कमी होत नाही. ज्या काळोखाची पुढे सवय होते, त्या काळोखाला अगोदरच आव्हान देऊन त्यात उडी मारणारी माणसं फार कमी असतात. मुळात ती माणसं तशीच जन्मत असतात की घडत जातात, हाही एक विवाद्य विषय आहे.

संजय राऊत हा असाच एक माणूस. २०१४ साली भारतात फॅसिस्ट काळोखाची छाया पसरू लागली. २०१६ च्या मनमानी नोटबंदीने तो काळोख देशभर पसरवला, अधोरेखित केला. त्यानंतर भाजप संघप्रणीत राजवटीचे स्वमर्जीने स्लीपर सेल बनलेल्या अस्सल भारतीय गेस्टापो एजन्सीज, आयटी, ईडी, सीबीआय, एनएसए आणि एनसीबी यांनी सत्तापक्षाच्या राजकीय विरोधातल्या सर्व व्यक्ती, संस्था आणि राजकीय पक्ष यांना लक्ष्य बनवले. देशभर खोट्या आरोपपत्रांद्वारे विरोधातल्या व्यक्ती, शक्ती, उद्योगपती आणि पक्ष यांच्यावर लाखो पानांची आरोपपत्रं लिहिली गेली. शेकडो निरपराध मानवतावादी पत्रकार, राजकीय नेते, उद्योजक आणि मोदीविरोधक तुरुंगात डांबले गेले. आजही डांबले जात आहेत.

त्यामधला एक सर्वात डोळस पत्रकार आणि खासदार म्हणजे संजय राऊत. अनेक आमिषं, अनेक धमक्या आणि गद्दारीचे अनेक मोह टाळून त्याने ईडीच्या तुरुंगात उडी घेतली. आपण निरपराध असताना हा तुरुंगाचा काळोख त्याने स्वीकारला. त्या काळोखात हळूहळू त्याला सभोवतालचा तुरुंग आणि त्या तुरुंगाबाहेरचा तुरुंग बनलेला देश दिसू लागला. त्याचंच हे मर्मभेदक चित्रण – 'नरकातला स्वर्ग.'




# नरक में स्वर्ग


लेखक : संजय राऊत

**२७२ पाने । ४०० रुपये**

संजय राऊत मेरे दोस्त हैं, लेकिन उससे पहले वे एक बेख़ौफ़ आवाज़ हैं। ऐसे सांसद आज उँगलियों पर गिने जा सकते हैं, जो सत्ता से आँख मिलाकर सवाल पूछने की हिम्मत रखते हैं। जब बोलना जोखिम बन जाए, तब चुप रहना सबसे सस्ता और सुरक्षित सौदा होता है। राऊत ने यह सौदा कभी नहीं किया।

उन्होंने डर के मौसम में भी सच बोला, दबाव के दौर में भी कलम नहीं रोकी। संसद हो या सड़क, जेल हो या मीडिया, उनकी आवाज़ कभी गिरवी नहीं पड़ी। यह किताब एक ऐसे इंसान की कहानी है, जो झुका नहीं, टूटा नहीं, और जिसने लोकतंत्र को ख़ामोश नहीं होने दिया। आज जब राजनीति सुविधा, सौदेबाज़ी और डर का दूसरा नाम बनती जा रही है, संजय राऊत असुविधा बनकर खड़े रहे। वे सत्ता के लिए उपयोगी नहीं, इसलिए सत्ता को चुभते हैं। उन्हें चुप कराने की हर कोशिश दरअसल उनकी बात की सच्चाई का सबूत है। वे तालियाँ बटोरने वाले नेता नहीं हैं, वे सवाल उठाने वाले नागरिक हैं। उन्हें मालूम है कि जेलें जिस्म को कैद कर सकती हैं, विचारों को नहीं। इसलिए हर गिरफ्तारी, हर हमला और हर धमकी उनके शब्दों को और तेज़ करती गई।

यह किताब सत्ता के पक्ष में नहीं, सत्ता के सामने खड़ी एक आवाज़ का बयान है। यह उन लोगों के लिए है, जो मानते हैं कि लोकतंत्र बिना विरोध के एक खोखला तमाशा है। और यह मेरे उस दोस्त की कहानी है, जो डर के इस दौर में भी खड़ा रहा। अकेला सही, लेकिन झुका हुआ नहीं। इतिहास गवाह है, डर के दौर बीत जाते हैं, लेकिन प्रतिरोध की आवाजें दर्ज हो जाती हैं। संजय राऊत उन्हीं दर्ज आवाज़ों में से एक हैं।




## Unlikely Paradise


Writer : Sanjay Raut

**254 Pages I 400 Rs**

The biggest mistake someone can make is to dare to put a gun on the head of Sanjay Raut. Because he's a person who will not only encourage you to pull the trigger but will also mock you if you fail to do it. The Modi government thought they could cage a tiger by putting Sanjay Raut in jail. What they did not realize is a jail cannot contain or extinguish the fire that burns in Raut's heart.

A soldier of Hinduhrudaysamrat Sh Balasaheb Thackeray, Sanjay Raut's life has been one of battle be it on the streets or through his fiery writings in Saamna. Raut is a rare breed of a journalist who is a mass leader. A fellow victim of the government's vendetta politics, Sanjay Raut managed to find Heaven even within the Hell called jail. He not only kept his head high but also became a source of solace for fellow political prisoners who were incarcerated with him. This is not just a book. This is the story of a firebrand who went to jail and then had the courage to keep fighting harder. Sanjay Raut's life has been a mirror of his courage.

This book is a testament to that fighting spirit, that ability to smile in the midst of adversity, and the zest to keep fighting against all odds for his beliefs.




मराठी कादंबरी

# मुकद्दर

लेखक : स्वप्निल कोलते

**२१२ पाने । ३५० रुपये**

छत्रपती शिवाजी महाराजांनी छेडलेली जंग ही आशिया खंडातील सगळ्यात सामर्थ्यवान सुलतानाविरुद्ध होती. तो सुलतान क्रूर होता. कपटी होता. धूर्त होता. हुशार होता. द्रष्टा होता. भयंकर महत्त्वाकांक्षी, थंड रक्ताचा आणि धोरणी मेंदूचा होता. लोभी असूनही फकिराप्रमाणे राहायचा.

धर्मवेडा किंवा धर्मांध नव्हता; पण धार्मिक वर्तन करून लोकांना भावनिक करण्याचं अद्भुत कसब त्याच्याकडे होतं. स्वतःला नियती म्हणजेच मुकद्दर समजणारा हा सुलतान अखेर स्वतःचे मुकद्दर लिहू शकला नाही.

दख्खनच्या पहाडांनीच त्याचं मुक़द्दर लिहिलं. महाराजांच्या निधनानंतरसुद्धा तब्बल २६ वर्षे मराठे तळहातावर शीर घेऊन ह्या क्रूर सुलतानाशी लढले. त्या पराक्रमाची याद म्हणजेच औरंगजेबाचे हे चरित्र!

लेखक स्वप्नील कोलते यांची ही पहिलीच कादंबरी होती. त्यांच्या अपघाती निधनामुळे महाराष्ट्र एका उमद्या लेखकाला मुकला आहे.




मराठी ऐतिहासिक संदर्भग्रंथ

## मऱ्हाटा पातशाह

लेखक : केतन पुरी

**१५२ पाने । ३२० रुपये**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सर्व समकालीन चित्रांचा, त्यांच्या राजयोगी व्यक्तिमत्त्वाचा ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे घेतलेला मागोवा म्हणजेच 'मऱ्हाटा पातशाह'

गेल्या ६०-७० वर्षांपासून महाराष्ट्रात सर्वमान्य असलेल्या मतांना केतन पुरी यांनी संदर्भांनिशी छेद दिला आहे. परदेशी चित्रकारांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काढलेल्या चित्रांचा रंजक प्रवास, त्यासाठी त्यांनी लढवलेली शक्कल या सगळ्यात नजरेसमोर चित्रांचा इतिहास उभा राहतो, त्याचप्रमाणे त्या काळातील भारतीय समाजजीवनाचे काही पैलूही या पुस्तकात वाचायला मिळतात.

संशोधनाच्या चौकटीत बसवून कॉपर एनग्रेव्हिंग, हिंदू ख्रिश्चन की मुस्लिम ख्रिश्चन, घूसू मुसलमानांच्या जमा बांधण्याच्या पद्धती यासारख्या अनेक तांत्रिक, रंजक आणि अपरिचित बाबी वाचायच्या असतील तर 'मऱ्हाटा पातशाह' वाचावेच लागेल.




मराठी कादंबरी

## काहून

लेखक : अभिषेक कुंभार

**२४३ पाने । ३०० रुपये**


सिंहगड पायथ्याच्या कल्याणपासून ते अटकेपार असलेल्या काहूनपर्यंतचा प्रवास म्हणजे काहून.

मराठ्यांनी अफगाणिस्तानच्या सीमारेषेवर जाऊन केलेला पराक्रम म्हणजे काहून. जी लढाई फक्त आणि फक्त मराठेच करू शकतात ती लढाई म्हणजेच काहून. काहूनची लढाई ही तिथल्या स्थानिक लुटारू टोळीवाल्यांबरोबर असली तरी त्यापेक्षा तिथल्या वाळवंटी वातावरणाबरोबरसुद्धा कशी आहे, हे लेखकानं अतिशय अभ्यासपूर्वक सांगितलं आहे. काहून वाचताना बऱ्याचवेळा प्रश्न पडतो की मुघल सैन्य सपाटीचा प्रदेश सोडून सह्याद्रीच्या डोंगरदाऱ्यांमध्ये येत असतील तेव्हा त्यांचे काय हाल होत असतील?

उंबरखिंडीत शिवाजी महाराजांनी खानाची कोंडी करून विजय मिळवला. मुघल सैन्याची प्रचंड प्रमाणात जीवितहानी त्यावेळी झाली होती. मुघलांच्या सैन्याची बाजू नेमकी काय असेल?

अगदी असाच प्रसंग आपल्यावर ओढवल्यावर आपली मानसिकता काय असेल?

वाचता वाचता असे प्रश्न मनाच्या तळात उपस्थित करून डोळ्यात टचकन पाणी आणणारं हे अप्रतिम पुस्तक!




मराठी पुस्तक

# फिरस्ते

लेखक : अभिषेक कुंभार

**१८४ पाने । २५० रुपये**


लेखक अभिषेक कुंभार यांनी दुर्गम भागात केलेल्या सफरीवर आधारित ही प्रवासी कादंबरी.

प्रसाद, समीर, सूरज, भूषण, पंकज, योगेश, युवराज आणि अभिषेक हे आठ तरुण लडाखला जायचं नक्की करतात. वाटेत अनेक अडचणी येतात.

सह्याद्रीत हिंडलेल्या या मुलांना हिमालयाचं सौंदर्य अनुभवायला मिळतं. तिथली भाषा, दऱ्याखोऱ्यातले अवघड रस्ते, वेगवेगळे पदार्थ यांची ओळख होते. सर्वात महत्त्वाचं तिथली माणसं, त्यांची संस्कृतीही समजते.

तरुणांच्या बेधडक आयुष्यासारखीच याही लेखनाची भाषा बेधडक आहे. या भाषेतून तरुण मनांमधली खळबळ आणि मनोव्यापार जसाच्या तसा समोर येतो.

हे प्रवासवर्णन वाचताना तुम्हाला प्रवासातील एका गाडीच्या मागच्या सीटवर बसल्याचा अनुभव नक्की येईल.




कवितासंग्रह

# उनाड

लेखक : स्वप्नील कोलते


**२१२ पाने । २०० रुपये**

तुम्हाला हे माहीत आहे की नाहीच?

'उनाड'च्या जवळ-जवळ सगळ्याच कवितांचा संग्रह नवीन रूपात आलाय. २०० हून अधिक पानांच्या या संग्रहात अर्थातच कविता वाढल्या आहेत, आणि सोबत पुस्तकाचा सादरीकरण दर्जाही वाढला आहे.

उनाडच्या कविता तुम्हाला माहीतच आहे, प्रेम आणि विरह यावरचा दर्जेदार इलाज म्हणजे उनाड!

*फांद्या तुटतानाही घरटी जपतो,*
*असे एक मी झाड आहे*
*माझ्या भरारीवर जाऊ नकोस सये,*
*मी खरंच उनाड आहे*




मराठी कादंबरी

## ‘रायरी’ गोष्ट शिवभक्तांची

लेखक : विशाल गरड


**२४३ पाने । ३०० रुपये**

शासन दरबारी होणारी शेतकऱ्यांची फरफट, गावातील युवकांना निवडणुकीसाठी दाखवले जाणारे आमिष, महापुरुषांच्या होणाऱ्या विटंबना, शिवरायांच्या विचारांपासून दूर चाललेले मावळे आणि त्याच विचारांचे स्फुल्लिंग पेटवून पुन्हा चांगल्या वळणाला लागलेले मावळे या सर्व गोष्टी कादंबरीतील कथानकाचा भाग आहेत.

एकविसाव्या शतकातील युवक नेमका कशाच्या आहारी जातोय? महापुरुषांबद्दल तो काय विचार करतोय? गाव पातळीवरील राजकारणात त्याचे अस्तित्व काय आहे? महिलांवरील अत्याचार कसे पाठीशी घातले जातात? युवाशक्तीचा वापर कोण व कसा करून घेतोय? महापुरुषांच्या अस्मितांचा वापर स्वार्थासाठी कसा होतोय?

शेतकऱ्यांना राजा मानणाऱ्या समाजात सध्या त्याचे स्थान कुठे आहे? सर्वसामान्य जनतेवर अन्याय का केला जातोय? राजकारण नावाचे शस्त्र रयतेच्या संहारासाठी का संरक्षणासाठी? रयतेला नासवायचे आणि नागवायचे पाप कुणाचे? सामान्य जनतेने ठरवले तर काय होऊ शकतं? काळ बदलण्याचे सामर्थ्य कुणामध्ये आहे?

या सर्व प्रश्नांची उत्तरं म्हणजे ‘रायरी’ आहे.




मराठी कादंबरी

## अग्निपर्व

लेखक : मयुर खोपेकर


**२६८ पाने । २५० रुपये**

अग्निपर्व म्हणजे काय? किल्ले रायगड आणि अग्निपर्व याचा नक्की संबंध तरी काय? अग्निपर्व पुस्तकात आहे तरी काय?

अग्निपर्व म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीने डागलेल्या तोफगोळ्यांमुळे रायगडाने घेतलेला पेट. स्वराज्यवैभवाचे राणीव भोगणाऱ्या रायगडाची ती दुरवस्था. अशा या गडावरील अग्नी तांडवाचे वास्तव म्हणजे 'अग्निपर्व'.

कंपनीच्या पारतंत्र्याला न जुमानता देशातील तरुणांच्या, क्रांतिकारकांच्या आणि समाजसुधारकांच्या मनात स्वातंत्र्याची ठिणगी पेटवणारा रायगड, त्याचे हे 'स्वातंत्र्यपर्व'.

ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात रायगड गेल्यानंतर जळत असलेल्या पण तितक्याच बोलक्या रायगडावर पावलोपावली मिळालेले अनुभव सांगणारी एक रोमांचक कथा. पारतंत्र्यात असताना देखील स्वातंत्र्याची ठिणगी मनात पेटवलेल्या रायगडाच्या 'अग्निपर्व'ची ही कथा.




हिंदी काव्यसंग्रह

## खयाल

लेखक : अभिषेक अवचार


**३०२ पाने । ३०० रुपये**

आयुष्यात आपण अनेक प्रसंग बघत असतो, अनुभवत असतो. काही चांगले तर काही वाईट असतात.

कळत नकळत अशा प्रसंगांना भावना जोडल्या जातात, विचार करण्यास त्या आपल्याला भाग पाडतात. त्या सगळ्यांना धरून लिहिलेला हा शायरींचा हिन्दी काव्य संग्रह.

यात तुम्हाला वेगवेगळ्या एक, दोन, चार ओळींच्या कमालीच्या शायरी वाचायला मिळतील.

*ज़रा इश्क ज़रा दर्द को जिंदा मौत को लिखा हैं,*
*ज़रा आहिस्ता खोलना किताब अंदर दिल रखा है।*




मराठी कादंबरी

# एकलव्य

लेखक : विजय देवडे


**३५० पाने I ३८० रुपये**

महाभारत एकदा वाचायला घेतलं की त्यातील प्रत्येक पात्राबद्दल अजून माहिती मिळवायचा मोह लागतो.

महाभारतात अशी ही काही पात्रे आहेत ते जर युद्धामध्ये असते तर कुरुक्षेत्रावरील युद्धाच चित्र बदलू शकतं होते.

त्यातील एक पात्र म्हणजे निषाध राजा एकलव्य. एकलव्यने गुरू दक्षिणेत अंगठा आपल्या गुरू द्रोणाचार्य यांना दिला, म्हणून आपल्याला सांगण्यात येतेच की एकलव्य त्यागाचं प्रतीक आहे हे सर्वांनाच माहित आहे. आवाजाच्या दिशेने बाण मारून लक्षवेध करणारा एकलव्य. भुकणाऱ्या कुत्र्याच्या तोंडात अशाप्रकारे बाण मारले की त्याचा आवाजही बंद झाला आणि त्याला इजाही झाली नाही इतकं नियंत्रण त्याच्या बाणावर त्यानं मिळवलं होतं. एकलव्य एक बुद्धिमंत हुशार राजा होता, त्यांनीही अनेक युद्ध लढली आहेत. तो एक महान योद्धा होता. असा धनुर्धर महाभारतात एकमेव होता.

'एकलव्य' ही कादंबरी वाचल्यावर तुमच्या माझ्या मनात जवळ असलेला राजा एकलव्य आपल्याला सापडेल.




मराठी पुस्तक


# नेहरू : मिथक अणि सत्य

लेखक : पीयूष बबेले

**४६० पाने । ४५० रुपये**

पं. जवाहरलाल नेहरूंची जीवनकथा ही भारतीय स्वातंत्र्यलढ्याची आणि स्वतंत्र भारताच्या पुनर्निर्माणाची एक विराट गाथा आहे. युगायुगांपासून आलेलं तुटलेपण आणि परकीय गुलामगिरीतून मुक्त झाल्यानंतर भारत ज्या विचारांच्या बळावर आपलं पाऊल घट्ट रोवून उभा राहिला आणि ज्या विचारांमुळे त्याचं स्वातंत्र्य सुनिश्चित झालं, त्याचप्रमाणे त्याच्या आधुनिकतेला आणि विकासाला ठोस मार्ग उपलब्ध करून दिला, ते विचार पं. जवाहरलाल नेहरू यांचे होते. या विचारांवर मानवमुक्तीची वैश्विक परंपरा आणि भारतीय चिंतनाचा सखोल प्रभाव होता. त्यांच्या जीवन-संघर्षानं त्यांच्या विचारांना आकार आला होता, भारताप्रती संपूर्ण समर्पण आणि सच्च्या प्रेमानं त्यांच्या विचारांना शक्ती दिली होती. बघता बघता पं. नेहरूंबद्दल असत्य आणि संभ्रमाचा एक विराट ढीग रचला गेला, ही खरोखरच एक दुर्दैवाची बाब आहे.

नेहरू : मिथक अणि सत्य हे पुस्तक इतिहासाचं विकृतीकरण करणाऱ्या अशा प्रयत्नांविरुद्ध केलेला एक ठोस तथ्यात्मक प्रतिवाद आहे.




मराठी पुस्तक


# द पॉवर ऑफ युअर सबकॉन्शस माइंड

लेखक : डॉ. जोसेफ मर्फी

**२१० पाने । २५० रुपये**

अंतर्मनाच्या अद्भुत शक्तीच्या साहाय्यानं तुम्ही तुमचं शारीरिकच नाही; तर मानसिक आरोग्यदेखील प्राप्त करू शकाल. तुमचा आत्मविश्वास वाढेल, दारिद्र्य, दुःख आणि अपयश हे तुमच्यापासून कोसो दूर पळतील.

तुम्ही फक्त इतकंच करायचं आहे की, जे काही तुमचं ध्येय आहे; तुम्हाला आयुष्यात जे काही मिळवायचं आहे त्या ध्येयाला तुमच्यात रोमरोमांत, तनामनात भिनू द्या. त्यामुळे अंतर्मनाची ताकद तुम्हाला त्या ध्येयाप्रत पोहोचण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद देईल. शुभस्य शीघ्रम्! आजच नव्हे, आत्ताच तुम्ही याला सुरुवात करा. त्या चमत्काराची अनुभूती घ्या. अखंड प्रयत्न करत राहा. प्रयत्न करा, प्रयत्न करा; अगदी तोपर्यंत प्रयत्नशील राहा जोपर्यंत मनातले नकारात्मक, अपयशाचे, नैराश्येचे विचार दूर होऊन तुम्हाला तुमचं यश सकाळच्या स्वच्छ सूर्यप्रकाशाइतकं स्पष्ट दिसत नाही.




मराठी पुस्तक

# थिंक अॅन्ड ग्रो रिच


लेखक : नेपोलियन हिल

**१८७ पाने । २५० रुपये**

सुमारे ५० वर्षांपूर्वी अँड्र्यू कार्नेगी यांनी हे रहस्य माझ्या नजरेस आणलं. या माणसानं त्या रहस्याची बीजं माझ्या मनात रुजवली, तेव्हा मी एक छोटा मुलगा होतो.

मी या रहस्यासाठी २० वर्षं देऊ शकतो का, असं त्यांनी मला विचारलं आणि कार्नेगींच्या सहकार्यानं मी हे रहस्य संपूर्ण जगभर घेऊन जाऊ शकलो. मी त्यांना दिलेला शब्द पूर्ण केला. कार्नेगींच्या या रहस्यानं त्यांचं नशीब घडवलं, त्यांना प्रचंड पैसा मिळवून दिला, ज्या लोकांना पैसा कसा मिळवावा हे शिकण्यासाठी वेळ नव्हता, त्यांच्यासाठी आम्ही केलेले प्रयोग, अनेक स्त्री-पुरुषांच्या अनुभवावरून सांगितलेले धडे हेच या फॉर्म्युल्यामागची शक्ती आहेत.

कार्नेगींचा विश्वास आहे की, त्यांचा हा यशस्वी फॉर्म्युला जर शाळा-कॉलेजमध्ये योग्यरीत्या शिकवला गेला, तर या संपूर्ण शैक्षणिक काळातला निम्मा वेळ आपण नक्कीच वाचवू शकू.




मराठी पुस्तक


# गढीवरून

लेखक : राजा गायकवाड

**२८० पाने । ४०० रुपये**

कृषी-परंपरेतल्या बहुजनांच्या आणि त्यातल्या जराश्या उच्च स्थानावर बसलेल्या किंवा फलाण्या जातीत जन्म घेतल्यामुळे आपण उच्च स्थानावरच आहोत, असं समजून वागणाऱ्या माणसांच्या आत असलेले मानसिक-सामाजिक-सांस्कृतिक आणि राजकीय गंड यांना हात घालणाऱ्या कथा या संग्रहामध्ये बहुसंख्येने आहेत.

आपलं वर्तमान केवढं अशक्त आहे, यापेक्षाही आपला इतिहास केवढा दिव्य होता, हेच सांगण्यात ज्यांना कृतकृत्यता वाटते, किंवा आपण स्वतः किती कर्तृत्वहीन आहोत ही गोष्ट साफ नजरेआड करून आपल्या पणजोबांच्या काळात आपल्या गढीवरून केवढी जबरदस्त सरदारी होती, याच्या खऱ्याखोट्या कथांमध्ये रमून त्या सरदारीचे अवशेष विकून खात राहणं आणि त्यालाच 'खानदानीपण' म्हणत राहणं, यातलं विदारकत्व राजाभाऊ, विनोदाच्या- उपरोधाच्या- उपहासाच्या माध्यमातून दाखवायला लागतात, तेंव्हा ते सामाजिक अंगानेही फार महत्वाचं वाटत राहतं.




मराठी कवितासंग्रह

# ब्लाटेंटिया

## लेखक : बाळासाहेब लबडे


**१४८ पाने । २०० रुपये**

आसक्तीच्या पलीकडे जाणारा अंधार भेदून, फोबिया होत चाललेल्या अस्वस्थ समाजाच्या वाटचालीची मांडणी करणारी ही कविता, आदिम मन ते कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial intelligence) असा लाखो वर्षांचा प्रवास करत आलेल्या भारताच्या मानसिक आणि सामाजिक वास्तवाला कवेत घेण्याचा प्रयत्न करते.

मिथकांचा, प्रथा-परंपरांचा नवा अन्वय लावत जाते. महाकाय असूनही झुरळरुपी बनलेल्या आजच्या विषम व्यवस्थेने अख्खे वर्तमान पोखरून नासवून टाकले आहे.

महासत्ता कितीही प्रबळ झाल्या तरी त्यांना सुखी माणसाचा सदरा सापडत नाही म्हणून त्या सत्ता हतबल होऊन कोसळत आहेत. हा सदरा ज्या 'कॉमन मॅनच्या' अंगात आहे, त्याची नेमकी भाषा कवीला सापडली आहे. त्याच्या या भाषेमुळे तो समग्र व्यवस्थेला भिडू शकला आहे.

त्यासाठी मात्र बाळासाहेब लबडे यांनी 'कॉमन मॅन'चे बोट सोडलेले नाही, ही या कवितेची ताकद आहे.




मराठी पुस्तक

## आजादी सुवर्ण इतिहास स्त्री क्रांतीचा

लेखक : प्रियांका चौधरी

**२२४ पाने । ३०० रुपये**

आजादी सुवर्ण इतिहास स्त्री क्रांतीचा" हा स्वातंत्र्य लढ्यातील स्त्री वीरांगनांचे योगदान तसेच त्यांचा जीवनपट उलगडनारा ग्रंथ रोमांचित करणारा आहे.

भारतीय स्वातंत्र्यात स्त्रियांचे उल्लेखनीय योगदान आहे. प्रत्येक स्त्रीने दिलेला लढा आणि इंग्रजाविरुद्ध कामगिरी ही प्रेरणादायी आहे आणि त्यांचे इतिहासाच्या पानात महत्व पुसता येणार नाही.म्हणूनच प्रियंका चौधरी यांनी या विषयावर पुस्तक लिहिले.

या पुस्तकात तुम्हाला अश्या बेधडक, प्रेरणादायी, हिमतीने कामगिरी करणाऱ्या स्त्रियांची माहिती वाचायला मिळेन.

त्यांच्या योगदानाची महत्व विसरता येऊ नये म्हणूनच हे पुस्तक.




मराठी पुस्तक

## अंगुलीमाल

लेखक : उल्हास निकम

**१९४ पाने । २५० रुपये**

ज्याचे पापकर्म त्यानेच केलेल्या पुण्याने झाकले जाते, तो पुरुष ढगातून मुक्त झालेल्या चंद्रासमान इतरांना प्रकाशित करत असतो.

अंगुलीमाल - इतिहासातील तो क्रूरकर्मा ज्याने शेकडो लोकांच्या हत्या करून त्यांच्या अंगुल्याच्या(करंगळीच्या) माळा बनवून गळ्यात घातल्या. असा निर्दयी, क्रूर, हत्यारा अंगुलीमाल बुद्धांना तरी का चंद्रासारखा प्रकाशमान वाटला असेल ?


हातात खंडा घेऊन प्रतिदिन लोकांची मुंडकी उडवणारा, रक्तपात करणारा अंगुलीमाल बुद्धांच्या एका वचनाने भिक्षुक झाला तरी कसा?

मुळात अंगुलीमाल होता तरी कोण ?

कशासाठी आला?

श्रावस्थीमध्ये कुठून आला ?

अश्या कितीतरी प्रश्नांच्या उत्तरासाठी अंगुलीमालाच्या इतिहासाची केलेली ही उजळणी!




मराठी कादंबरी

# पिचकारी

लेखक : दिपक गायकवाड

**१२८ पाने । २०० रुपये**


पिचकारी ही या कादंबरीची नायिका आहे तर माझ्याकडेही रंगपंचमी खेळण्यासाठी पिचकारी हवी अशी इच्छा बाळगणाऱ्या बारा वर्षाचा गण्या नायक.

पिचकारी मिळवण्यासाठी गण्याचे सर्व मित्र आपल्या आईवडिलांकडे हट्ट करत होते पण गण्याला असा हट्ट करण्याची बिलकुल गरज नव्हती कारण त्याच्याकडे पिचकारीसाठी लागणारे पैसे होते. तेही स्वतः कमावलेले.

आणि जरी ते नसते तरी त्याचे आई वडील हो-नाही करत त्याचा हा हट्ट सहज पुरवनाऱ्यातले होतेच. पण गण्या ज्या क्षणापासून पिचकारी मिळवण्याची इच्छा व्यक्त करतो त्या क्षणापासून त्याचे आयुष्य छोटी छोटी वळणे घेऊ लागते.

त्या वळणांवरून पिचकारीचा पाठलाग करता करता ती पिचकारी गण्याला, त्याच्या कुटुंबाला आणि एकंदरीत त्याच्या संपूर्ण गावालाच एका विचित्र परिस्थितीत नेऊन सोडते.

हे जीवन नक्की कसे जगले पाहिजे हे सांगणारी एक ज्वलंत, वास्तववादी, उत्कंठावर्धक, डोळ्यात अंजन घालणारी कादंबरी.




मराठी कवितासंग्रह

# त्रिकाल


लेखक : फ. मुं. शिंदे

**२६४ पाने । ३०० रुपये**

वाङ्मय हा व्रतस्थांचा व्यवहार असतो. सगळे त्याच वाटेनं निघालेले असतात. माणसानं माणूस समजून घेणं हाच आयुष्याचा इत्यर्थ असतो. त्यातूनच अंतःकरणाला वाचा फुटते, त्या ध्वनीचा शब्द घडवणं हीच निर्मितीची प्रक्रिया, प्रतिज्ञाही असते.

साहित्यातला शब्दरूप उद्गार कोणत्याही दिशेतून येऊ शकतो. तो रस्त्यातून उमटू शकतो, तो शेतातून मुखर होऊ शकतो, तो जंगलातून जागू शकतो, तो कारखान्यातून प्रगट होऊ शकतो, तो अभावातून अवतरू शकतो, तो आनंदातून ओसंडू शकतो, तो पुष्पदलातून दरवळू शकतो, तो दलदलीतून दणाणू शकतो, तो व्यवहारातून व्यंग पाऊ शकतो, तो व्यवस्थेतून विद्रोहानं व्यथांकित होऊ शकतो; नाना वाटांनी, नाना पावलांनी, नाना तऱ्हांनी तो उद्गार स्वतःचे ठसे ठेवत साहित्याची मोहोर बनून जातो.

साहित्य सर्वगामी राहत आलं आहे. प्रत्येक खळाळ खरेपणा घेऊन वाहू लागला की तो तो प्रवाह प्रगल्भ होऊन जातो; त्याचं वेगळेपण, त्याची पृथगात्मकता पुरेशी परिपक्व झालेली असते, प्रौढ झालेली असते!




मराठी पुस्तक

# बॅबिलॉनमधील सर्वांत श्रीमंत माणूस

लेखक : जॉर्ज एस. क्लासन


**१३८ पाने । २५० रुपये**

बॅबिलॉनच्या प्रसिद्ध नीतिकथांचा हा संग्रह बचतीच्या महत्त्वापासून ते श्रीमंत कसं व्हावं हे सांगण्यापर्यंत सगळ्या प्रकारचं कालातीत आर्थिक शहाणपण देतो.

या पुस्तकातून श्रीमंत कसं व्हावं याविषयीच्या अंतर्दृष्टी मिळतातच, शिवाय भाग्याला आपल्याकडे कसं आकर्षित करून घ्यावं तेही सांगितलं जातं. हे संपत्तीच्या पाच नियमांची चर्चाही करतं.

पुस्तक अर्थकारण समजून घेण्यासाठीचं परिपूर्ण मार्गदर्शक पुस्तक. वैयक्तिक संपत्ती मिळवणं आणि ती टिकवणं याविषयीच्या काळाच्या कसोटीवर उतरलेल्या तत्त्वांचं हे ऊर्जाकेंद्र आहे.

बॅबिलॉनमधील सर्वाधिक श्रीमंत माणूस हा वाचकांना पिढ्यान्पिढ्यांपासून स्फूर्ती देत आला आहे. हे सातत्यानं उत्तम खपाचं पुस्तक म्हणून नावाजलं गेलेलं पुस्तक आहे.




मराठी पुस्तक

# आपले भवताल

लेखक : डॉ. नितीन हांडे

**१२८ पाने । २०० रुपये**

गुहेत राहणाऱ्या आदिमानवापासून तर आजच्या स्मार्टफोन वापरणाऱ्या स्मार्ट मानवापर्यंत मानवाने जी प्रगती केली आहे, कारण त्याला वेळोवेळी प्रश्न पडले त्याची त्याने उत्तरे शोधली. पाऊस का पडतो? विजा का चमकतात? प्रश्न पडत गेले आणि उत्तरे देखील सापडत गेली. तर्क, निरीक्षण, प्रयोग, अनुमान आणि प्रचिती या सर्वांचा वापर करत करत त्याने नवीन नवीन शोध लावले. म्हणजेच माणसाचा इतिहास हा प्रश्न पडण्याचा इतिहास आहे. न्यूटनच्या डोक्यावर सफरचंद पडले त्यावेळेस त्याला प्रश्न पडला की ते खालीच का पडले.... या प्रश्नातूनच गुरुत्वार्षण नियम मांडला गेला. चिकित्सा हीच खरी शोधाची जननी आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. प्रश्न विचारण्याची संस्कृती जोपासली पाहिजे. वैज्ञानिक दृष्टिकोन आपण स्वतः समजून घेऊन इतरांना सांगितला पाहिजे. आपले भवताल हा त्यासाठीचा छोटा प्रयत्न आहे. लोकांना प्रश्न पडावे, त्याची त्यांनी उत्तरे शोधावी, एकमेकांत चर्चा करावी, ही अपेक्षा ठेवून हे पुस्तक आपल्या हाती देत आहोत.




मराठी पुस्तक


## अवनी T 1

### लेखक : नवाब शफाअत अली खान

**१६४ पाने । २५० रुपये**

ज्यावेळी अवनीचा बंदोबस्त करण्याची बातमी आली त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्रातून याचा निषेध झाला, सोशल मीडियावर तर याचा प्रचंड प्रमाणात विरोध दर्शवला व संताप ही. कारण, अवणीचा बंदोबस्त म्हणजे तिचा अंत होता. याचे कारणही तसेच होते. कारण एक सामान्य वाघीण ज्यावेळी नरभक्षक होते त्यावेळी तीची दहशत अनेकांच्या जीवावर बेतते, त्यामध्ये मुख्य म्हणजे शेतकरी आणि खेड्यापाड्यात राहणारे सामान्य नागरिक. महाराष्ट्रातील अनेकांप्रमाणे मलाही या बातमीचा प्रचंड संताप आला होता, कारण वाघ हा असा प्राणी/ प्रजाती आहे जिचे रक्षण करणे गरजेचे आहे. अगदी विलुप्त होण्याच्या मार्गावर ही प्रजाती आहे. मग अशावेळी एका वाघिणीला मारणे हे कितपत योग्य आहे? हा प्रश्न मलाही अनेकांप्रमाणे पडला होता. पण त्याच बरोबर नरभक्षक या शब्दाचा अर्थही मला भेडसावत होता. कारण, एका वाघिणीला वाचवण्यासाठी आपण तिचा ज्या भागात वावर आहे त्या भागातील शेकडो लोकांच्या जीवाची जर बाजी लावत असेल तर मग नक्कीच या प्रश्नावर गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

हे पुस्तक वाचल्यावर तुम्हाला सुद्धा तुमच्या अनेक प्रश्नाची उत्तरे मिळतील याची मला खात्री आहे. मग शेवटी प्रश्न जो राहतो तोच की “अवनीचा बंदोबस्त हा तिला मारूनच करणे योग्य होते की अयोग्य?” हे पुस्तक तुम्हाला तुमचे उत्तर मिळवून देण्यास नक्कीच मदत करेल ही अशा व्यक्त करतो.




मराठी पुस्तक

# परिक्रमा माणदेशची

लेखक : दिलीप मोटे

**१३६ पाने । २५० रुपये**

हजारो वर्षापासून माणदेश हा पाण्यापासून वंचित असलेला भूभाग. इथल्या मातीची तृष्णा रामायण महाभारतापासून तशीच राहिली.

इथल्या माणसांच्या सोबतीने वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या खिलार जनावरांनीही दुष्काळाची टोळधाड कायम अंगावर घेतली आहे.

खिलार कालवडीचा प्रवास ही एक सत्यकथा असून माणदेशातून आणलेली खिलार कालवड मराठवाड्याच्या वेगळ्या मातीत, वेगळ्या माणसात, वेगळ्या संस्कृतीत अन् वेगळ्या जनावरात रमली नाही.

ती वेगवेगळ्या कारणांसाठी दावणी बदलत राहीली पण शेवटी तिची परिक्रमा माणदेशी मातीत येऊनच थांबली.

कथेच्या गरजेसाठी स्थळ, वेळ, काळ आणि नाव यांचा एकत्रित मेळ घातला आहे. यामध्ये कुणाच्या भावना दुखावण्याचा हेतू नसून, माणदेशचा संघर्ष दाखवण्याचा प्रयत्न आहे.

कालवडीची गाई होते, माणदेशाला कृष्णेचं पाणी येतं. कळीकाळ जित्रासोबत माणसांचीही परिक्रमा घडवतो. त्या सर्वांसाठी 'परिक्रमा माणदेशची. '




मराठी पुस्तक

# शेअर बाजारात यशस्वी होण्याची गुरुकिल्ली

## लेखक : सुदर्शन खेडकर । विजय देवडे

**२४८ पाने । ३०० रुपये**


गेली अनेक वर्षे आमचा शेअर मार्केटमधला हा सिलसिला सुरू आहे. या अनुभवातून आम्ही जे काही शिकू शकलो, त्याचा लाभ सर्वांना व्हावा, यासाठीच हा पुस्तक प्रपंच.

या पुस्तकामुळे तुम्ही एका रात्रीत श्रीमंत व्हाल, असा दावा आम्ही लेखक म्हणून मुळीच करत नाही; पण यातील तंत्रे समजून घेत शेअर मार्केटमध्ये अधिक सजगपणे ट्रेडिंग कसे करावे आणि त्यातून जास्तीत जास्त नफा कसा कमवावा, यासाठी या पुस्तकाचा तुम्हाला नक्कीच उपयोग होईल.

मुख्य म्हणजे गुंतवणूक करताना योग्य निर्णय घेण्याचा मार्ग हे पुस्तक तुम्हाला नक्की दाखवेल. हे पुस्तक वाचण्याचा निर्णय तुम्ही घेतला आहे, यातच आर्थिक साक्षर होण्याच्या दिशेने तुमचे पहिले पाऊल पडलेले आहे.

डिमॅट अकाउंट उघडण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांपासून ते फंडामेंटल ॲनॅलिसिस, टेक्निकल ॲनॅलिसिस यांचा वापर करून गुंतवणूक कशी करावी इथपर्यंत सर्व प्रश्नांची उत्तरे आम्ही दिली आहेत. ऑप्शन स्टेटसची मांडणी अगदी सोप्या पद्धतीने सांगितली आहे.

शेअर बाजारात काम करताना पडणाऱ्या सर्व प्रश्नांची उत्तरं या पुस्तकात देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.




मराठी पुस्तक

## फेसलेस फेसबुक


लेखक : मारुती शिरतोडे

**१३६ पाने । २०० रुपये**

फेसलेस फेसबुक हा विस्तीर्ण पोकळीतील कुशल माणसांचा सतेज चेहरा आहे. ज्या दोन हातांनी या विश्वनिर्मितीत मोलाचं योगदान दिलं, त्या हातांचं निर्विवाद प्रतिनिधित्व आहे. लेखकाने शोधलेली माणसं केवळ काळजात कोलाहल करत नाहीत, तर आपलं स्वतंत्र घर करून राहतात. ज्या माणसांच्या कार्यकर्तृत्वाचा इतिहास काळाच्या ओघात नजरेआड होतो, नेमकी तीच माणसं लेखकाला दिसतात आणि लेखक आपल्यासमोर त्यांचं जग रेखाटतो.

'फेसलेस फेसबुक' मध्ये लिहलेली सगळी पात्रं आपल्या अवतीभोवती खोल रुजलेली आहेत. बऱ्याचदा ती माणसं आपल्या सगळ्यांची सावलीसुद्धा झालेली आहेत. पण आपल्याकडून ती दुर्लक्षिली गेली आहेत. त्या माणसांच्या सावलीची कृतज्ञता लेखकाने शब्दात व्यक्त केली आहे.

गावाकडील माणसांच्या जगण्यातली अस्सलता आणि त्यांच्या अफाट कर्तृत्वाची सर्जनशाळा म्हणजे 'फेसलेस फेसबुक' आहे. मला हे पुस्तक प्रचंड भावलंय. त्यामुळेच गेल्या काही वर्षातला 'व्यक्तिचित्रण' मांडणारा उत्तम लेखक म्हणून मी मारुती शिरतोडे यांच्याकडे पाहतो.




मराठी पुस्तक

# ओ साकी साकी

लेखक : राजा गायकवाड

**128 पाने I 450 रुपये**

मराठी जनमानसात मद्य या विषयावर चर्चा हा "टॅब्यू" समजला जातो. अलीकडील काळात मात्र मध्यमवर्गीय समाजात मद्यप्राशन, सोशल ड्रिंकींग यास मान्यता मिळालीय. गरिब व उच्चभ्रू वर्गात कधीच प्रॉब्लेम नव्हता.

मे. पुं रेगे म्हणतात, " मद्यनिषेधासारखे टॅबू गळून पडले या दृष्टिकोनाशी सुसंगत असे एक नितीशास्त्र या मध्यमवर्गाने स्वीकारले आहे. माणसाने चोखपणे , कार्यक्षमतेने काम करावे आणि त्याचे फळ म्हणून जे उत्पादन होते त्याचा मनसोक्त उपभोग घ्यावा. कामातील ढिलाई, चुकारपणा ज्याप्रमाणे अनैतिक तसेच उपभोगात निष्कारण मानसिक अडथळे आणणे वेडगळपणाचे आहे."

मराठीत या विषयातील संपूर्ण माहीती देणारे हे कदाचित पहिलेच पुस्तक.

मद्याचा प्राचीन इतिहास, पेग हा 30/60 मिलीचाच का? पतियाळा पेग म्हणजे काय? मद्याचे प्रकार किती? कोणते? त्यातील फरक काय? जीन व व्होडका व ब्रँडी यात काय फरक? बिअर ओतायची कशी येथपासून तर कोणत्या ड्रिंक्ससाठी कोणते ग्लास वापरावेत व तेच का वापरावेत? चखणा काय असावा? हँगओव्हर का होतो? सिंगल माल्ट, ब्लेंडेड स्कॉच मधील फरक काय? दारूबद्दल जगभर काही अंधश्रद्धा देखील आहेत, त्या काय आहेत? जगभरातील प्रसिद्ध राजकीय नेत्यांचे मद्यपान इत्यादी माहितीने खच्चून भरलेले हे पुस्तक आपणास निश्चितच आनंद देईल.




मराठी पुस्तक

# भारत जोडो यात्रा

लेखक : एस. ए. जोशी

**३८५ पाने । ४०० रुपये**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली काढलेली भारत जोडो यात्रा ही अनेक कारणांनी अत्यंत निराश, हतोत्सहित अशा भारतीय जनतेच्या मूळ सद्भावनेच्या उर्मींना गोंजारते, जोपासते आहे. त्यांच्या नवनवीन आशा-आकांक्षांना धुमारे फुटावे असे उबदार, स्नेहपूर्ण वातावरण यात्रेमुळे तयार होते आहे. आपलं गंभीरपणे ऐकणारा कोणी राष्ट्रीय नेता आपल्याजवळ येतो आहे. आपल्याला उराउरी भेटतो आहे. आपले अश्रू पुसतो आहे हेच जनतेसाठी मोठे अप्रुप आहे. नवनवीन लोकांचा रोजचा सहभाग नोंदवणारी, एका राजकीय पक्षाने काढलेली सर्वात मोठ्या कालावधीची व सर्वाधिक अंतराची ही यात्रा अभूतपूर्व आहे.




मराठी पुस्तक

## व्हायरल माणुसकी


लेखक : वैभव वाघ

**२०४ पाने ।२६० रुपये**

ही गोष्ट आहे, त्या प्रत्येक जिवंत माणसाची जो आजूबाजूला मरणाचे थैमान चालू असतांना पण खऱ्या अर्थाने 'जगला'

कर्तव्यासाठी, इतरांसाठी, स्वतःच्या आंतरिक समाधानासाठी जगणं, हेच खरं जगणं हे ज्यांना कळलं, अशा प्रत्येकाची ही मरणातल्या जगण्याची गोष्ट...

महामारीच्या छाताडावर पाय रोवून उभा राहिलेल्या माणुसकीची ही निगेटिव्ह काळातील पॉझिटिव्ह गोष्ट...





मराठी पुस्तक

# महात्मा फुलेकृत पवाडा छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा

लेखक : डॉ. विश्वनाथ शिंदे

**१०४ पाने । २०० रुपये**

पोवाडा हा नाट्यात्म लेखनप्रकार आहे. अर्थात येते काही एक 'कथन' असते. कथन आले की व्यक्तिचित्रण, प्रसंग उभारणी, त्यासाठीच्या कृती-उक्ती आणि त्याची नाट्यपूर्ण आणि अभियानुकूल अभिव्यक्ती व वातावरणनिर्मिती करणे आवश्यक ठरते. ऐतिहासिक पोवाड्यात इतिहासाचा तो कालखंड जीवंत करणेही आवश्यक असते, किंबहुना त्यासाठीच हे कथन असते. कथनासाठी आवश्यक असणाऱ्या भाषेचाही कवीला शोध घ्यावा लागतो, यातूनच नवनिर्मिती साधली जाते. आणि नाट्य उभे करते वेळी प्रतिभावंतांचा कसही लागत असतो. म. फुले ह्या सर्व गोष्टींचा विचार करता म. फुले यांनी छ. शिवाजी महाराजांवर लिहिलेला पोवाडा अतिशय प्रभावी व महत्त्वाचा ठरतो. शाहिरी वाङ्मयाचे अनेक विशेष पोवाड्यांमधून अभिव्यक्त झाल्याचे प्रत्ययाला येते. छ. शिवाजी महाराजांचा जन्म, बालपण, सहकारी जमवणे, स्वराज्यासाठी संघर्ष, राज्यभिषेक आणि शुन्यातून विश्व उभे करणे या सर्व तपशीलामधून शिवाजी महाराजांचे, एका आदर्श राजाचे चरित्रचित्रण या पोवाड्यातून जोतीराव फुले यांनी उभे केले आहे. छ. शिवाजी महाराजांचे धोरणीपण, त्यांनी केलेले मुलुखगिरी, बलाढ्य शत्रूशी दिलेला लढा, स्वकीयांशी त्यांना करावा लागलेला संघर्ष, प्रसंगपरत्त्वे स्वकीय आणि विरोधी बाजूच्या शत्रूबाबत अंगिकारलेली क्षमाशीलतेचे धोरण हे सारेच शिवाजीराजांच्या ठिकाणी असणाऱ्या गुणांचे दर्शन म. फुले या पोवाड्यामधून वाचकांना घडवतात. तसेच मातोश्री जिजाऊ यांचे संसारिक जीवन, शिवबांवर त्यांनी केलेले संस्कार आणि त्या संस्कारामधून शिवबांमधील क्षात्रवृत्ती जागृत होणे व शिवबांचे व्यक्तिमत्व साक्षात होणे हे सारे घटना-प्रसंग पोवाड्यामधून पुनर्निर्मित झाले आहेत.




मराठी पुस्तक

## मराठ्यांच्या दक्षिणेतील पाऊलखुणा

लेखक : अमर श्रीरंग साळुंखे

**२९४ पाने । ४०० रुपये**

श्री शहाजीराजे, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्यकाळात दक्षिण भारतात मराठ्यांच्या घडलेल्या घडामोडी व त्यांचे आजचे अस्तित्व यांचा संशोधनात्मक मागोवा.

दक्षिण भारतात मराठ्यांनी बांधलेले किल्ले, निर्माण केलेल्या राजधान्या, वसवलेली गावे, त्यांच्या पराक्रमाची साक्ष देणारी शहरे, मराठ्यांच्या दक्षिणेत झालेल्या लढाया, त्यांच्यावर आधारित शिलालेख, मराठ्यांची समाधी स्थळे अशा अनेक प्रकारची संशोधनात्मक माहिती आपल्याला यामधून वाचायला मिळणार आहे.

दक्षिण भारताकडे गेल्या काही वर्षात पर्यटक व इतिहास प्रेमींचा ओढा वाढलेला आहे. परंतु सर्वात मोठा प्रश्न असतो तो तिथे जाऊन नक्की काय पहावे.

भाषा आणि भुगोल या अडचणींवर मात करता येऊन जास्तीत जास्त किल्ले, मंदिरे, समाध्या, शिल्पे, राजवाडे, राजधान्या इ. अभ्यासता यावीत म्हणून इतिहास आणि भुगोलाची सांगड घालून दक्षिण भारतात विखुरलेली मराठ्यांच्या पराक्रमाची यशोगाथा वाचकांच्या भेटीस आणत आहे.





मराठी पुस्तक

# गौतम बुद्धाचे चरित्र

लेखक : कृ. अ. केळूसकर

**२२४ पाने । ३०० रुपये**

जर तुम्हाला जीवनात यशस्वी व्हायचे असेल आणि जीवन आनंदात जगायचे असेल तर गौतम बुद्धाचे चरित्र वाचलेच पाहीजे. गौतम बुद्धांनी जगाला शांततेच्या अहिंसेच्या मार्गावार चालण्याची प्रेरणा दिली. गौतम बुद्धाच्या अमुल्य विचारांनी मनाला शांती मिळते आणि चिंता, द्वेष, मत्सर यापासून मुक्ती मिळते. यासारखे अनेक अमुल्य विचार तुम्हाला गौतम बुद्धाच्या चरित्रातून नक्की वाचायला आणि अनुभवायला मिळेल.




मराठी पुस्तक


## केस नं. 533/2007

लेखक : शंभूराज जाधव

**१८४ पाने । ३०० रुपये**

जेव्हा भुतकाळात गढून जाते सत्य, हतबल होते माणुसकी, बुडून जाते न्यायव्यवस्था आणि उद्धवस्त होते खरे प्रेम.

तेव्हा उभी रहाते ती नियती. निर्माण होतो एक तटस्थ नायक आणि घटीत होतात त्याच्या आयुष्यात अकल्पित, अनाकलीय अशा घटना मग सुरू होतो पाठलाग अनेक रहस्यांचा. काळाच्या पडद्याआड लपलेल्या अमानुषतेवर खरंच नियतीच करेल काय योग्य न्याय?




मराठी पुस्तक

# माझे प्रेमाचे प्रयोग

लेखक : अमित मरकड

**२४८ पाने । ३०० रुपये**

‘आयुष्यात खरं प्रेम फक्त एकदाच होतं!’

ही मी ऐकलेली आजवरची सर्वात विनोदी अफवा आहे. माझ्या माहितीत असा एकही माणूस नाही की, ज्याला आयुष्यात फक्त एकदाच प्रेम झालं! मला तर आयुष्यात पावलोपावली खरं प्रेम झालं!

झालं म्हणण्यापेक्षा मी ते ठरवून केलं.

कारण प्रेम ही एक अशी भावना आहे की

जी कायम हवीहवीशी वाटते !


मलाही ती हवीच होती म्हणून मी प्रेमात पडत गेलो.

रडत गेलो. धडपडत गेलो आणि घडतही गेलो.

हेच ‘माझे प्रेमाचे प्रयोग’ वाचून

तुम्ही सुद्धा पुन्हा एकदा प्रेमात पडाल.

म्हणजे.. पुस्तकाच्या हो!




मराठी पुस्तक

# बुलेट्स ओव्हर बॉम्बे


लेखक : उदय भाटिया । अनुवाद : अक्षय शेलार

**२१२ पाने । २२० रुपये**

१९९८ मध्ये जाणकारांचे प्रचंड कौतुक मिळवत ‘सत्या’ची धडाकेबाज सुरूवात झाली. राम गोपाल वर्मानं मुंबईतल्या गँगस्टर्सचं रोजचं जगणं पडद्यावर आणण्याचं धाडस दाखवलं; तेही अशा काळात जेव्हा बॉलिवूडचे चित्रपट प्रेमकथांची वेगवेगळी रुपं शोधण्यातच गुंतलेले होते.

‘सत्या’मुळे हिंदी गँगस्टरपटांची एक नवी लाट निर्माण झाली. या नव्या बाजाच्या चित्रपटांनी मुंबईची जीवनावश्यक निराकट बाजू चितारली; जी त्यापूर्वीच्या व्यावसायिक चित्रपटांमध्ये क्वचितच दिसायची.

आता दोन दशकांहून अधिक काळानंतर हा चित्रपट आयकॉनिक बनला आहे. चित्रपट आला तेव्हा नेहमी चित्रपट पाहणाऱ्यालाही त्यातल्या मोजक्या लोकांहून अधिक लोक ओळखता आले नसते. आता चित्रपटाची श्रेयनामावली एखाद्या सन्मान पत्राहून कमी नाही - अनुराग कश्यप, मनोज बाजपेयी, विशाल भारद्वाज, सौरभ शुक्ला...




मराठी पुस्तक

# इस्त्रो

लेखक : नितीन हांडे

**२०४ पाने । ३०० रुपये**

इस्रो ही भारतातील अतिशय महत्त्वाची संस्थांपैकी एक गणली जाते. यासाठी इस्रोनं देशासाठी दिलेलं केवळ भौतिक योगदान विचारात घेण्याची आवश्यकता नाही. भौतिक योगदानासोबतच देशाचा आत्मविश्वास, अस्मिता आणि प्रेरणा या पातळ्यांवर इस्रोचं योगदान अतुलनीय ठरतं. इस्रोच्या कामगिरीतून 'येस वी कॅन डू इट' हा आत्मविश्वास भारताच्या जनतेला सातत्यानं मिळत असतो.

या संस्थेची जडणघडण कशी झाली? तिचे शिल्पकार कोण आहेत? तिच्या आजवरच्या प्रवासात काय अडचणी आल्या, त्यावर कशी मात केली? इस्रोसोबतच्या सहयोगी संस्था नक्की काय योगदान देतात ? या क्षेत्रात संशोधनाच्या काय संधी उपलब्ध आहेत? हे सर्व जाणून घ्या !

रॉकेट सायन्स किंवा इतर कोणतंही शास्त्र हे कधीच क्लिष्ट नसतं. एकदा हे विषय समजायला लागले, की त्यांची गोडी वाटू लागते. ही गोडी अधिकाधिक वाढावी या अपेक्षेसह हे पुस्तक आपल्या हाती देत आहोत.




मराठी पुस्तक


# माझी आत्मकथा

लेखक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**१८४ पाने । ३०० रुपये**

भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१४ एप्रिल, १८९१- ६ डिसेंबर, १९५६), हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य (दलित) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले, ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते. देशाच्या विविध क्षेत्रांत दिलेल्या योगदानामुळे त्यांना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' किंवा 'आधुनिक भारताचे निर्मात' असेही म्हणतात.

आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या शिक्षण संस्थांमधून अर्थशास्त्र विषयात पीएच. डी. पदव्या मिळविल्या; तसेच त्यांनी कायदा, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयांवर संशोधन केले. त्यांच्या सुरुवातीच्या कारकिर्दीत, ते एक अर्थशास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि वकील होते. त्यानंतर त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रांत काम केले. ते भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रचारामध्ये व चर्चामध्ये सामील झाले, वृत्तपत्रे प्रकाशित केली, दलितांसाठी राजकीय हक्कांचा व सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला, तसेच आधुनिक भारताच्या निर्मितीत मोलाचे योगदान दिले.




मराठी पुस्तक

# छत्रपती शिवाजी महाराज चरित्र

लेखक : कृष्णाराव अर्जून केळूसकर

**४९४ पाने । ४५० रुपये**

कृ अ केळुस्कर लिखित, छत्रपती शिवाजी महाराज चरित्र आपल्यासाठी उपलब्ध करत आहोत. शिवरायांचे चरित्र लिहिण्यासाठी त्यांनी चार पाच वर्षे कर्ज घेऊन संशोधन केले. शिवचरित्र लिहून झाल्यावर काही विशिष्ट विचारसरणीच्या लोकांनी पुस्तकाला प्रचंड विरोध देखील केला.. अक्षरशः केळुसकर गुरुजींवर मोठ्या प्रमाणात टीकेची झोड उठली होती तरीसुद्धा हे पुस्तक त्यावेळी प्रसिद्ध झाले आणि आताही उपलब्ध आहे.

या शिवचरित्रातील शेवटचे भाग गुणदोषविवेचन आणि प्रकृतचरित्रापासून बोध हे मात्र आजच्या शिवप्रेमींसाठी अत्यंत महत्वाचे ठरतात. यातून शिवरायांवरील अनेक आरोपांचे खंडन सरांनी केलेले आहेच, सोबत आजच्या पिढीने शिवचरित्रातून काय घ्यावे, याचेदेखील धडे लेखक आपल्याला देतात.

1907 साली हे चरित्र लिहिलं असल्याने याची मांडणी आणि भाषा समजण्यास थोडी जड जाऊ शकते पण यात मांडलेले संदर्भ कोणीही नाकारू शकत नाही. केळुस्कर यांनी केलेली मांडणी आणि अभ्यास, संशोधन हे जास्त करून समकालीन बखरींवर आधारित आहे. यामध्ये कसल्याही प्रकारची अतिशयोक्ती किंवा इतर कादंबरीकारांसारखे रंगवून लिहिलेलं नाही. जे आहे ते आहे अस..




मराठी पुस्तक

# हाऊ टू स्टॉप वरिंग अँड स्टार्ट लिव्हिंग

लेखक : डेल कार्नेगी

**२५८ पाने । ३०० रुपये**

हे पुस्तक तुमचं भविष्य पालटू शकतं चिंता करणं हि नित्याचीच सवय आहे, पण ती तुमच्या कामावर आर्थिक बाबींवर, वैयक्तिक नातेसंबंधावर आणि कौटुंबिक जीवनावर थेट परिणाम करते. करोडो प्रतींचा विक्रमी खप झालेल्या या पुस्तकाद्वारे, स्वयं मदतीची तंत्रे शिकवणारे सुप्रसिद्ध गुरू डेल कार्नेगी - आपल्याला या घातक सवयीतून बाहेर पडून अधिक सकारात्मक आणि आनंदी जीवन कसं जगावं याबद्दल अत्यंत व्यावहारिक आणि सोप्या क्लृप्त्या सांगतात.




**मराठी पुस्तक**


# व्हाईट टॉर्चर

## लेखक : नर्गिस मोहम्मदी

**१९४ पाने । ३०० रुपये**

स्त्रियांच्या स्वातंत्र्य आणि सन्मान यांना पायदळी तुडवणाऱ्या देशात दडपशाही, क्रूर हिंसा, शारीरिक-मानसिक छळामुळे उद्ध्वस्थ झालेली स्त्री मने त्या अंधाऱ्या कोठडीच्या फटीमधून समानतेच्या आणि स्वातंत्र्याच्या किरणांच्या अपेक्षेत श्वास घेत आहे. लाखो स्त्रियांमधील नर्गिस ही एक कणखर स्त्री फक्त इराणमधल्याच नाही तर जगभरातल्या स्त्रियांना संघर्ष करण्याची प्रेरणा देत आहेत.

मानवी हक्क आणि न्यायासाठी लढणाऱ्या स्त्रियांची सत्य घटनांवर आधारित कहाणी. स्त्रियांना अमानवी वागणूक देणाऱ्या देशात मानवी हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या नर्गिस मोहम्मदी यांना 2023 वर्षीच्या नोबेल शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्त्रियांच्या स्वातंत्र्य आणि सन्मान यांना पायदळी तुडवणाऱ्या देशातील इराणी महिला कैद्यांच्या मुलाखती म्हणजे व्हाईट टॉर्चर.





मराठी कादंबरी

## व्हेन माय फादर

लेखक : शीतल देशमुख-डहाके

**२२२ पाने । ३०० रुपये**

माणूस विकारांसह जगत आला आहे आणि विकृत वागत आला आहे. बालकांचे लैंगिक शोषण ही सामाजिक समस्या तशी जुनीच आहे. वर्तमान काळ त्याला अपवाद नाही. आपण रोजच तशा बातम्या पाहत असतो, ऐकत असतो, वाचतो. मात्र; या विषयावर व्यक्त होणे टाळतो. बाललैंगिक शोषणाच्या बहुतांश घटनांमध्ये अपराधी ओळखीतला किंवा कुटुंबातलाच असतो. कधी अगदी जवळच्या नात्यातला तर कधी अगदी सख्खा बाप सुद्धा. अशावेळी प्रत्येक आईने कादंबरीतल्या नायिकेच्या आईप्रमाणे कणखर बनून आपल्या लहानग्यांना समजून घेणं अपेक्षित आहे. प्रत्येक सजग आईने आणि आपल्या मुलीवर जीवापाड प्रेम करणाऱ्या वडिलांनी नक्की वाचावी अशी ही कादंबरी.





मराठी कादंबरी

# विहिरीची मुलगी

## लेखिका : ऐश्वर्या रेवडकर

**२७४ पाने I ३५० रुपये**

कादंबरी कशाबद्दल आहे ? तर एका बावीस तेवीस वर्षाच्या बंडखोर मुलीची ही कहाणी. या वयात एक विश्वास असतो की मी म्हणेल ते बरोबर, माझ्या आयुष्याचा निर्णय मीच घेणार. तारुण्याच्या उत्साहात आपण आयुष्य घडवायला पाहतो. सगळं व्यवस्थित चाललं आहे म्हणतानाच अचानक सगळे गड किल्ले कोसळतात आणि सोबत आपणही भुइसपाट होऊन जातो. हे कोसळणे प्रत्येकाच्या आयुष्यात कधी ना कधी घडतेच. पण या पडझडीनंतर पुन्हा स्वतःला उभं करताना, कोणती मूल्यव्यवस्था कामी येते, कोण आपल्याला आधार देतं आणि जगाला सामोरं जात असतानाच स्वतःला ही पुन्हा एकवार कसं समर्थ बनवायचं, अशा प्रकारची ही एका तरुणीची कथा आहे. तरुणीची यासाठी, कारण आपल्या समाजात पुरुष आणि स्त्री हा भेदभाव आजही पाहायला मिळतो. पुरुषांना जे अनेक प्रकारचे स्वातंत्र्य सहज मिळते, स्त्रीची मात्र प्रत्येक ठिकाणी अडवणूक केली जाते. कधी इतर लोक तिला बंधने घालतात तर कधी ती स्वतः च हरवलेल्या आत्मविश्वासामुळे स्वतः ला गमावून बसते. तर भेदभाव करणारी ही समाजव्यवस्था समजून घेत, तिच्यासमोर एक मुलगी कशी स्वतःचे विश्व घडवू शकते, या आत्मशोधाची ही कादंबरी आहे.  अनेक वर्षे पुरुष त्यांच्या नजरेतून आपल्याला स्त्रियांची कहाणी सांगत राहिले. पण या पुस्तकात मात्र स्वतः स्त्रीच्या नजरेतून नायिकेची कहाणी सांगितली आहे. तिच्या मनासकट आणि शरीरासकटसुद्धा. ज्या गोष्टी बोलायच्या नाहीत हे सांगितले जाते, त्याच गोष्टी बोलून, बदल घडवून आणायची आशा आहे.




कवितासंग्रह


## बाप आणि शिल्लक

लेखक : अजित अभंग

**११२ पाने । २५० रुपये**

बाप होण्याची घटना या जगातल्या तोंड द्यायला अवघड घटनांपैकी एक आहे. आपला बाप कसा होता, आहे याचं स्मरणरंजन आणि आपलं बाप होण्यादरम्यान झालेलं परिवर्तन लिहून सांगणं हे ही तितकच अवघड. बाप आणि शिल्लक हा कवितासंग्रह हे आव्हान पेलण्याच्या क्रियेचा दस्तावेज आहे.

मध्यमवर्गीय, स्थलांतरीत गटाच्या बाप बनण्याच्या या प्रक्रियेचा एक पट या संग्रहात येतो. आपल्या आधीच्या, समकालीन आणि येणाऱ्या पिढीच्या सुखदुःखाचा, सामाजिक जाणीवांचा, प्रतिकांचा, भावनिकतेचा दस्तावेज म्हणून या संग्रहाचं महत्व आहे.




मराठी पुस्तक

# पॉवर गेम

लेखक : राजा गायकवाड

**१२६ पाने । २५० रुपये**

स्वातंत्र्योत्तर भारतात प्रत्येक पंतप्रधान निवडीच्या वेळी पडद्याआड नाट्य झाले, संघर्ष झाले, कारनामे झाले. त्यावेळी घडलेल्या untold stories चा घेतलेला हा वेध. स्पेसिफिक हाच विषय घेऊन भारतातील किंबहुना पहिलेच पुस्तक.




मराठी पुस्तक

# येडाई


लेखक :जयराज खोचरे

**१५६ पाने । २५० रुपये**

माता पार्वती सीता रुपात ज्या ठिकाणी अवतरली ती जागा म्हणजे येरमाळा...

आपल्या भक्तांना संकटातून बाहेर काढण्यासाठी माता पार्वती येडाई रुपात कायम स्थिरावली ती जागा म्हणजे येरमाळा..

देवीचा महिमा, रूढी-परंपरा, कथा, आरती-घाटोळी अप्रकाशित इतिहास व स्थळे याची सर्व माहिती घेऊन येणाऱ्या चैत्र पोर्णिमेनिमित्त प्रथमच पुस्तक रूपाने घेऊन येत आहोत.





मराठी पुस्तक

# इच्छामरण एक सत्यकथा

लेखिका : संगीता लोटे

**२८६ पाने । ३५० रुपये**

डॉ. भारत लोटे सर हे अतिशय हुशार, निष्णात, शांत, मनमिळावू व प्रेमळ व्यक्तिमत्त्व होते. त्यांना कुणीही आणि कधीही मदतीची हाक मारली तर ते सदैव तत्पर असायचे. अगदी चोवीस तास काम करूनही डॉक्टरांचा चेहरा नेहमी हसरा आणि आनंदी असायचा. संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्यात गरिबांचा डॉक्टन म्हणून त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला होता. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीदवाक्य त्यांनी खरे करुन दाखविले होते. त्यांच्या याच रुग्णसेवेची पोचपावती म्हणून शासनातर्फे २००५ साली त्यांना मानाच्या आनंदीबाई जोशी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. ज्या व्यक्तीने स्वतः डॉक्टर असताना रुग्णसेवा हिच ईश्वरसेवा समजून आपलं संपूर्ण आयुष्य लोकांना वाचवण्यासाठी घालवले, त्याच व्यक्तीला त्याच्या आजारपणात हॉस्पीटलच्या चुकीच्या ट्रिटमेंटमुळे आणि सरकारच्या मदतीच्या अनास्थेमुळे एवढ्या मोठ्या लोकशाही देशात इच्छा मरण मागाने लागणे यासारखी दुसरी शोकांतिका नाही...




मराठी पुस्तक

# सायंटिस्ट खोपडी


## लेखक :डॉ. नितीन हांडे

**२२२ पाने । ३०० रुपये**

शास्त्रज्ञ म्हणले की न्यूटन, गॅलिलिओ, आइन्स्टाइन, एडिसन यांसारखे मोजके शास्त्रज्ञ आठवतात.. भारतातील रमण, भाभा किंवा अब्दुल कलाम यांच्यावर अनेकांची यादी संपते.

या पुस्तकात तुम्हाला असे २७ शास्त्रज्ञ वाचायला मिळतील, ज्यांनी विज्ञानाच्या क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण केलं आहे. त्यांच्या गमतीशीर जीवनासोबत वाचायला मिळेल विज्ञानाचे तत्वज्ञान.. विज्ञान, वैज्ञानिक यांच्यावर अधिक चर्चा व्हावी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अधिक प्रचार व्हावा आणि आपल्या मराठी मातीतून अधिक सायंटिस्ट खोपड्या तयार व्हाव्यात या अपेक्षेने सायंटिस्ट खोपडी आपल्यापुढे सादर करत होत आहे.

आपल्या सहज सुलभ भाषेतून विज्ञानाची गोडी लावणे हे डॉ. नितीन हांडे यांचे वैशिष्ठ्य!! " त्यांनी लिहिलेल्या आपले भवताल" आणि "इस्रो द प्राइड ऑफ इंडिया" या न्यू इरा तर्फे प्रकाशित पुस्तकांचे आपण जसे जोरदार स्वागत केले, तसे या पुस्तकाचे देखील नक्की करालच!!




मराठी पुस्तक

# फिडेल कॅस्ट्रो

लेखक : प्रणित पवार


**२१६ पाने I ३५० रुपये**

६३८ वेळा खुनाचा प्रयत्न होऊन देखील अमेरिकेच्या दबावाला न जुमानता सहा दशके क्युबावर निर्विवाद वर्चस्व गाजवणारा महान क्रांतिकारी म्हणजे , फिडेल कॅस्ट्रो !

"क्रांती म्हणजे गुलाबाचा बिछाना नाही तर भुतकाळ आणि भविष्यकाळाच्या दरम्यान होणारं तुंबळ युद्ध आहे", हे वाक्य गेल्या शतकातील सर्वोच्च क्रांतीकारी फिडेल कॅस्ट्रो यांचं.

फिडेलचा संघर्ष जगातील कित्येक तरुणांना प्रेरीत करत आला आहे. कोणत्याही प्राप्त परिस्थितीमध्ये संघर्ष करणारा प्रसंगी बलाढ्य शत्रूस देखील नमवू शकतो, हे फिडेलच्या आयुष्याकडे बघून आपल्याला शिकता येतं.

प्रणित पवार यांना मी धन्यवाद देतो की त्यांनी फिडेलचा संघर्षमय जीवनपट सहज भाषेत मांडला. प्रत्येक तरुणाने आवर्जून वाचावं असं पुस्तक...




मराठी पुस्तक

## छत्रपती म्हणे

लेखक : प्रथमेश राणे

**११२ पाने । २५० रुपये**

आपल्या आयुष्यात जो प्रसंग अडचणीचा वाटतो, त्याचे उत्तर शिवरायांच्या चरित्रात शोधण्याचा मार्ग या पुस्तकातून सापडतो. चिंतन, मनन आणि अंमलबजावणी असे तीन खांब या पुस्तकाला आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील निवडक गुणवैशिष्ट्यांसह "छत्रपती म्हणे" हे पुस्तक सादर करीत आहोत...




मराठी पुस्तक

# द लीडर इन यू

## लेखक : डेल कार्नेगी


**२१३ पाने । २५० रुपये**

डेल कार्नेगी यांचे 'द लीडर इन यू' हे पुस्तक म्हणजे यशस्वी नेतृत्वाचे रहस्य सांगणारा ऐवज !

राजकारण, समाजकारण, व्यवसाय-उद्योग अशा विविध क्षेत्रांत पुढाकार घेत नेतृत्व करण्याची हातोटी या पुस्तकामुळे अनेकांना लाभली आहे. आयकोका व मार्गारेट थैचरसारख्या जागतिक कीर्तीच्या महान लोकांनीही या लिखाणाचा आपल्याला फायदा झाल्याचे नमूद केले आहे. हे पुस्तक सर्वसमावेशक आहे.

या पुस्तकातून जाणून घ्या :

* तुमच्यातील लीडर म्हणजेच नेता ओळखा.
* तुमचे ध्येय निश्चित करा.
* आत्मविश्वास वाढवण्यासाठी योग्य पावले उचला.
* मित्र जोडा आणि त्यांना प्रभावित करा.
* तुमच्या चिंतांवर नियंत्रण ठेवा.
* नेहमी हसतमुख, उत्साही आणि ऊर्जावान राहा.




मराठी पुस्तक


# चेंज युवर हॅबिट्स चेंज युवर लाइफ

लेखक : अ‍ॅश्दीन डॉक्टर

**१९४ पाने । २५० रुपये**

The Habit CoachTM अ‍ॅश्दीन डॉक्टर लिखित, 'सवयी बदला, आयुष्य बदला' (चेंज युअर हॅबीट्स, चेंज युअर लाइफ) या पुस्तकात त्यांनी सवय बदलण्यासाठीचे तीन सोनेरी नियम सांगितले आहेत. हे नियम अनुसरून तुम्ही या दुष्टचक्रातून बाहेर पडू शकता. हे नियम वापरण्यास अगदी व्यवहार्य आणि सोपे आहेत. हे नियम तुम्हाला तुमच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या निश्चित ध्येयाकडे घेऊन जातील, योग्य नित्यकर्म कशी आखून घ्यावीत याबाबत मार्गदर्शन करतील आणि एक शाश्वत जीवनशैली आत्मसात करण्याचं तुमचं ध्येय साध्य करतील.

ज्या लोकांनी या पुस्तकातील पद्धतींचा अवलंब करून आपलं आयुष्य आमूलाग्र बदलून टाकलं आहे, अशांच्या यशोगाथा या पुस्तकात आहेत. आनंदी, यशस्वी आणि जास्त कार्यक्षम बनण्यासाठी (चेंज युअर हॅबिट्स, चेंज युअर लाइफ) हे पुस्तक पहिलं पाऊल आहे.




मराठी पुस्तक

# ज्ञानाचा प्रवाह चालिला

लेखिका : डॉ. सुनीती धारवाडकर, डॉ. नितीन हांडे


**११६ पाने । २०० रुपये**

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आपण आजपर्यंत अनेक

आजारांवर लसी विकसित केल्या, औषधे शोधून काढली. देवी, क्षय, कॉलरा यांसारख्या अनेक जीवघेण्या रोगांपासून मुक्तता मिळविली. आज संपूर्ण जगाला वेठीस धरणाऱ्या कोव्हिड आजारावर अत्यंत कमी वेळात विविध लसी निर्माण करण्याचे श्रेय मानवतावादी विज्ञानालाच जाते.

ज्ञानाचा हा प्रवाह असाच चालू राहणार आहे. प्रस्तुत पुस्तकातून विज्ञान कसे विकसित होते, नवे आयाम कसे जोडले जातात, कोडी कशी उलगडली जातात, याचा वेध घेतला आहे.

जीवविज्ञानाचे क्षेत्र कसे विकसित होत गेले. त्याचा प्रवास आज कोणत्या टप्प्यापर्यंत येऊन पोहचला आहे, याची झलक यातून पहायला मिळते. या प्रवासातील थांब्यावर वाचकांची भेट प्रतिभावंत जीवशास्त्रज्ञांशी होते आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू समजून घेतांना त्यांच्या मौलिक संशोधनाच्या योगदानाचा पट उलगडला जातो.




मराठी पुस्तक


# नेटपर्णी

## लेखक : सुनीता बोर्डे

**१८२ पाने । २५० रुपये**

मानवी प्रगतीमधील सर्वात उल्लेखनीय शोध म्हणजे इंटरनेट. या तंत्रज्ञानामुळे जग जितके जवळ आले आहे, तितकेच त्यामुळे प्रश्नही निर्माण झाले आहेत. इंटरनेटच्या या युगात सामाजिक आणि मानसिक स्वास्थ्य हिरावून घेणाऱ्या अशाच काही भीषण प्रश्नांवर भाष्य करणारी 'नेटपर्णी' ही एक आगळीवेगळी कादंबरी आहे.

कादंबरीच्या 'नेटपर्णी' या उत्कंठावर्धक शीर्षकाचा संदर्भ 'घटपर्णी' या मांसाहारी वनस्पतीशी आहे. ज्याप्रमाणे घटपर्णी वनस्पती आपल्या आकर्षक रंग आणि सुगंधाच्या सहाय्याने भक्ष्याला स्वतःकडे आकर्षित करून क्षणार्धात गिळंकृत करते, अगदी त्याप्रमाणेच इंटरनेटच्या महाजालात सोशल मीडियावरील 'नेटपर्णी' म्हणजेच भक्ष्यासाठी घात लावून बसलेल्या टोळ्या एखाद्या व्यक्तीला सहज आपल्या जाळ्यात ओढून शेवटी गिळून टाकतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून सुंदर व उत्तेजक ललना किंवा आर्थिक फायद्याच्या प्रलोभनांना भुलून एखादी व्यक्ती नेटपर्णीच्या जाळ्यात फसली की सुरू होतो खंडणीचा खेळ !




मराठी पुस्तक

# संत गाडगेबाबा

## लेखक : प्रबोधनकार ठाकरे

**१३६ पाने I २५० रुपये**

महाराष्ट्राच्या संत परंपरेतील अखेरचे संत म्हणून ज्यांचे नाव इतिहासात कोरले गेले, ते म्हणजे संत गाडगेबाबा! बाबांनी आपले संपूर्ण जीवन लोकांची सेवा करण्यामध्ये घालवले. त्यासाठी त्यांनी आपले घर-प्रपंचाचा त्याग केला. हातात खराटा घेऊन परिसराची स्वच्छता तर केलीच, सोबतच कीर्तनाच्या माध्यमातून लोकांची डोकीही साफ केली. त्यांनी लोकांच्या डोक्यातील देवभोळेपणा, अंधश्रद्धा, अनिष्ट परंपरा, अज्ञान, व्यसनाधिनता तर दूर केली. त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. स्वतः मागून मिळेल तो भाकरीचा तुकडा खाल्ला, मात्र अंध-पंगु, गरिब, भिकारी, कुष्ठरोगी यांच्यासाठी जेवणाच्या पंगती सुरू केल्या. स्वतः आयुष्यभर झोपडीत राहिले, मात्र महाराष्ट्रभर अनेक धर्मशाळा उघडल्या. कुठलेही भौतिक सुख, आर्थिक मोह, प्रतिष्ठा त्यांना शिवू शकली नाही. जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा असल्याचे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

प्रबोधनकार ठाकरे हे गाडगेबाबांचे समकालीन होते, त्यांना बाबांचा बराच सहवास लाभला. त्या सहवासात त्यांना पहायला मिळालेले, त्यांना समजलेले गाडगेबाबा त्यांनी या चरित्राच्या माध्यमातून लोकांसमोर मांडले आहेत. गाडगेबाबांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय होण्याच्या दृष्टीने हे चरित्र छोटेखानी असले, तरी प्रबोधनकरांनी आपल्या लेखनशैलीने त्याला सर्वसमावेशक बनवले आहे.




मराठी पुस्तक

# द लेस्बिअन

लेखक : शुभांगी दळवी

**१९६ पाने । ३०० रुपये**

तनामनाच्या हाका संवेदनशीलपणे स्वीकारून स्त्रियांच्या हक्कासाठी समर्थपणे लढणाऱ्या आतल्या आवाजाला ही कादंबरी समर्पित आहे. ही कादंबरी, समाजातील एका महत्त्वपूर्ण परंतु दुर्लक्षित विषयावर तटस्थपणे प्रकाश टाकणारे धगधगते वास्तव आहे.आपल्याच आजूबाजूला असलेल्या लेस्बिअन्सच्या जीवनातील अंतर्बाह्य संघर्ष, त्यांच्याविषयीच्या समाजाच्या वाईट प्रतिक्रिया, त्यांची समाजस्वीकृती आणि आत्मसन्मान यावर आधारित असणारी ही कादंबरी समलिंगी स्त्रियांच्या जीवनातील कटू पण वास्तव अनुभव आपल्यासमोर टोकदारपणे मांडते. तसेच वाचकाला अंतर्मुख करते. विचार करायला भाग पाडते. प्रसंगी हळवेही करते.

आधुनिक जगातही समलैंगिकतेबद्दल अनेक गैरसमज आणि पूर्वग्रह असलेले दिसून येतात. समलिंगी स्त्रिया आपल्या अस्तित्व आणि स्वओळखीसाठी नेहमीच एक निरंतर संघर्ष करत असतात. अशा या स्त्रियांच्या जीवनाचा, त्यांच्या मनोव्यथांचा आणि आनंदाच्या क्षणांचा नेमका आणि प्रामाणिक परखड आलेख शुभांगी दळवी यांनी ‘द लेस्बिअन’ या कादंबरीत धाडसाने मांडला आहे




मराठी पुस्तक

## ब्युटी ऑफ लाईफ : द डायरी ऑफ कॅन्सर सर्व्हायवर

लेखक : आशा नेगी

**२५६ पाने । ३५० रुपये**

आयुष्य म्हणजे स्वतःची ओळख शोधण्याची एक प्रक्रिया. प्रत्येक अनुभवातून काही तरी नवीन शिकणं आणि त्यातून अधिक सजग आणि सक्षम होणं. आयुष्याचा खरा अर्थ आपल्याच जीवनातील चांगल्या - वाईट अनुभवांमधून शोधायला हवा, त्यातूनच खरं आयुष्य उमगतं.

मला कॅन्सर झाला, याचं मला काडीमात्र दुःख नाहीये. खरंच, कारण हे सगळंच क्षणभंगुर आहे. एक मृगजळ आहे, हे मला ह्या प्रवासाने दाखवून दिलं. आता उर्वरित आयुष्य मी बोनस मानून माझ्या बळावर जगणार आहे. कारण आयुष्यात जगणंच जास्त मौल्यवान असतं.

आणि शेवटी एकच... आनंदी जगा, हसत जगा.. कारण आयुष्याचा हा चलचित्रपट एकदा संपला की याचे पुनर्प्रक्षेपण नाही.

जीवन अनिश्चित आहे. आशा-निराशेने भरलेले आहे. जगण्याची आसक्ती आहे. म्हणूनच आयुष्य खूप सुंदर आहे. तुमच्या वेदनेत, संघर्षात, आनंदात जीवनाचे सौंदर्य दडले आहे. ‘ब्युटी ऑफ लाईफ’ म्हणतात ते हेच...!!




मराठी पुस्तक

# की की की कीटक

लेखक : नितीन हांडे

**१२४ पाने । २०० रुपये**

कीटकांच्या अद्भुत विश्वात तुमचं स्वागत आहे. आपल्या भवताली असून देखील आपल्यासाठी अनोळखी... तसंच त्रासदायक होत नाही तोवर दुर्लक्षित केलं जाणारं कीटकांचं हे विश्व। या कीटकांना जरा जाणून घेण्याचा प्रयत्न करूया.

तुम्हाला डास चावतो की डासी? मुंगीला दोन पोटं का असतात ?

झुरळ त्याचे एट पॅक ॲब्ज कसं मेन्टेन करतं? ढेकूण किती दिवस उपोषण करू शकतो?

माश्या मानवाला आजारी कश्या पाडतात? भुंगा खरंच लाकूड खातो का?

कानात गेलेल्या गोमेला बाहेर कसं काढायचं? कोळ्याच्या जाळ्याचा धागा किती भक्कम असतो?

ऊ व्यक्तीची साथ कधीच का सोडत नाही? वाळवीच्या राज्यामध्ये राणीपद कसं मिळतं?

पृथ्वीवरून मधमाश्या नाहीशा झाल्या तर चार वर्षांमध्ये मानववंश नष्ट होईल हे खरं आहे का?

अशा अनेक प्रश्नांना सोबत घेऊन आपण कीटकांच्या विश्वाची रंजक सफर करूया. वाचनाचा किडा असलेल्या प्रत्येक चोखंदळ वाचकाला इथं पोटभर मेजवानी मिळेल आणि पुस्तक वाचून झाल्यावर त्याला शाहरुखच्या स्टाईलमध्ये म्हणावं वाटेल...

“मी वाचलं. तुम्ही वाचलं का?? की की की की कीटक...”





मराठी पुस्तक

## वायंगी

लेखक : अविनाश महाडिक

**२३२ पाने । ३५० रुपये**

निर्मला आपल्याच तंद्रित अंगात आल्यासारखी घुमत होती. तिचे केस सुटलेले होते. डोळ्यांच्या बाहुल्या वर जाऊन डोळे पांढरेफटक दिसत होते. ती ज्याची आराधना करत होती तो 'वायंगी' त्या गुहेच्या जवळपास पोचला होता. तो निर्मलाला जे हवं ते मिळवून देणार होता. त्या मोबदल्यात तो तिच्याकडून स्वतःसाठी भक्ष्य मिळवणार होता. भक्ष्य मिळवणं 'वायंगी' साठी मोठी गोष्ट नव्हती, परंतु त्याला मानवजात भ्रष्ट करायची होती. माणुसकीला हरताना त्याला पाहायचे होते. माणूस माणसाचा शत्रू होऊन कितपत मजल मारू शकतो हेच पाहण्यासाठी तो हजारो वर्षे जंगलात वास्तव्य करून राहत होता. एखाद्या लोभी मनाच्या व्यक्तीला स्वतःच्या नादाला लावून त्याच्याकडूनच इतरांचे नुकसान करण्यात त्याला असुरी आनंद व्हायचा. तो असुरांचाच वंशज होता. कलियुगातील कली राक्षसाचा मुलगा 'वायंगी:





# झेन

लेखक : नितीन भरत वाघ

**१९५ पाने । ३०० रुपये**

तणावात, चिंतेत किंवा अस्वस्थ असल्यावर मार्ग सुचत नसेल, निर्णय घेता येत नसेल, मनात गोंधळ असेल तर झेन कथा एखादी लहानशीच पण लख्ख मर्मदृष्टी देऊ शकतात. असा मार्ग दाखवू शकता, जो अतःप्रेरणेने चिंता व तणावमुक्त करू शकतो. या कथा 'हाऊ टू...' सारख्या माहितीपर मार्गदर्श करणाऱ्या नाहीत, तर आतूनच उजळत नेणाऱ्या, समृद्ध करणाऱ्या ज्ञानासारख्या आहेत. या कथा आजच्या धकाधकीच्या, स्पर्धेच्या कोलाहलात, जीवघेण्या रणरणत्या प्रवासात विसाव्याला येणाऱ्या झाडाच्या दाट सावलीसारख्या आहेत. बसावं, शांत व्हावं, ऊर्जा प्राप्त करावी. व्यक्तिमत्व विकासासाठी एक वेगळा अर्थपूर्ण आयाम देण्याची क्षमता या कथांमध्ये आहे.

मनुष्य जीवन आनंदी जगण्यासाठी आहे. ऊर फुटेस्तोवर धावण्यासाठी नाही. जगण्यातला आनंद नक्की कशात आहे, तो शोधण्याची सम्यक दृष्टी या कथांत आहे. आयुष्याता प्रत्येक क्षण आनंदमय कसा करता येईल, ते या कथा सांगतात. 'आतला' आवाज ऐकण्याची प्रेरणा देणाऱ्या या कथांमध्ये शेकडो पिढ्यांचा सजग हरक्षणी पथदर्शक म्हणून उपलब्ध आहे. अंधारलेला रस्ता उजळण्यासाठी हाती घेतलेल्या दिव्यासारख्या या कथा आहेत. बुद्धाच्या उपदेशाचे सार या कथांमध्ये आहे, ते म्हणजे- अत्त दिप भव.





## निळावंती अ स्टोरी ऑफ द बुकहंटर

लेखक : नितीन भरत वाघ

**२३४ पाने । ३५० रुपये**

नीतीन भरत वाघ यांच्या 'निळावंती - अ स्टोरी ऑफ द बुकहंटर' या कादंबरीत घेतलेला शोध एकूण वर्तमान भारतीय मानसिकता, वैदिक-अवैदिक तत्त्वज्ञानातील संघर्ष यावर केंद्र करतो. तसेच बुद्ध आणि त्यांच्या विचारांची वर्तमान प्रस्तुतता, स्त्रीची मुळातली मातृसत्ताकता या मूल्यांची उपयुक्तता ही कादंबरी नव्याने अधोरेखित करते. यात परंपरांचा शोध जसा आहे तसाच पुनर्विचारही आहे. या शोधात मुस्लीम इतिहास जसा येतो तसा आदम, ईव्ह आणि लीलिथच्या कथेच्या नव्या वाचनातून स्त्रीने पुरुषाच्या बरगडीचा भाग असणे कसे नाकारले, हेही येते. मुळातले मुक्त लैंगिक संबंध कोंदणात बसवून स्त्रीला कसे दुय्यम बनवले गेले, याचीही चिकित्सा कादंबरी करते. सेक्स, नग्नता आणि ज्ञान यांची कादंबरीतील चर्चा मुळातून वाचण्यासारखी आहे. या कादंबरीत वैचारिकता, सांस्कृतिक चिकित्सा आणि रूपाची नवी मांडामांड या गोष्टी प्रयोगशील रूपांत आल्या आहेत. तसेच लेखक, निवेदक, नायक आणि रूपबंधाच्या मागील अदृश्य नियंत्रक या सर्वांच्या संबंधांची चिकित्सा ही कादंबरी करते.




मराठी पुस्तक

## महाराजा-ए-हिंद

लेखक : मयुर हनुमंतराव सुळ

**३०४ पाने । ३५० रुपये**

आद्य स्वातंत्र्यवीर महाराजा यशवंतराव होळकर यांच्या शौर्याची आणि कर्तृत्वाची गाथा उलगडणारे हे पुस्तक दिवाळीमध्ये वाचकांच्या भेटीला येत आहे.

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील या वीराचं योगदान आजच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हा एक प्रयत्न आहे. त्यांच्या धैर्यशील नेतृत्वाने ब्रिटिशांना ज्या प्रकारे सळो की पळो करून सोडलं, त्यांची लढाऊ रणनीती, मऱ्हाठ्यांचा स्वातंत्र्याचा निर्धार आणि त्यांचं दृढ नेतृत्व यांची ही कथा प्रत्येक भारतीयाच्या हृदयात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित करणारी ठरेल.





मराठी पुस्तक

# महात्मा जोतीराव फुले

## निवडक वाङ्मय

**३३६ पाने । ३०० रुपये**

या ग्रंथात समाविष्ट करण्यात आलेल्या महात्मा फुलेंच्या निवडक साहित्यातून त्यांच्यातील एका तत्वचिंतकात्ची ओळख पटते. त्यांच्या मांडणीतून आलेल्या अनेक संकल्पना, अनेक विचार आज समाजाने स्वीकारले आहेत. समाजातील अनेकांना त्यांनी प्रेरणा दिली. महात्मा गांधींनी त्यांचा उल्लेख 'खरा महात्मा' म्हणून केला, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर त्यांना गुरुस्थानी मानत होते. महात्मा फुलेंचे हेच प्रेरणादायी समतावादी विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने वाचकांच्या हाती सोपवण्यात येणाऱ्या 'महात्मा जोतीराव फुले निवडक वाङ्मय' या ग्रंथाचे सर्वजण स्वागत करतील, अशी मी आशा बाळगतो.





मराठी पुस्तक

# जावयाची मुंडी

## लेखक : सुरेश पाटील

**२५८ पाने । ३०० रुपये**

संगणकाचा बोलबाला असो, अथवा सत्तापरिवर्तन... देशात आर्थिक सुबत्ता आल्याचे ढोल पिटले जातात; परंतु या देशात गरिबीचा आलेख हा नेहमीच वर राहिला आहे. या देशाचं दुर्भाग्य असं, की इथं उपस्थित झालेले प्रश्न पिढ्यान्पिढ्या पाहायला मिळतात! सत्ताधारीही त्यांना कुरवाळण्यातच धन्यता मानतात. पण हे प्रश्न सुटणार कधी, हाच मोठा प्रश्न. प्रश्न तेच राहिले, तरी माणसाची नियत मात्र बिघडली, स्वाहाकारात माणसाला कशाचीही फिकीर राहिली नाही. माणसा- माणसातील असं मानसिक-भावनिक परिवर्तन हे संवेदनशील लेखकांसाठीही तसं एक आव्हानच! या आव्हानाचाच एक भाग असलेला आणि मानवी मनाच्या डोहात उतरून तिथंही घुसळण करणारा चित्तवेधक कथासंग्रह म्हणजेच 'जावयाची मुंडी.'





मराठी पुस्तक

## कारखाना

लेखक : अभयकुमार देशमुख

**२७६ पाने । ३५० रुपये**

महाराष्ट्राच्या राजकारणावर साखर कारखानदारीचा मोठा प्रभाव आहे. पूर्वी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीचा मार्ग साखर कारखान्यातून जातो, असं म्हटलं जायचं. आता ग्रामीण भागातील राजकीय नेत्यांचा आमदारकी अन् खासदारकीचा मार्ग साखर कारखान्यातून जातो, असं म्हणण्याची वेळ आली आहे. आज कारखाने म्हणजे गटातटाच्या राजकारणाचे अड्डे बनले आहेत. अशा गटबाजीला राज्य आणि केंद्र पातळीवरूनही खतपाणी घातले जाते. कारखान्यावर वर्चस्व ठेवण्यासाठी होणाऱ्या राजकीय कुरघोड्या, डावपेच, तडजोडी, द्वेषभावनेतून होणारे टोकाचे हेवेदावे, हिंसक कारवाया, इत्यादी गोष्टींमुळे आज ग्रामीण राजकारण ढवळून निघाले आहे. कारखान्यांच्या अवतीभवती चालणाऱ्या याच राजकारणाचे चित्रण करणारी ही कादंबरी...




मराठी पुस्तक

# डिजिटल मार्केटिंग - काळाची गरज

लेखक : शुभम मेदनकर


**१९८ पाने । ३०० रुपये**

महाराष्ट्रामध्ये नवउद्योजकांनी घेतलेली भरारी उद्योजक होऊ पाहणाऱ्याला प्रेरीत करत आहे. परंतू उत्पादन आणि सेवा उच्च दर्जाच्या देऊनही उद्योजक लोकांपर्यंत पोहचवण्यास कमी पडत आहेत. त्यात जुन्या परंपरात मार्केटींगचा खर्च जास्त आहे. सध्या डिजिटल युग सुरु झाल्याने उत्पादनाच्या मार्केटींगचे नवीन दालन खुले झाले आहे.

सोशल मिडियाचा वापर करुन कोरोना काळात अनेकांनी व्यवसाय वाढवला. त्यातून डिजिटल मार्केटिंगचे महत्व लक्षात आलं. व्यवसायवाढीसाठी डिजिटल मार्केटिंग आवश्यक गोष्ट बनली आहे. त्याच बरोबर डिजिटल मार्केटिंग क्षेत्रात नोकरीच्या संधीचं प्रमाणही वाढत आहे.

व्यवसायासाठी किंवा नोकरीच्या संधी साठी हे पुस्तक महत्वाचं ठरेल. गृहीणी, तरुण-तरुणी, ज्याला मोबाईल चालवता येतो असा कुणीही या क्षेत्रात करियर करु शकतो.

सहज भाषेत डिजिटल मार्केटिंग विषय समजावून सांगितल्याबद्दल शुभम मेदनकर याचे मनापासून धन्यवाद...




मराठी पुस्तक

# डिजिटल युग - AI 2025 ++

## लेखक : डॉ. दीपक शिकारपूर

**१४६ पाने । २५० रुपये**

तंत्रज्ञानामुळे अनेक क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल होतील. यंत्रमानव आणि मानव ह्यामधील दरी कमी होऊन येत्या दहा-पंधरा वर्षांच्या काळात रोबो (यंत्रमानव) हा सर्वसामान्यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटक बनेल. ह्या क्षेत्रातील सतत बदलणारे तंत्रज्ञान आपल्या जगण्याच्या कल्पनाच बदलून टाकेल. बदलांचा हा वेग येत्या पाच-दहा वर्षात अधिकच वाढणार आहे. तो सर्वव्यापी तर होईलच पण ज्या पैलूंमध्ये बदल दिसण्याची आपण कल्पनाही केली नव्हती अशा ठिकाणी तो आढळेल. आपले वैयक्तिक जीवन, व्यवसाय, व्यवहार, सामाजिक संपर्क ह्या सर्वबाबी आमूलाग्र बदलणार आहेत.

आपले जीवन कळत-नकळत हे 'डिजिटल ++' होत आहे आणि २०३० नंतर त्याची व्याप्ती खूपच वाढेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचे विश्व आता मानवी भावनात्मक रूपही धारण करण्याच्या वाटेवर आहे. इमोटिव्ह रोबोटिक्स ही विद्याशाखा वेगाने प्रगती करत आहे. आगामी काळ कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित तंत्रज्ञानाचा असेल. ही वस्तुस्थिती ओळखून तंत्रस्नेही व्हा, स्मार्ट यूजर बना. मात्र स्वतःचा डिजिटल प्रेझेन्स मर्यादित ठेवा. आगामी काळात अनेक ठिकाणी मानवी हस्तक्षेपाची गरज A I साधनेपूर्ण करतील. त्यामुळेनव्या तंत्रज्ञानाची भीतीवा असुरक्षिततान बाळगता, नव्या तंत्रांशी मैत्री करा, स्मार्ट यूजर व्हा. काळ कोणासाठी थांबत नाही. त्याची पावले ओळखून त्यानुसार आवश्यक ती कौशल्ये आत्मसात करणाऱ्या व्यक्ती आणि उद्योगच टिकतील. अनेक पारंपरिक रोजगारांवर गदा येईल, पण AI क्षेत्रात नवे रोजगारही निर्माण होतील.




मराठी पुस्तक

# द लास्ट कोर्टेसान

## लेखक : मनीष गायकवाड

**१९४ पाने । ३०० रुपये**

१९९३ मधील बो बाजार बॉम्बस्फोटामुळे कोलकाता येथील व्यस्त व्यावसायिक जिल्ह्यातील कोठा संस्कृतीचा अंत झाला. पुढच्या काही वर्षात डान्स बार आणि डिस्को म्युझिकने मुजरा, कथ्थक आणि ठुमरी या जुन्या काळातील मंत्रमुग्ध करणाऱ्या कलांची जागा घेतल्याने तवायफांनी आपला व्यवसाय सोडण्यास सुरुवात केली. रेखाबाई या तवायफसमोर अनिश्चित भविष्यकाळ उभा ठाकला होता. तिने कुठे जावे? तिने पुढे काय करावे?

रेखाबाई मुळात कंजारभाट जमातीतील. तिला अत्यंत कोवळ्या वयात विकले गेले आणि तवायफ बनण्याचे धडे दिले गेले. १९८० च्या दशकात कोठ्यांना अभिजात कलेचा मान मिळत नव्हता. तो अदाकारीच्या वेषात असलेला वेश्याव्यवसाय आहे, अशी समाजाची समजूत होती. त्यामुळे तवायफच्या कलेला नाकारले गेले. अशा काळात रेखाबाईंनी कलकत्ता आणि बॉम्बेमध्ये एक गायन- नृत्य करणारी प्रसिद्ध कलावंत म्हणून नाव कमावले. तो एक काळ होता, जेव्हा तिला बंदुका, गुंड आणि गालिबच्या गझलांना हुलकावणी देऊन स्वतःची नियती घडवायची होती. मोठ्या कुटुंबाचा गुजारा करायचा होता. शिवाय मुलाला इंग्रजी माध्यमाच्या बोर्डिंग स्कूलमध्ये वाढवायचे होते.

या हृदयस्पर्शी आठवणीत, तिने कधीही बेताल न होता आपल्या मुलाजवळ तिच्या जगण्याची भावनांनी ओतप्रोत भरलेली अविश्वसनीय कहाणी प्रामाणिकपणे, औचित्यपूर्ण आणि खेळकर शैलीत कथन केली आहे.





मराठी पुस्तक

# इनुची गोष्ट

लेखक : युनूस सय्यद

**२७० पाने । ३५० रुपये**

एका मजुरी करणाऱ्या आईच्या पोटी जन्माला आलेल्या युनुसचा संघर्ष हा आधीच काही कमी नव्हता. वेटर, सेल्समन, सिक्युरिटी गार्ड मिळेल ते काम करत, तो पुण्यातील फर्ग्यूसन महाविद्यालयात शिकत अन् सोबत अधिकारी होण्याचं स्वप्नही बाळगून होता. अशात त्याच्या आयुष्यात नियतीने कॅन्सररुपी घाला घातला. आता इनु मरणार या विचाराने अख्खं कुटुंब उद्ध्वस्त झालं. पण आपल्या इनुकडे लढण्याची अन् आईला सुखाचे दिवस दाखविण्याची उमेदच निराळी होती. आईच्या चेहऱ्याकडे आणि संघर्षाकडे पाहून त्याला जगण्याची नवी उमेद मिळाली. आर्थिक तसेच बाकीच्या असंख्य अडचणी, त्यात अनेक असाध्य रोग एकाच वेळी त्याला झाले, अगदी मृत्यूच्या जवळ पोहोचूनही अखेरच्या श्वासापर्यंत लढत राहण्याचा चंग बांधलेल्या इनुने हिंमतीने कॅन्सरवर मात केली. त्याची ही मात फक्त असाध्य आजार झालेल्यांनाच नाही तर माझ्यासारख्या अनेकांना आयुष्याकडे बघण्याची नवीन उमेद आणि दृष्टी तर देतेच पण कोणत्याही परिस्थितीशी लढणाऱ्या प्रत्येकाने स्वानुभव असलेली ‘इनुची गोष्ट’ वाचावी आणि अंर्तमनात सांगवं की संघर्ष मान्य आहे “कारण अजून मी जिंवत आहे...”





मराठी पुस्तक

# बांधावरची बाभळ

## लेखक : प्रकाश नावलकर

**१७२ पाने । २८० रुपये**

वेगवेगळ्या कारणांनी आपलं गाव सुटतं, पण आपल्यातील गावपण कधी सुटत नाही. शहरापेक्षा आपला गावच बरा गड्या असं अनेकदा आपल्याला वाटतं. गावच्या आठवणींनी आपण भूतकाळात हरवून जातो. ज्या मातीत आपण जन्मलो, ज्या गावच्या पारावर बसून आपण जगातील घडामोडींवर गप्पा मारल्या, सुट्टीच्या दिवशी आपण ज्या नदी-नाल्याकाठी मनसोक्त हिंडलो, ज्या शेत शिवारात गुराढोरांच्या संगतीने आपण कष्ट केले, अशा गावपणाच्या आणि गावातील गावकी-भावकीच्या गोष्टीतून पुन्हा एकदा आपल्याला गावाकडे घेऊन जाणारा हा ग्रामीण कथासंग्रह...




मराठी पुस्तक

## हिंदूत्व

लेखक : प्रबोधनकार ठाकरे

**२१६ पाने । ३०० रुपये**

आजच्या महाराष्ट्राचा पाया विसाव्या शतकाच्या आरंभी घातला गेला आहे, तेव्हा महाराष्ट्राला वळण लावणाऱ्यांमध्ये थोर विचारवंत, लेखक, संपादक, नाटककार, इतिहासकार, सार्वजनिक नवरात्रौत्सवाचे प्रणेते, संयुक्त महाराष्ट्राचे नेते व शिवसेनेचे मूळ प्रेरणास्थान प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांचे नाव अग्रस्थानी घेणे उचित ठरेल. प्रबोधनकार ठाकरे यांनी जात-धर्माच्या नावाने द्वेष पसरवणाऱ्या तसेच हिंदू समाजातील अस्पृश्यता अंधश्रद्धा, हुंडा, बालविवाह यांसह अनेक रूढी-परंपरांना कायम विरोध केला. हिंदू समाज सुधारावयाचा असेल तर रूढी-परंपरा यांत सुधारणा करावीच लागेल, असे त्यांचे ठाम मत होते, प्रबोधनकार ठाकरे यांच्या विचारांनी समाजात बदल तर घडवलाच, परंतु पुढील पिढ्यावरही आपला ठसा उमटवला. त्यांनी धार्मिकतेच्या अर्थाला नवीन दृष्टिकोन दिला, त्यामुळे आजही त्यांच्या विचारांना महत्त्व आहे.




मराठी पुस्तक


# माणसे कशी जोडावी

## लेखक : डेल कार्नेगी

**२५८ पाने । २५० रुपये**

समाजात वावरताना तुमचा असंख्य लोकांशी संपर्क होत असतो. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात काम करत असाल मग ते व्यावसायिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्र किंवा नोकरीचे ठिकाण असो, या ठिकाणी वावरताना तुम्हाला माणसे जोडणे खूप गरजेचे असते. अशा वेळी लोकांशी संवाद साधताना आपल्याकडून कळत-नकळतपणे चुकीचे शब्द दिले जातात व चुकीची वागणूक दिली जाते. यामुळे समोरची व्यक्ती नाराज होऊन दुरावण्याची शक्यता असते. भविष्यकाळात आपल्याकडून अशा गोष्टी घडू नये म्हणून 'माणसं कशी जोडावी ?' हे पुस्तक तुम्हाला मित्र म्हणून मदत करेल. डेल कानेंगी यांनी सांगितलेली तंत्रे वेळोवेळी वापरून तुम्ही तुमच्या क्षेत्रात सर्वांना आवडणारी व्यक्ती व्हाल, याची निश्चित खात्री आहे.

सामाजिक, राजकारण, व्यावसायिक, नोकरी याचसोबत इतर प्रत्येक क्षेत्रात नेतृत्व करु इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल.




मराठी पुस्तक

# हिंदू पत पातशाह

लेखक : मयुर खोपेकर

**१८८ पाने । ३०० रुपये**


रायगड सज्ज झाला. नगारखान्यातून भंडारा उधळण्यास मावळे आतुरतेने वाट पाहू लागले. ढोल नगारे गडावर दुमदुमण्यास सज्ज झाले. वाजंत्री आपापल्या जागी येऊन उभे राहिले. सुहासिनी औक्षणासाठी जरीदार साड्या नेसून तयार झाल्या. सेवक अमात्यांकडे छत्र देण्यास आतुर झाला आहे. पहाटे सूर्योदयापूर्वीच्या अंधुक प्रहरी राजदरबार आता शिवाजी राजांचं न्वहं न्वहं स्वराज्याच्या पहिल्या छत्रपतींचे स्वागत करण्यास आतुर आहे. गेली अनेक शतके पारतंत्र्यात खिन्न असणारा महाराष्ट्र आता गुलामीची साखळी तोडू पाहत आहे.

आस्तेकदमSSS

आस्तेकदम 55s

आस्तेकदमSSS

हिंदुस्तानचे अभिषिक्त छत्रपती श्री शिवाजी महाराज राजदर्शनास येत आहेत होSSS





मराठी पुस्तक

## राजा बळी आपलाच आहे

लेखक : भिक्खुनी विजया मैत्रीय

**२४६ पाने । ३०० रुपये**

राजा बळी हे नाव आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. घरातील वडिलधाऱ्या बायकांच्या तोंडून ऐकतो की, दिवाळीत पूजा करताना लोक म्हणतात, "इडा पिडा जावो आणि बळीचे राज्य येवो" ही म्हण महाराष्ट्रात लोकप्रिय आहे. पण या म्हणीत उल्लेख झालेला हा 'बळी' कोण होता? या प्रश्नाचे उत्तर या पुस्तकात मिळेल. राजा बळीचं नाव केवळ महाराष्ट्रातच नाही, तर भारतभर घेतलं जातं. वरील म्हण फक्त मराठी किंवा हिंदीतच नाही, तर दाक्षिणात्य भाषांमध्येही बोलली जाते. आजही राजा बळी भारताच्या वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या नावांनी ओळखला आणि मानला जातो, यावरूनच राजा बळीच्या लोकप्रियतेचा अंदाज लावता येतो. अनेक लोक राजा बळीची पूजा करतात, भारतात अनेक ठिकाणी त्याची मंदिरे आहेत. राजा बळीचे राज्य पुन्हा यावे, अशी लोक प्रार्थना करतात.




मराठी पुस्तक

# चिंचपोकळी

लेखक : जी. के. ऐनापुरे

**२८० पाने । ३५० रुपये**

या कथांमध्ये गिरणगावाच्या उत्कर्षकालाचं वर्णन नाही; हासकाळाचं आहे. गिरण्या आणि गिरण्यांमधला रोजगार संपून गेला आहे आणि तरीही बुडण्याच्या अगोदर जिवाच्या एकांताने काडीचा आधार शोधत कसाबसा जीव वाचवण्याचा प्रयत्न हा समाज करू पाहतो आहे. पण प्रातिनिधिक पात्रांच्या माध्यमातून एक सरसकट सामाजिक विधान करण्याऐवजी लेखक या समाजाच्या पोटात शिरतो आणि पूर्ण समरस होणाऱ्या दृष्टीद्वारे वाचकाला एका स्वायत्त जगाची आतून सफर घडवून आणतो ते जीवन जगणं म्हणजे काय, ह्याची नकळत जाणीव करून देतो. यातला निवेदक कथाविश्वाकडे 'बाहेरून' बघत नाही; तो त्या विश्वाचा एक भाग आहे. नव्हे, तोसुद्धा कथांमधलं जणू एक पात्र आहे. यामुळे तो त्या विश्वाशी आणि त्या काळाशी समरस झाला आहे. त्याची वर्णनशैली सहज आहे. सहजतेच्या ओघात कधी तो माणसांबद्दल, जगण्याबद्दल, संस्कृतीबद्दल मूल्यविधान करतो; पण त्याला लेखकाने केलेले निर्णयविधान मानण्याचं कारण नाही. वाचताना समोर येतं, ते एक जीवनदर्शन. त्यातून कोणते निकष लावून कसल्या निष्कर्षाचं नवनीत बाहेर काढायचं, हे पूर्णपणे वाचकाचं काम.




मराठी पुस्तक


# डेबू ते गाडगेबाबा

लेखक : नितीन पखाले

**९८ पाने । २०० रुपये**

योगी आणि वैरागी हे दोन्ही भाव संत गाडगेबाबांमध्ये दिसतात. त्यांचे पुरोगामी विचार आजही समाजाला दिशादर्शक आहेत. आपण विद्यापीठास त्यांचे नाव दिले खरे, पण त्यांचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी काय केले? हा शोध महत्त्वाचा! त्यांचे विचार माणसांच्या मस्तकात शिरणे गरजेचे आहे.

गाडगेबाबा नावाचे चालते बोलते विद्यापीठ कधीच कुठल्या चौकटीत बंदिस्त होऊ शकत नाही. त्यांना समजून घ्यायचे असेल, तर त्यांचा रोकडा धर्म जाणून घेणे महत्त्वाचे आहे. लोक देवाच्या श्रध्देने एकत्र जमतात, भक्तीत तल्लीन होतात. त्यांच्या या श्रद्धेचा उपयोग अंधश्रद्धा, अन्याय आणि शोषण दूर करण्यासाठी करून घेण्याचा व्यवहारी विचार सामाजिक क्षेत्रात गाडगेबाबा आणि महात्मा गांधी या दोघांनीच केलेला पहायला मिळतो.




मराठी पुस्तक

# पेरियार मिथक आणि वास्तव

लेखक : दिपक गायकवाड

**४३२ पाने । ४५० रुपये**

एका योद्ध्यामध्ये असणारी आक्रमकता ही जर एका विचारवंतामध्ये उतरली, तर तो आपली विचारांची लढाई कसा लढतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे ई. व्ही. रामासामी उर्फ पेरियार, ‘पेरियार’ ही द्रविड जनतेने त्यांना त्यांच्या महान कार्याबद्दल दिलेली एक उपाधी आहे, जिचा अर्थ ‘महान व्यक्ती’ किंवा ‘आदरणीय व्यक्ती’ असा होतो. पेरियार यांच्या तत्त्वज्ञानाची महानता ते बहुसंख्य लोकांच्या किती कामी आले यावरून तोलायची ठरवली आणि पेरियार यांचे तत्त्वज्ञान एका पारड्यात व इतिहासातील इतर सर्व तत्त्ववेत्यांचे तत्त्वज्ञान दुसऱ्या पारड्यात ठेवून ते तोलले तर पेरियार यांच्या तत्त्वज्ञानाचेच पारडे अधिक जड होईल; इतके ते मानवजातीसाठी उपयोगाचे ठरणारे आहे. धर्माच्या परिघातून बाहेर पडून आणि नास्तिकतेचा धागा पकडून समाजसुधारणा घडवून आणणारे पेरियार हे देशातील त्यावेळचे एकमेव समाजसुधारक होते. त्यांनी आपल्या सुधारणा चळवळींनी दक्षिण भारतात जी क्रांती आणली, तशा प्रकारचे उदाहरण भारताच्या इतिहासात मागील दोन हजार वर्षांमध्येही सापडत नाही, असे गौरवोद्गार प्रसिद्ध अमेरिकन इतिहासकार जॉन रॅले यांनी पेरियार यांच्याविषयी काढले होते.




मराठी पुस्तक

# नेमका हात कोणाचा

लेखक : सागर काकडे

**१०४ पाने । २५० रुपये**

‘ तुमच्या एका गोळीवर माझेसुध्दा नाव लिहा ‘  या कवितेमार्फत लाखो रसिकांच्या मनात घर करणारे कवी.

२०१७ सालचा प्रतिष्ठित समजला जाणारा “ गदिमा “ आणि “ पद्मश्री नामदेव ढसाळ “ पुरस्कार प्राप्त कवी.

चंद्र सूर्य तारे यांच्या पलीकडे जाऊन समाजाप्रती आपलं वास्तव भान असणारा संवेदनशील कवी...त्यांच्या अश्याच प्रश्न मांडणाऱ्या , प्रश्न पडणाऱ्या , विचार करायला लावणाऱ्या कविता ह्या कविता संग्रहात तुम्हाला वाचायला मिळतील




मराठी पुस्तक


# फिर्याद

लेखक : दादासाहेब पाटील

**२१२ पाने । ३०० रुपये**

फिर्याद !! एक वास्तव आणि चित्तथरारक कादंबरी, जी ग्रामीण भागातील जगण्याच्या कठोर वास्तवांना तोंड देते. तुरुंगवासाला कारणीभूत ठरलेल्या भयंकर घटनांवर तुरुंगात असतानाच लिहिलेलं हे एक कठोर आत्मचरित्र आहे, ज्यात नायकासहित सर्वांचेच कठोर परीक्षण केले आहे. ज्या न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवून आपण सर्वजण जगतो, त्या व्यवस्थेवर देखील ही कादंबरी प्रश्नचिन्ह उभी करते आणि म्हणूनच, ही कादंबरी म्हणजे वाचकांसमोर केलेली एक आर्त फिर्याद आहे.

तुरुंगवास हा नेहमी दुहेरी असतो. आरोपीला शिक्षा होते; मात्र त्याच वेळेस त्याच्या कुटुंबाचा जो वनवास सुरू होतो, तो तुरुंगापेक्षा कमी नसतो. वर्चस्ववादी मानसिकतेतून कित्येक पिढ्या बर्बाद झाल्या आहेत. मी या कथेचा एक भाग आहे म्हणून नाही, तर निव्वळ एक वाचक म्हणून अनेकदा हे पुस्तक वाचले आहे, खोलवर विचार करायला लावणारी, खूप काही शिकवणारी आणि मनाला भिडणारी ही कादंबरी एकदा हातात घेतली की वाचून संपेपर्यंत खाली ठेवावीशीच वाटत नाही.




मराठी पुस्तक

## चे ग्वेरा

लेखक : प्रणित प्रविण पवार

**२२६ पाने । ३५० रुपये**

"जगाला तुम्हाला बदलू द्या, मग तुम्ही जग बदलू शकाल" हा संदेश देऊन हे वाक्य सत्यात उतरवणारा थोर क्रांतिकारक म्हणजे एर्नेस्तो 'चे' ग्वेरा.

एका छोट्या देशातून आलेल्या या अवलियाने आपल्या अवघ्या ३९ वर्षांच्या आयुष्यात जगासमोर केवळ क्रांतीचा नव्हे, तर आयुष्य कसं जगायचं तर 'Larger than life' हा महत्त्वाचा संदेश दिला.

क्रांतीच्या रणांगणात न डगमगता, शेवटच्या श्वासापर्यंत तो त्याच्या तत्वांसाठी लढत राहिला.

लेखक प्रणित पवार यांनी 'चे' च्या या खडतर आणि प्रेरणादायी प्रवासाचं केवळ दस्तऐवजीकरण न करता, त्याच्या वैयक्तिक जीवनातही डोकावण्याचा प्रयत्न केला आहे. ही केवळ एक क्रांतिकारकाची कहाणी नाही, तर त्याच्या मनाचा, संघर्षाचा, स्वप्नांचा आणि जगण्याच्या तत्त्वज्ञानाचा वेध घेणारी जिवंत आणि हृदयाला भिडणारी चरित्रकथा आहे.

क्रांती आणि जीवन दोन्हींच्या अर्थाचा शोध घेणाऱ्या प्रत्येकाने हे पुस्तक वाचायलाच हवं !




मराठी पुस्तक

# तुझ्यापुढे तर काहीच नाही


लेखक : अपूर्व राजपूत

**१०४ पाने । ३०० रुपये**

"मी लिहितो ते माझे नाही तुमचे आहे
माझी कविता माझी नसते सुचल्यानंतर"

असं तुमच्या आमच्या मनातलं लिहून असंख्य तरुण पिढीच्या , रसिकांच्या मनात घर करणारे समकालीन मराठी कवितेतील प्रसिद्ध कवी, गीतकार, गझलकार अपूर्व राजपूत यांचा पहिला प्रेम कवितासंग्रह.

आवर्जून वाचावा आणि संग्रही ठेवावा असा संग्रह.




मराठी पुस्तक

# तृष्णाकाठ

लेखक : वैभव देशमुख

**९६ पाने । २०० रुपये**

रिंगण, नाळ , कागर , घर बंदूक बिर्यानी, बापल्योक यांसारख्या अनेक प्रसिद्ध चित्रपटांचे गीतलेखन करणारे सुप्रसिद्ध कवी गीतकार गझलकार म्हणून नावाजलेले वैभव देशमुख सर यांनी आपल्या शब्दांनी संपूर्ण महाराष्ट्रात अनेक रसिकांच्या मनात घर केले.

बाजी , बापमाणूस, छोटी मालकीण, गर्जा महाराष्ट्र, आई तुळजाभवानी, कुण्या राजाची गं तू राणी यासारख्या अनेक लोकप्रिय मालिकांचे देखील शीर्षकगीतलेखन त्यांनी केले आहे.

त्यांनी लिहिलेल्या अनेक चित्रपटगीतांना आणि मालिकांच्या शीर्षकगीतांना सर्वोत्कृष्ट गीतकार पुरस्कारांनी गौरवलेले आहे.

कवितासंग्रह ‘तृष्णाकाठ’ला “यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ” आणि कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाशिकचा “विशाखा काव्य पुरस्कार” देखील मिळाला आहे




मराठी पुस्तक

# हे सारे गुलमोहर माझे


लेखक : वैभव देशमुख

**१२० पाने । २०० रुपये**

रिंगण, नाळ , कागर , घर बंदूक बिर्यानी, बापल्योक यांसारख्या अनेक प्रसिद्ध चित्रपटांचे गीतलेखन करणारे सुप्रसिद्ध कवी गीतकार गझलकार म्हणून नावाजलेले वैभव देशमुख सर यांनी आपल्या शब्दांनी संपूर्ण महाराष्ट्रात अनेक रसिकांच्या मनात घर केले.

बाजी , बापमाणूस, छोटी मालकीण, गर्जा महाराष्ट्र, आई तुळजाभवानी, कुण्या राजाची गं तू राणी यासारख्या अनेक लोकप्रिय मालिकांचे देखील शीर्षकगीतलेखन त्यांनी केले आहे.

त्यांनी लिहिलेल्या अनेक चित्रपटगीतांना आणि मालिकांच्या शीर्षकगीतांना सर्वोत्कृष्ट गीतकार पुरस्कारांनी गौरवलेले आहे.





मराठी पुस्तक

# मेलुहा ते भारत

लेखक : डॉ. नितीन हांडे

**२१२ पाने । ३०० रुपये**

विज्ञान हे जरी कल्पनाशक्तीतून जन्माला येत असले तरी या कल्पनाशक्तीला देखील क्षितिजाची मर्यादा असते. वळणाच्या पुढे गेल्यानंतर पुढचा रस्ता दिसू लागतो, त्याप्रमाणे उपलब्ध विज्ञानाच्या, माहितीच्या आधारेच पुढील शोध लागत असतात. विज्ञानाचा हा प्रवाह निरंतर वाहत आला आहे. अनेक शास्त्र, तत्त्वज्ञान आणि कलाशाखांचा जन्म तसेच विस्तार भारतात झाला आहे. आपल्याला आपल्या संस्कृतीचा अभिमान जरूर असावा, मात्र तो वृथा नसावा, अभ्यासामधून आलेला असावा. आपल्या संस्कृती, ज्ञान, साहित्य आणि कलेच्या गौरवशाली परंपरेचा तटस्थपणे अभ्यास करून तथ्यांची मांडणी करण्याचा 'मेलुहा ते भारत' हा प्रयत्न आहे. 'भारतामध्ये सर्व काही आधीच निर्माण झाले होते' आणि भारतात कधीच काहीच ज्ञान नव्हते अशी दोन विरुद्ध टोकाची मांडणी आपल्याला पाहायला, ऐकायला मिळतेः मग यात नक्की सत्य काय असेल? इतिहास हा अस्मितेशी जोडला जातो आणि अस्मिता ही नेहमी गौरवशाली परंपरेचा शोध घेत असते. मात्र ऐतिहासिक तथ्यांना तुमचे भावनेशी देणेघेणे नसते, तथ्य नेहमी वस्तुनिष्ठ असतात. इतिहासातील दुधात मिसळलेल्या पाण्याला वेगळे करण्याचा वस्तुनिष्ठ प्रयत्न या पुस्तकात केला आहे. सोन्याचा धूर निघतो अशी आख्यायिका असलेल्या भारतदेशाने हजार वर्षांपूर्वी विज्ञान, तत्त्वज्ञान आणि कलेच्या क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा 'मेलुहा ते भारत' हा आढावा आहे.




मराठी पुस्तक


## मराठा साम्राज्यसूर्य वजीर शहाजी भोसले

लेखक : प्रा. डॉ. आनंद पाटील (संकपाळ)

**३५४ पाने । ४०० रुपये**

प्रा. डॉ. आनंद पाटील (संकपाळ) हे क्षत्रिय मराठा समाजातील आंतरराष्ट्रीय तुलनाकार म्हणून मान्यता मिळालेले पहिले मराठी लेखक. खुल्या जागेवर जिद्दीने लढा देत गोवा विद्यापीठ इंग्रजी विभागप्रमुख आणि स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठाच्या भाषा आणि साहित्य संकुलाचे पहिले संचालक. परदेशवाऱ्या, मराठी कथा, कादंबऱ्या, प्रवास लेखने, नाटक, भाषांतरे आणि तुलना असे एकूण ६० ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. त्या दहा इंग्रजी ग्रंथांमुळे त्यांचा इंग्रजी निबंध केंब्रिज विद्यापीठाने पाठ्यपुस्तकात छापला आहे. (पाहाः गुगल विकीपीडिया). भारतभर त्यांची पुस्तके अभ्यासक्रमात आहेत. विशेषतः त्यांच्या ‘पाटलाची लंडनवारी’चा कन्नड अनुवाद कर्नाटकात प्रसिद्ध आहे.

स्वतःच्या संकपाळ-लाड वंशावळ्या मोडी लिपीत शोधण्यापूर्वीच त्यांनी भाषणे देण्याच्या निमित्ताने महाराष्ट्राला माहीत नसलेले सम्राट शिवाजी लिहिले आणि ते बेस्टसेलर ठरले आहे. रूढ इतिहासात भूकंपच झाला. लोकाग्रहास्तव त्यांनी संशोधन करून साम्राज्यशीर्य लक्ष्मी जिजाबाई खऱ्या कोण होत्या? प्रकाशनाच्या वाटेवर आहे. इजा बिजानंतर हा तिजा ‘मराठा साम्राज्यसूर्य वजीर शहाजी भोसले’ बौद्धिक इतिहासात ज्वालामुखी जागृत करेल असा विश्वास वाटतो.




मराठी पुस्तक

# संताजी घोरपडे जफतन मुलूख


लेखक : रवि शिवाजी मोरे

**४३२ पाने । ४५० रुपये**

छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांचं राज्य बुडालं या औरंगजेबाच्या भावनेला संताजींनी जोरदार तडाखा दिला. चार साडेचार वर्ष ब्रम्हपुरी या ठिकाणच्या काळ्या मातीत औरंगजेब बादशहा राहिला. त्याला कारण म्हणजे मराठ्यांचा सेनापती संताजी घोरपडे यांनी बादशहाला निर्माण केलेला धोका होय. वडू कोरेगावच्या बादशाही छावणीवर सन १६८९ साली जो धाडसी छापा संताजी यांनी घातला त्यांने बादशहाची झोपच उडाली. बादशहा मरता मरता त्या रात्री वाचला.

संताजीला ठार केल्याशिवाय बादशहाला ब्रम्हपुरीच्या छावणीतून बाहेर पडता येईना.

औरंगजेब बादशहा आणि मोगल राजवट ही आशिया खंडातील बलाढ्य राजवट होती. संताजी घोरपडे यांचा अलौकिक पराक्रमाचा दरारा या राजवटीवर एवढा पडला होता की मोगल सरदार संताजी घोरपडे यांच्या बरोबर युध्द प्रसंग पडल्यावर ते युध्द टाळण्याचा प्रयत्न करत. अशा या नर शार्दुल रणधुरंधरास स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांकडून मुजऱ्यास न येणे पासून ते ममलकतमदार ह्या पदवी पर्यंतचा प्रवास म्हणजे संताजी बाबा. संताजी घोरपडे यांच्या जीवनावर आधारित असलेली, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलगडणारी कादंबरी म्हणजे संताजी घोरपडे जफतन मुलूख.




मराठी पुस्तक

## भिडेवाडा द लिगल बॅटल

लेखिका : ॲड. निशा दाभाडे चव्हाण

**१०० पाने । २५० रुपये**

विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतिविना गती गेली, गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले।

महात्मा जोतीराव फुले लिखित या अखंडानुसार स्त्रीशूद्रातिशूद्र यांच्या जीवनाची अवनती विद्या नसल्यामुळे झाली, कारण विद्या घेण्याची मुभा, स्वातंत्र्य येथील चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेत स्त्रीशूद्रातिशूद्रांना नव्हते. ही ज्ञानबंदी तोडण्याचे क्रांतिकारी कार्य महात्मा जोतीराव फुले यांनी केले. १ जानेवारी १८४८ रोजी बुधवार पेठेतील तात्याराव भिडे यांच्या वाड्यात भारतातील मुलींची पहिली शाळा त्यांनी सुरू केली. महात्मा फुलेंच्या नेतृत्वाखाली सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातून सुरू झालेली ही पहिली मुलींची शाळा म्हणजे भारतातल्या स्त्री मुक्तीची पहाट आहे.

हा इतिहास डोळ्यांसमोर राहण्यासाठी त्याच्याशी जोडलेल्या जागा, वास्तू जपल्या आणि जोपासल्या पाहिजेत. मानवी इतिहासातील पराक्रम दाखवणाऱ्या त्या खिडक्या असतात. लोकांचा न्यायालयातील लढा आमच्यासारखे चळवळे कार्यकर्ते करतात. असे विषय न्यायालयात अडकले की त्यातून सुटका मिळण्यात बराच काळ जातो. भिडेवाड्यासंदर्भात लढवला गेलेला न्यायालयीन लढा, हा याची साक्ष आहे. त्यात प्रत्यक्ष असणाऱ्या ॲड. निशा दाभाडे चव्हाण यांनी त्याची नोंद या पुस्तकात केली आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजे.





मराठी पुस्तक

# इंजिनिअरची गोष्ट

लेखक : विशाल अवचिते

**३०६ पाने I ३८० रुपये**

दरवर्षी हजारो इंजिनिअर पदवी घेऊन बाहेर पडतात, मात्र योग्य दिशा, मार्गदर्शन आणि आत्मविश्वासाच्या अभावामुळे त्यांची अनेक स्वप्नं धुसर होतात. "इंजिनिअरची गोष्ट" हे अशाच एका सामान्य तरुणाचं अनुभवाधिष्ठित कथन आहे – ज्यात संघर्ष आहे, धडपड आहे, आणि प्रत्येक वळणावर शिकण्यासारखी मौल्यवान शिदोरी आहे. हे पुस्तक आत्मकथन नसून, शालेय शिक्षणानंतर करिअर निवडण्यापासून ते नोकरीत यशस्वीपणे उच्चपदी स्थिरावण्यापर्यंतचा एक रोमांचक प्रवास आहे. करिअर नियोजन, आवश्यक स्किल्स, टेक्निकल नॉलेज, मुलाखतीची तयारी आणि कॉर्पोरेट जगतातील वास्तव समजून घेण्यासाठी यातील स्वअनुभवावर आधारित केलेलं कालसुसंगत व्यावहारिक मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरेल. ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या, मर्यादित साधनांमध्येही मोठं स्वप्न बाळगणाऱ्या तरुणाची ही खरीखुरी व आपली वाटणारी कहाणी – आजच्या तरुणाईला दिशा, प्रेरणा आणि नवी उमेद देणारी ठरेल. विद्यार्थी, पालक, इंजिनिअर, नवउद्योजक किंवा जॉब शोधणारे इंजिनिअर, नोकरी करणारे इंजिनिअर – सर्वांसाठीच हे पुस्तक एक विश्वासार्ह मार्गदर्शक आणि प्रेरणादायी सोबती ठरेल!




## जीएंच्या तीस कथा

लेखक : डॉ. संजीव कुलकर्णी


**१२८ पाने । २५० रुपये**

जी. ए. कुलकर्णींच्या कथा या माणसाच्या, माणसाच्या आयुष्याच्या आणि मानवी आयुष्यातल्या गुंतागुंतीच्या कथा आहेत.

माणसाच्या इच्छा, आकांक्षा, वासना, स्वाभिमान, लोभ, हव्यास, स्वार्थ अशा अनेक भावनांनी माणसाचे आयुष्य म्हणजे एक जटील गुंतवळ होऊन बसली आहे असे जीएंना वाटत असले पाहिजे. या गुंतवळीचा एकेक धागा उसवत बसणे म्हणजेच आयुष्य. पण असे करणे हेही सोपे नाही, माणसाच्या स्वाधीन नाही. यापलीकडे माणसाच्या योजनांवर विरजण टाकणारी नियती नावाची अगम्य शक्ति आहे हे जीएंच्या लेखनाचे तत्त्वज्ञान आहे.

तथापि जीएंच्या कथा म्हणजे फक्त मानवी जीवनाच्या शोकांतिकेचे चित्रण असे नाही. अपवादाने का होईना, जीएंनी सुखांतिका लिहिल्या आहेत, त्यांच्या खास शैलीचे विनोदी लेखन केले आहे. माणसाचे आयुष्य अगदी बारकाईने निरखणारे जीए आपल्या कथांच्या रचनेतही वैशिष्ट्य आणि वैविध्य आणतात. वरकरणी साध्या वाटणाऱ्या जीएंच्या कथा अभ्यासकाच्या नजरेतून वेगळ्याच घाटाच्या, वेगळ्याच रंगाच्या दिसतात.

'जीएंच्या तीस कथा : अनुभूती आणि आस्वाद' या पुस्तकात जीएंच्या कथांचा प्रातिनिधिक वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. काही परिचित, काही थोड्या अपरिचित अशा जीएंच्या कथांमधले सौदर्य उलगडून दाखवण्याचा हा प्रयत्न आहे.




# GREENFIELD AMBITION

Writer : Dr. MOHAN NINAWE


**292 Pages | 400 rs**

"Greenfield Ambition: Navi Mumbai International Airport" captures the thrilling journey of one of India's most ambitious and visionary infrastructure projects. This book chronicles the remarkable story of the airport's development, showcasing the courage, determination, and transformative vision that shaped its creation.

From its inception to its historic milestones, the book delves into every crucial aspect of the project. It provides an insightful account of the strategic steps taken to secure government approvals, the efforts to build strong partnerships, and the meticulous handling of the competitive bidding process. The airport's strategic location and vision have positioned it as a future global aviation hub.

Highlighting the project's commitment to social equity and environmental sustainability, the book offers an in-depth exploration of the extensive preparatory work undertaken to strengthen transportation infrastructure. It also sheds light on CIDCO's leadership in steering the project toward success.

More than just a documentary record, this book is an inspiring narrative, a guiding force for future planners, policymakers, and ambitious visionaries.




# ग्रिनफिल्ड ॲम्बिशन

लेखक : डॉ. मोहन निनावे


**३१६ पाने I ४०० रुपये**

ग्रिनफिल्ड ॲम्बिशनः नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ’ हा भारतातील सर्वात महत्त्वाकांक्षी आणि दूरदृष्टीपूर्ण पायाभूत प्रकल्पांपैकी एकाचा रोमांचकारी प्रवास आहे. या पुस्तकात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उभारणीच्या प्रवासाची कहाणी सांगितली आहे, ज्यात धैर्य, जिद्द, आणि परिवर्तनाची अद्वितीय कथा उलगडते.

प्रकल्पाच्या सुरूवातीपासून त्याच्या ऐतिहासिक टप्प्यांपर्यंत, पुस्तक प्रत्येक महत्वाच्या पैलूला समर्पित आहे. शासकीय मंजुरी मिळवण्यासाठी घेतलेली धोरणात्मक पावले, सशक्त भागीदारी निर्माण करण्याचे प्रयत्न, आणि स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेला यशस्वीरित्या हाताळले जाणारे प्रत्येक तपशील स्पष्टपणे समजावले आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे भौगोलिक स्थान आणि दृष्टीकोनामुळे ते जागतिक विमानवाहतूक केंद्र बनले आहे.

सामाजिक समता आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन यासाठी प्रकल्पाची निष्ठा दर्शविणारे पुस्तक, विकास पूर्व कामांमुळे परिवहन पायाभूत सुविधा मजबूत करण्यात घेतलेले परिश्रम आणि सिडकोचे नेतृत्व कसे प्रकल्पाच्या प्रगतीला दिशा देत राहिले, याचे समर्पक विवेचन करते.

हे पुस्तक केवळ एक दस्तऐवज नाही, तर एक प्रेरणादायी कथा आहे जी भविष्यातील नियोजनकार, धोरणकर्ते आणि प्रत्येक महत्त्वाकांक्षी व्यक्तीसाठी मार्गदर्शक ठरते.




# शहीद-ए-आझम भगत सिंह

लेखक : प्रतिक पाटोळे


**२९६ पाने । ३५० रुपये**

"वो मुझे मार सकते है, लेकीन मेरे विचारों को नहीं मार सकते!" असे ठणकावून सांगणारा विचारवंत आणि बलिदानाचे प्रतीक म्हणजे भगतसिंह. स्वातंत्र्याच्या क्रांतीची मशाल प्रत्येक तरुणाच्या काळजात बिंबवणारा क्रांतिकारी म्हणजे भगतसिंह.

आपल्या ज्वलंत कार्यातून जगभरातील संघर्ष करणाऱ्या प्रत्येक तरुणाईचे भगतसिंह दीपस्तंभ आणि प्रेरणास्थान आहे. त्यांच्या वेगवेगळ्या पैलूंविषयी मराठी लेखकांनी फार कमी लिहिले आहे. बंड, युद्ध आणि क्रांती यांचे बीज पुस्तकाद्वारे आधी मेंदूत पेरावे लागतात, नंतरच ते बीज स्वाभिमानाचे आणि सन्मानाचे फळ देते. प्रतीक सारखे तरुण येणाऱ्या पिढीसाठी आश्वासक चेहरे आहेत. वारसा हा विचारांचा असतो. प्रतीक पाटोळेसारखी मुलं तो वारसा सांभाळत आहेत.

फाशीने भगतसिंहाला जरी मृत्यू दिला असला तरी त्यामुळे प्रत्येक तरुणाच्या मनात स्वातंत्र्य आणि समतेची भावना आजही जिवंत आहे

इन्कलाब जिंदाबाद...!




# अब मेरा क्या!


लेखक : देवीदास तारु

**१७४ पाने I २८० रुपये**

मराठी में प्रतिवर्ष दो दर्जन से भी अधिक आत्मकथाएं (मराठी में कुछ समीक्षक आत्मकथा शब्द के स्थान पर स्वकधन शब्द का प्रयोग करते हैं।) प्रकाशित होती हैं। ये आत्मकथाएं अधिकतर उन व्यक्तियों की होती हैं जो शोषित, पीडित, दलित वर्ग से आते हैं। उन सब से भिन्न ऐसी यह प्रस्तुत आत्मकथा है।

एक ऐसे युवक की यह आत्मकथा है जिसका जन्म दलित जाति में, झोपड़ी में, भयंकर दरिद्री अवस्था में जीने वाले परिवेश में हुआ। वहाँ का पूरा माहौल यह कुसंस्कारों का ही था। परिणाम आयु के साथ ८ साल से ही यह बालक चोरी करने लगा, बीडिया पीने लगा, शराब पीने लगा, बिना टिकट यात्रा करने लगा, मारपीट करने लगा। माँ उसे स्कूल में डालती हैं। परंतु वह स्कूल जाने का नाटक करता है और दिन भर आवारा गर्दी करते घूमता है। इस कारण चाप उसे बेतहाशा पीटता था। हालांकि बाप था मजदूर पर पक्का शराबी। उम्र के दसवें वर्ष में अधिकतर लड़के चौथी कक्षा में जाते हैं परंतु यह उम्र के १५ वर्ष में चौथी में ही था। उसके सुधरने की संभावना ही नहीं है ऐसी अवस्था आ चुकी थी।

परंतु एक बार बौद्ध विहार में आए एक व्यक्ति ने वहाँ इकट्ठे प्रत्येक लड़के से प्रश्न पूछा, 'तू है कौन' इन तीन शब्दों ने आत्मकथाकार को परेशान कर दिया। वह जन्मत प्रतिभा सपन्न, असामान्य बुद्धि का था। परंतु गलत दिशा में चला गया था। इस पश्न से उसे आत्मसाक्षात्कार हो जाता है। और वह आवारागर्दी से बाहर आकर अपना पूरा ध्यान अध्ययन पर लगाता है। घोर दरिद्रता से संघर्ष करते हुए वह एम. ए., एम.एड., पीएचडी. हो जाता है। शिक्षक बन जाता है। और कुछ ही उर्षो में महाराष्ट्र राज्य का आदर्श शिक्षकपुरस्कार भी प्राप्त कर लेता है। अलावा इसके भारत सरकार के कई पुरस्कार उसे मिलते हैं। उसकी यह प्रगति आश्चर्यजनक है। जिद्ध हो, महत्वाकाक्षा हो, जिज्ञासा हो तो व्यक्ति कहाँ से कहाँ चला जाता है इसका प्रमाण है यह आत्मकथा ।





## I made it happen

Writer : Devidas Taru

**196 Pages I 300 Rs**

Devidas' autobiography is a significant battle to get out of the disparity of the system by creating oneself anew. Devidas's courageous struggle to break out of the stifling and crippling system is nothing short of awe-inspiring. In this conflict, there is Self-esteem, Sattva, Tattva and the great energy that emanates from the ideology of Phule Ambedkar. Being a over-aged student once, he was the laughing stock of many; now he teaches them. He becomes a member of the board that creates a book for them. He does and accomplishes many things. While presenting 'self' in this autobiography, he also makes a comment on the surrounding environment. This autobiography is different in inspiring the students and youth, to give a new meaning to those who want to take a leap. In short, it is an inspiration to become a human being.




# शाहरुख खान

लेखिका : मोहर बसू । भाषांतर : प्रतिक पुरी

**३३० पाने । ४०० रुपये**

एक सुपरस्टार म्हणून कॅमेरे आणि बातम्यांचा विषय होणाऱ्या शाहरुख खानविषयी खूप काही लिहून आले आहे- त्याची उत्कटता, त्याचे कौशल्य, त्याची माणुसकी आणि तो सगळीकडे पसरवत असणारे प्रेम. पण बातम्या, चित्रपट आणि तारांकित व्यक्तिमत्त्वाच्या पलीकडे त्याच्यात एक माणूस आहे, जो त्याच्या सतत वाढत असलेल्या असंख्य चाहत्यांसाठी अनेक अर्थाने खूप काही आहे.

राहुल रायचंद असो किंवा राज मल्होत्रा, मोहन भार्गव असो किंवा रिझवान खान, अमन माथुर असो किंवा कबीर खान अशा अनेक भूमिका आहेत, ज्या 'किंग खान' याने आपल्या चित्रपटात निभावल्या. ज्या लाखो चित्रपटप्रेमींच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या आहेत. या पुस्तकातून एका स्टार कलाकाराचे प्रेरक आयुष्य रंगवण्यात आले आहे आणि जगाच्या कानाकोपऱ्यातील लोकांसाठी तो काय आहे हेही सांगण्याचा प्रयत्न आहे- मग तो पॅरिस येथील टॅक्सीचालक असो, लंडनमधली आयरिश बाई असो, पाकिस्तान येथील एकाच कुटुंबातील तीन पिढ्यांमधील स्त्रिया असो वा आशिया, युरोप, अमेरिका, कॅनडा, मध्य पूर्व आणि अर्थातच भारतातील त्याचे असंख्य चाहते असो.

शाहरुखच्या कारकिर्दी विषयीचे हे पुस्तक जसे स्तुतिगीत आहे, तसेच त्याच्यातल्या कलाकाराला वाहिलेली आदरांजलीही आहे. हा अशा एका माणसाच्या अनेक जिव्हाळ्याच्या गोष्टी, चाहत्यांच्या आठवणी आणि कधीही न पाहिलेल्या छायाचित्रांचा संग्रह आहे, जो जगातील अर्ध्याहून जास्त लोकांच्या हृदयांवर राज्य करतो- एक लिजेंड, एक आयकॉन, एक स्टार - शाहरुख खान.




## मी कोण आहे?

लेखक : ओशो ।

**२५० पाने । ४०० रुपये**

तुमच्या आत प्रश्न आहेत ?

तुमच्या आत तुमचे प्रश्न आहेत ?


हे आयुष्य तुमच्या मनात प्रश्न उठवत नाही का?

हे आयुष्य तुम्हाला कुतूहलाने भरून टाकत नाही का?

हे आयुष्य तुमच्यासमोर प्रश्न उपस्थित करत नाही का, की मी कोण आहे? हे काय आहे?

तुम्ही ठार बहिरे आणि आंधळे आहात का? तुमच्या हृदयात कोणते, कोणतेच कुतूहल जागे होत नाही का?

जर जागे होत असेल एखादे कुतूहल, जर उठत असेल एखादा प्रश्न, जर मनात जागी होत असेल एखादी तहान समजून घेण्याची, ओळखण्याची, आयुष्याचे सत्य मिळवण्याची, तर ती एकत्र करून घ्या आणि त्याला एक प्रश्न होऊ द्या. कारण जो इतर गोष्टींसंबंधी काही विचारायला जातो, तो दूर निघून गेला आहे, त्याने मूलभूत प्रश्न मागे सोडून दिला आहे. मूलभूत प्रश्न तर स्वतःपासूनच सुरू होतो मी कोण आहे?





## अ सडन क्लॅस ऑफ थंडर

लेखक : ओशो

**२७६ पाने । ३८० रुपये**

अनेक झेन कथा आणि प्रश्नांना दिलेली उत्तरे यांच्या माध्यमातून ओशो, अहंकाराची ओळख करून देण्यासाठी, स्व म्हणजे जे काही आहे ते तिथंच आहे, या कल्पनेवर आघात करण्यासाठी विनोदाचा वापर करतात. 'एक अनपेक्षित बदल, एक अकल्पित वज्राघात, एक असातत्य' आणि मनाचं बंधन गळून पडतं. या पुस्तकात वेगवान, सोप्या प्रक्रिया आहेत, ज्यांचा रोजच्या सामान्य जगण्यात जाणीव-जागृती होण्यासाठी उपयोग होऊ शकतो.





## जिंजी मराठ्यांची दक्षिणेतील राजधानी

लेखक : अमर श्रीरंग साळुंखे

**३६८ पाने । ४०० रुपये**

जिंजी हा केवळ एक किल्ला नाही, तर छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी, छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, छत्रपती राजाराम महाराजांचे धीर गंभीर व तितकेच मुत्सद्दी नेतृत्व, तसेच हरजीराजे, धनाजी, संताजी, बहिर्जी यांसारख्या ज्ञात-अज्ञात वीरांच्या पराक्रमाचा आणि त्यागाचा साक्षीदार आहे.

शिवछत्रपतींचा पदस्पर्श लाभलेल्या जिंजीने स्वातंत्र्य आणि स्वाभिमान टिकवण्यासाठी मराठा साम्राज्याच्या चरणी तब्बल वीस वर्षे वाहिली आणि केवळ दगड-मातीच्या ढिगाऱ्यातून उभ्या राहिलेल्या निर्जीव किल्ल्यांप्रमाणे स्वतःची प्रतिष्ठा सांभाळण्यापेक्षा मुघलांच्या विरोधात दंड थोपटून स्वतःला झुंजार शिलेदार म्हणून अजरामर करून घेतले. त्या झुंजार शिलेदाराची ही संशोधनात्मक यशोगाथा.




# छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवकाळ


लेखक : सर यदुनाथ सरकार

**४५८ पाने । ४५० रुपये**

कल्पना करा... सह्याद्रीच्या कड्याकपारीतून घुमणारी मावळ्यांची 'हर हर महादेव'ची युद्धगर्जना, रयतेसाठी अहोरात्र झटणारा एक महान राजा आणि पराकोटीच्या संघर्षातून उभे राहिलेले स्वराज्याचे देखणे स्वप्न; ही केवळ इतिहासाची निर्जीव पाने नाहीत, तर ती आपली अस्मिता आहे. आपल्या रक्तातील स्वाभिमानाची ती एक जिवंत गाथा आहे!

सर यदुनाथ सरकार यांच्या 'शिवाजी अँड हिज टाइम्स' या प्रसिद्ध इंग्रजी ग्रंथाचा 'छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवकाळ' हा मराठी अनुवाद तुम्हाला त्याच प्रेरणादायी शिवकाळात घेऊन जाईल. या ग्रंथातून तुम्ही महाराजांचे केवळ पराक्रम वाचणार नाही, तर त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व, त्यांचे राजकीय चातुर्य, त्यांनी दुरदृष्टीने घेतलेले निर्णय आणि रयतेच्या कल्याणासाठी त्यांनी सोसलेल्या हालअपेष्टाही अनुभवणार आहात. आजच्या माहितीच्या वेगवान युगातही आपल्याला महाराजांच्या नेतृत्वगुणांची, संकटांवर मात करण्याच्या वृत्तीची आणि नैतिक मूल्यांची किती गरज आहे, हे या ग्रंथातून आपल्याला उमजेल. हा ग्रंथ वाचताना तुमच्या डोळ्यासमोर उभा राहील तो केवळ इतिहास नसेल, तर एक जिवंत प्रेरणास्रोत असेल; जो तुम्हाला पावलोपावली मार्गदर्शन करेल आणि तुमच्या मनात ध्येयप्राप्तीच्या महत्वाकांक्षा निर्माण करेल.

मराठी वाचकांसाठी हा ग्रंथ केवळ एक ज्ञानाची पर्वणीच नाही, तर आपल्या पूर्वजांच्या त्यागाची आणि स्वप्नांची एक भावनिक साद आहे. हा अनमोल ऐतिहासिक ठेवा आपल्या संग्रही असायलाच हवा, कारण तो आपल्याला केवळ भूतकाळात रमवत नाही, तर वर्तमान आणि भविष्यासाठी एक उज्ज्वल मार्गही दाखवतो. आपल्या भावी पिढीला छत्रपती शिवाजी महाराज समजावून सांगण्यासाठी, प्रत्येक संवेदनशील मराठी पालकासाठी हा ग्रंथ म्हणजे जणू एक गृहपाठच आहे.




# सह्यजिनशी


लेखक : निरांकुश

**९८ पाने । २५० रुपये**

'सह्यजिनशी' हा काव्यसंग्रह केवळ शब्दांची कलाकुसरच नाही, तर तो स्वराज्याच्या इतिहास आणि भूगोलाचा उमटलेला एक भावनिक प्रतिध्वनी आहे. यातील प्रत्येक कविता ही उर्जेचा एक प्रवाह आहे. सह्याद्रीच्या उत्तुंग शिखरांसारखीच या संग्रहातील प्रत्येक कविता वाचकाच्या मनाला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाते. इथे शौर्य आहे, त्याग आहे, स्वाभिमान आहे आणि त्याचबरोबर काळाच्या ओघात हरवत चाललेल्या मूल्यांची चिंतनपर मांडणीही आहे. कवीने केवळ भूतकाळातील वैभवाचे गुणगान केले नाही, तर वर्तमान स्थितीवरही भाष्य केले आहे, जे या संग्रहाला एक व्यापक परिमाण देते.

कवी 'निरांकुश' म्हणजेच अंकुश पाटील यांनी इतिहास म्हणजे केवळ सनावळीतील घटना, किंवा गडकिल्ले म्हणजे केवळ दगडी बांधकाम; या दृष्टीने न पाहता, आपल्या संवेदनशील लेखणीतून इथल्या मातीचा सुगंध, इथल्या इतिहासाचा गौरव आणि इथल्या कणखर माणसांची गाथा शब्दबद्ध केली आहे. त्याबद्दल त्यांचे धन्यवाद.

'सह्यजिनशी' हे नावच या संग्रहाचा वेगळेपणा दाखवते. सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यांतून वाहणाऱ्या वाऱ्याप्रमाणेच या कविता आपल्या मनात नवऊर्जा भरतात. ज्या आत्म्याला स्पर्श करतात. या कवितांमधून कवीने महाराष्ट्राच्या गडकिल्ल्यांच्या संस्कृतीचे, तिच्या वारशाच्या चैतन्याचे स्मरण केले आहे.




# तुमची सर्वोच्च समृद्धी जाणा!

लेखिका : जीएम

**२८४ पाने । ३५० रुपये**

"तुमची सर्वोच्च समृद्धी जाणा!" हे पुस्तक जगभरातील प्रामाणिक साधकांना त्यांच्या आत असलेल्या अज्ञात आणि दुर्लक्षित अंतिम सत्य जाणून घेण्यास मदत करण्यासाठी लिहिले गेले आहे. येथे, जन्म आणि मृत्यूच्या पलीकडे शाश्वत सत्य जाणून घेण्यासाठी प्रत्येक प्रामाणिक साधकाला मदत करण्यासाठी आत्म्याचे ज्ञान अधिक तपशीलवार स्पष्ट केले आहे.

जीएम म्हणतात की, आपण स्वतःबद्दल जागरूक नसतो किंवा ही जाणीव काय आहे हे आपल्याला माहीत नसते ! जीएम यावर भर देतात की स्थिरतेत सतत राहून आपण द्वैतता ओलांडू शकतो आणि आपले अद्वैत सर्वोच्च वास्तव जाणून घेऊ शकतो.

जीएम यांची 'शिकवण' थेट स्त्रोतातून येते आणि प्रत्येक 'उत्तर' धनुष्याच्या बाणाप्रमाणे स्त्रोताकडून येते. जीएम यांनी दिलेले प्रत्येक उत्तर हे व्यक्ति'त्वाने ग्रस्त असलेल्या साधकांसाठी एक औषध आहे. जीए' नेहमी जाणिवेबद्दल आणि तिच्या स्वरूपाबद्दल बोलतात.

जीएम म्हणतात, "कोणीही कधीही जन्माला येत नाही, जे जन्माला येते ते अवकाशात जन्म आणि मृत्यूसह केवळ एक स्वप्न आहे." जीएम यांची उत्तरे तेजस्वी आहेत आणि वाचकांना सहजतेने स्थिरतेत राहण्यास प्रवृत्त करतात. जे साधक अनेक दशकांपासून ध्यान करत आहेत आणि अजूनही त्यांच्या सर्वोच्च समृद्धीबद्दल अनभिज्ञ आहेत, त्यांना हे पुस्तक स्वतःमधील अंतिम सत्य शोधण्यासाठी प्रोत्साहित करते.




# अपनी सर्वोच्च समृद्धि को जानो !

लेखिका : जीएम


**२८८ पाने । ३५० रुपये**

"अपनी सर्वोच्च समृद्धि को जानो" यह किताब दुनिया भर के सच्चे साधकों को उस परम सत्य को जानने में मदद करने के लिए लिखी गयी है, जो आत्मज्ञान की कमी के कारण अज्ञात और अनदेखा रह जाता है। यहाँ, आत्मज्ञान को अधिक विस्तार से समझाया गया है ताकि हर सच्चे साधक को जन्म और मृत्यु से परे शाश्वत सत्य को जानने में सहायता मिल सके।

जीएम कहती हैं हम न तो स्वयं के प्रति सचेत हैं और न ही यह जानते हैं कि 'चेतना' क्या है। जीएम इस पर जोर देती हैं कि निरंतर शांति में स्थित रहकर हम द्वैत को पार कर सकते हैं और अपनी अद्वैत सर्वोच्च वास्तविकता को जान सकते हैं।

जीएम की शिक्षाएँ सीधे स्रोत से आती हैं, और उनका हर उत्तर स्रोत से ऐसे निकलता है जैसे धनुष से निकला तीर। जीएम का हर उत्तर उन साधकों के लिए एक दवा है, जो व्यक्तित्व के कारण पीड़ित हैं। जीएम चेतना और उसकी प्रकृति के बारे में बात करती हैं।

जीएम कहती हैं, "कोई भी कभी जन्म नहीं लेता; जो जन्म लेता है, वह केवल एक स्वप्न है, जिसमें अंतरिक्ष में जन्म और मृत्यु भी शामिल हैं।" जीएम के उत्तर प्रभावशाली हैं और पाठकों को सहजता से शांति में स्थित होने के लिए प्रेरित करते हैं। यह पुस्तक उन साधकों को प्रोत्साहित करती है जो दशकों से ध्यान कर रहे हैं और फिर भी अपनी सर्वोच्च समृद्धि से अनभिज्ञ हैं, ताकि वे अपने भीतर विद्यमान शाश्वत सत्य का अन्वेषण कर सकें।




## शंभुगाया

लेखक : अभि मुंडे

**१६६ पाने I ४०० रुपये**

इतिहास के पन्नों में कई महापुरुषों की जीवन गाथाएं बड़े शान से दर्ज है। उनका बचपन, युवाकाल, संघर्ष, उपलब्धियां और यहीं नहीं बल्कि उनका साहित्य, व्यक्तित्व एवं गौरव कथाएं, यहां तक के उन पुण्य आत्माओं का मृत्यु और उसके बाद भी इस वर्तमान में उन्हें मिल रहा सम्मान ! आमतौर पर कहा जाए तो सारी जीवन गाथाओं का यही एक गणित सब जानते हैं, या फिर यूं कहूं कि कलतक जानते थे। क्योंकी इस मात्रभूमि में जन्में एक वीर की गाथा ऐसी भी है जो इस गणित को खंडित करती है। उसी वीर की जीवनधारा सत्य को साक्षी रखकर मेरी रची पंक्तियों मैं दिखाने का मैंने केवल साहस किया है।





# मानवजातीची कथा

लेखक : हेन्री थॉमस । भाषांतर : साने गुरुजी

**४४४ पाने । ४५० रुपये**

काळानुसार मानवी जीवन, भाषा आणि संस्कृती बदलत जाते, तसेच अनेक संदर्भ काळाच्या पटलावर नाहीसे होत जातात किंवा गरजेनुसार ते अद्ययावत होतात. त्यामुळे येत्या काळाच्या हाका ऐकून गतकाळातील चांगला, ताकदवर आशय वाचकांना उपलब्ध करून देणे, हे आपले कर्तव्य आहे. या भूतकाळातील घटनांचे समकाळात आता पुन्हा नव्याने उत्खनन का केले जात आहे, असाही प्रश्न वाचकांच्या मनात उपस्थित होऊ शकतो. परंतु आपल्या भूतकाळात जोरकसपणे मारलेल्या हाका कान देऊन ऐकणे, हे आपले कर्तव्य आहे. आज आपण जिथे आहोत. तिथपर्यंत पोहचत असताना आपले पूर्वज कोणत्या खाचखळग्यांतून गेले, त्यांना कोणती दिव्ये पार पाडावी लागली, याची जिवंत अनुभूती आपल्याला 'मानवजातीची कथा' या ग्रंथाच्च्या माध्यमातून घेता येते.

आज आपण ज्या संस्कृतीत जगत आहोत, ती प्राप्त होण्यासाठी आपल्याला हजारो वर्षे लागली. जग जर युद्धमुक्त असतेः या लढायांचा खणखणाट व दणदणाट जगात नसता, तर एवढी प्रगती आपण पाच शतकांत करू शकलो असतो. या भूतलावरून युद्ध ही वस्तू आज नष्ट झाल्याशिवाय खऱ्या प्रगतीला सुरुवात होणार नाही. हाच संदेश या ग्रंथाच्या माध्यमातून हेन्री थॉमस यांनी दिला आहे. आपल्याला शिकण्याची इच्छा असेल, तर इतिहासाने सर्वात महत्त्वाची अशी शिकवलेली ही गोष्ट आहे. एकूणच 'मानवजातीची कथा' म्हणजे हेन्री थॉमस यांच्या माध्यमातून काळाने सांगितलेली ही स्वतःचीच कथा आहे.




**वाघनख**

लेखक : प्रवीण भोसले

**२६६ पाने । ३५० रुपये**


अफजलवधाच्या पडद्यामागे !

प्रतापगडापाशी अफजलखानासह त्याच्या सैन्याचा शिवरायांनी केलेला नाश जितका सांगितला गेलाय, तितकाच अजूनही सांगायचा राहिला आहे. अफजलवधाचा श्रीगणेशा झाला तो वाघनखाच्या माऱ्याने आणि शेवट झाला खानाचे मुंडके कापण्याने ! निर्णायक क्षणी कोण विजयी होणार याचा निकाल लावणारे महाराजांचे ते वाघनख, इतिहासात मानाचे स्थान पटकावून बसले आहे.

हे जसे होते महाराजांचे वाघनख, तसेच असते ऐतिहासिक पुराव्यांचे वाघनख ! महाराजांचे वाघनख मुठीत लपलेले अगदी लहानसे हत्यार ! असेच इतिहासाच्या मूळ कागदपत्रात झाकले गेलेले त्रोटक पण महत्त्वाचे पुरावे हीसुद्धा वाघनखेच! ही पुराव्यांची वाघनखे खोट्या इतिहासाच्या चिंध्या करतात, अनेक घटनांचे वेगळे अर्थ समोर आणतात आणि नव्या इतिहासाची भरदेखील घालतात !

यातून अनेक अनपेक्षित बाबी समोर येत जातात. आपल्याला माहिती असलेल्या अफजलवधाच्या पडद्यामागे काय काय दडले आहे ते दिसते. आणि या सर्वांचा मेळ घालून अफजलवध जसा आहे तसा स्पष्ट केल्याशिवाय अफजलवधाची गोष्ट संपतच नाही.

अफजलवधाचा निरनिराळ्या कोनातून समग्र लेखाजोखा म्हणजे हे ‘वाघनख’ !




# रजनीकांत द डेफिनेटिव्ह बायोग्राफी


लेखक : नामन रामचंद्रन । भाषांतर : पराग पोतदार

**३७६ पाने । ४५० रुपये**

चित्रपटवेड्या भारताने पाहिलेला सर्वात मोठा सुपरस्टार म्हणजे रजनीकांत !

त्याची संवादफेकीची जबरदस्त शैली आणि पडद्यावरील विलक्षण लकबी आता जणू दंतकथाच बनल्या आहेत. एकीकडे सामान्य माणूस आणि त्याच वेळी सुपरहिरो या त्याच्या प्रतिमेने त्याचे चाहते असलेल्या लक्षावधी प्रेक्षकांना भुरळ घातली आहे.

नामन रामचंद्रन यांनी लिहिलेले हे अप्रतिम चरित्र रजनीच्या कारकिर्दीचा तपशीलवार मागोवा घेते. ‘अपूर्व रागांगल’ (१९७५) पासून ‘कोचाडियान’ (२०१३) पर्यंतच्या त्याच्या विलक्षण चित्रपट प्रवासाचा हा आलेख आहे. त्याचबरोबर हे पुस्तक थलाईवाच्या वैयक्तिक आयुष्यातील अनेक दुर्मिळ पैलूही उलगडते. त्याच्या बालपणापासून ते शिवाजीराव गायकवाड या नावाने संघर्ष करत असलेल्या काळापर्यंत आणि शेवटी सुपरहिरोपर्यंतचा प्रवास यातून उलगडत जातो. एका दंतकथेचा जन्म कसा झाला, हे आपल्याला यातून समजते.




## महाप्रतापी सुभेदार मल्हारराव होळकर


लेखक : रघुराज मेटकरी

**२२४ पाने । ३५० रुपये**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचा विस्तार हिंदुस्थान आणि हिंदुस्थानाबाहेर करणारे आणि मराठेशाहीचा इतिहास घडवणारे काही शूरवीर होते. त्यामध्ये अग्रस्थानी असणारे सुभेदार मल्हारराव होळकर हे अत्यंत पराक्रमी, शूर, बुद्धिमान आणि धाडसी असे सुभेदार होते. धर्म, आचार, विद्या, व्यापार आणि युद्धकला या सर्वात ते पारंगत होते. सामर्थ्य, न्याय, नीतिमत्ता, महत्वकांक्षीपणा आणि स्वतःच्या मनगटाच्या बळावर या सामान्य मेंढपाळ व्यक्तीने दिल्लीचा बादशाह कोण व्हावा हे ठरवण्यापर्यंत स्वतःचे कर्तृत्व सिद्ध केले. त्यामुळे एखाद्या स्वतंत्र राज्याच्या राजासारखे ते आयुष्यभर वागले. पण छत्रपती शाहू महाराज आणि श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्यावरील निष्ठा त्यांनी अखंड जपली. एकूण ७४ परगणे मल्हाररावांच्या ताब्यात होते. प्रत्येक युद्धात मल्हाररावांनी भीम पराक्रम केला. आपल्या कारकिर्दीत ते एकूण ५२ लढाया लढले आणि त्या सर्वांमध्ये त्यांनी यश मिळवले. मराठेशाहीच्या उत्कर्षात मल्हारराव होळकर यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. मराठेशाहीचा भगवा झेंडा अटकेपार फडकवण्यात मल्हाररावांचा सिंहाचा वाटा होता.

उत्तर हिंदुस्थानात मराठेशाहीचा पाया मल्हाररावांनी बळकट केला. आपल्या राज्यात प्रशासन, शेती, जलव्यवस्था, न्याय, धार्मिक बाबी, स्थैर्य, शांतता राबवून त्यांनी शिवरायांचा लोककल्याणकारी राज्याचा वारसा समर्थपणे पुढे चालवला.

रघुराज मेटकरी हे प्रतिभावंत साहित्यिक आहेत. त्यांनी अनेक पुस्तके, दुमिर्क कागदपत्रे धुंडाळून मल्हारराव होळकर यांचे हे चरित्र लिहिलेले आहे. मल्हाररावांचे हे चरित्र प्रेरणादायी आहे. मराठी वाचकांना ते नक्कीच आवडेल, असा विश्वास आहे.




# टाटा (१९६४-२०२१)


## लेखक : पीटर केसी । भाषांतर : प्रविण अक्कानवरू

**२२२ पाने । ३५० रुपये**

आपल्या काळातील दूरदर्शी नेतृत्व म्हणून नावारूपास आलेल्या जमशेदजींनी १८६८ साली आपल्या औद्योगिक कार्याची मशाल पेटवली जिचे पुढे जाऊन अनेक कंपन्यांचा समावेश असणाऱ्या टाटा समूहात पर्यवसान झाले. या उद्योगाने पुढे इतके असाधारण स्वरूप धारण केले की काही जण त्याला 'जगातील सर्वोत्तम कंपनी' असेही संबोधतात. दशकानुदशके या व्यवसायाची सर दोराबजी टाटा, जे. आर. डी. टाटा आणि रतन टाटा यांच्यासारख्या जमशेदजींच्या कार्यज्योतीचे रक्षण करणाऱ्या नेतृत्वांच्या मार्गदर्शनाखाली वृद्धी आणि भरभराट झाली. परंतु एके दिवशी टाटा सन्सच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष सायरस मिस्त्री यांची पदावरून हकालपट्टी झाल्याची ठळक बातमी प्रसिद्ध झाली.

नेमकं काय चुकलं ?

या अधिकृत आणि विशेष पुस्तकात, टाटा समूहाशी संबंधित आतल्या गोटातील व्यक्तींनी पीटर केसी यांच्यासोबत प्रथमच खुलेपणाने संवाद साधत ही गोष्ट सांगितली आहे. सदर पुस्तकात टाटा सन्सच्या लहानशा व्यापारी सुरुवातीपासून ते एका यशस्वी व समाजोपयोगी संस्थेच्या रूपातील उत्क्रांतीपर्यंतचा तसेच सायरस मिस्त्री यांच्याविषयीच्या अलीकडच्या संघर्षापर्यंतचा प्रवास उलगडला आहे. व्यवसायात रस असलेल्या प्रत्येकाने हे पुस्तक नक्की वाचलं पाहिजे.




## फँड्री भारतीय चित्रपटातील मैलाचा दगड


लेखक : हनुमंत लोखंडे

**१५२ पाने । ३०० रुपये**

'फँड्री' हा जात, धर्म, वर्ण, वर्ग, वंशादी भेदांचा अमंगळ चक्रव्यूह भेदून प्रेम फुलवत राहावं, असं स्फुल्लिंग चेतवणारा चित्रपट आहे. 'फँड्री'तील संघर्ष प्रेक्षकाला माणूसपणाच्या चिंतनात रमवतो. स्वतःतील छुप्या पशुत्वावर भिरकावलेला दगड त्याला न्याय्य वाटतो. अनुभव देत, हितगुज करत प्रेक्षकांचे भावनिक उन्नयन साधणाऱ्या 'फँड्री' सारख्या कलाकृती दुर्मीळ असतात. त्यांचा अनेक अंगांनी अभ्यास केला गेला पाहिजे. नेमके हेच काम या पुस्तकाद्वारे हनुमंत लोखंडे यांनी केले आहे. यातील चर्चेची, चिंतनाची मांडणी लेखकाच्या अभ्यासवृत्तीची आणि त्याच्यातल्या समंजस संवादकाची साक्ष देणारी आहे.

विविध दृष्टिकोनातून 'फँड्री'चे आकलन करताना, चित्रपट अन् समाज यांच्यातील वीण उलगडून दाखवताना, आजवर आम्ही घडवलेल्या इष्ट-अनिष्ट समजुतींचा ऊहापोह करताना लेखकाने आपल्या ओघवत्या शैलीनं साधलेली सुभगता पुस्तक वाचनीय करते. सोबतच, किशोर कदम यांची समर्पक प्रस्तावना आणि लेखकाने घेतलेली नागराज मंजुळे यांची जिज्ञासू मुलाखत पुस्तकास आणखी समृद्ध करते.

समकालीन जातिग्रस्त अवकाशात, प्रागतिक विचारांची पायवाट पाडणाऱ्या सुधारकांची लोभस दिंडी, संवेदनशील माणूसपणानं पुढे नेणारा नागराजसारखा कलाकार आणि त्याच्या कामाचे सौंदर्य उलगडून दाखवत विचारमग्न करणारा हनुमंत लोखंडेसारखा चिंतनशील अभ्यासक, हे दोघेही अनुपाचे आहेत.




## द लॉ ऑफ अॅट्रॅक्शन


लेखक : विल्यम वॉकर अॅटकिन्सन

**१४४ पाने I ३०० रुपये**

स्वतःला कामात व्यस्त करा आणि तुमच्या आयुष्याला आकार द्या. असं समजू नका की, आपण काहीही करण्यापूर्वी आपल्याला विश्वातील सर्व कोडी सोडवायलाच पाहिजेत. त्या कोड्यांबद्दल काळजी करू नका आणि तुमच्या हातात असलेल्या कामावर लक्ष केंद्रित करा. तुमच्यात दडलेलं जे महान जीवन तत्त्व आहे ते आचरणात आणा की, जे प्रकट होण्याविषयी तुमच्या मनाची तळमळ होते आहे. तुमच्या शिक्षकांनी किंवा गुरूजनांनी हे कोडं आधीच सोडवलं आहे, अशा भ्रमात राहू नका. ते सोडवण्याबाबत कोणी बोललं तर ती व्यक्ती खोटं बोलत आहे आणि सोबतच हिंमत राखण्याचा प्रयत्न करत आहे, असं समजा.

अनाकलनीय कोडे आणि सिद्धान्तांबद्दल काळजी करू नका, कार्य करा आणि जगणं सुरू करा. या सिद्धान्तांचे फुगे फोडण्याचा उत्तममार्ग म्हणजे हसणं. हसणं ही एक अशी गोष्ट आहे, जी आपल्याला वेडेपणापासून वाचवते. विनोदबुद्धी ही माणसाला देवाने दिलेली सर्वोत्तम देणगी आहे.

आपण कुणीतरी वेगळे आहोत, जणू काही चंद्र आहोत; एक प्रतिबिंब आहोत, असा विचार करणं थांबवा. कामामध्ये सक्रिय व्हा आणि स्वतःला सूर्य बनवा. हीच तुमची शक्ती आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये सूर्य बनण्याचे गुण असतात. काम सुरू करा आणि स्वतःला प्रकट करा. तुमच्या पाठीचा कणा मजबूत करा आणि ताठ मानेनं उभे राहा.




# यू कॅन

लेखक : जॉर्ज मॅथ्यू अ‍ॅडम्स

**१६४ पाने । ३०० रुपये**

तुम्ही नक्कीच करु शकता !

तुम्ही खरंच यशस्वी होऊ शकता का ?

तुमच्या मनात कधी हा प्रश्न येतो का- "माझ्यात खरंच ध्येय गाठायची, अडचणींवर मात करायची आणि यशस्वी होण्याची ताकद आहे का?" 'यू कॅन' हे जॉर्ज मॅथ्यू अ‍ॅडम्स यांचे प्रेरणादायी पुस्तक तुम्हाला या प्रश्नाचं उत्तर शोधायला मदत करतं.

हे पुस्तक तुम्हाला सांगतं की -

रोज थोडा वेळ शांतपणे स्वतः साठी द्या.

इतरांची मदत करण्याचा प्रयत्न करा.

तुमचं चारित्र्य आणि वागणूक यांचा तुमच्या कामावर प्रभाव पडू द्या.

आपल्या चुका ओळखा आणि त्यातून शिका.

वेळेचा योग्य वापर करा.

या सवयी तुमचं आयुष्यच बदलू शकतात !

नेपोलियन हिल यांनी ज्याला महान मानलं, अशा लेखकाचं हे पुस्तक लाखो लोकांना प्रेरणा देणारं आहे.




# पब्लिक स्पीकिंग

लेखक : डेल कार्नेगी

**२०९ पाने । ३०० रुपये**

जगप्रसिद्ध प्रेरणादायक लेखक 'डेल कार्नेगी' यांचे पब्लिक स्पीकिंग हे पुस्तक यशस्वी वक्ता बनण्यासाठीचे प्रभावी मार्गदर्शन करते.

१९२६ साली प्रथम प्रकाशित झालेले हे पुस्तक आजही संवादकौशल्याच्या वाटचालीत जगभरातील लाखो लोकांना प्रेरणा देत आहे.

या पुस्तकातून तुम्ही शिकाल -

आत्मविश्वास कसा निर्माण करावा ?

भाषणाची तयारी आत्मविश्वासाने कशी करावी ?


भाषणाची प्रभावी सुरुवात आणि समारोप कसा करावा ?

श्रोत्यांचं मन कसं जिंकावं?

विचार स्पष्ट, प्रभावीपणे कसे मांडावेत ?

स्मरणशक्ती, भाषाशैली आणि व्यासपीठावरील उपस्थितीतील लपलेली अनेक रहस्यं.

डेल कार्नेगी यांचे हे विचारसमृद्ध पुस्तक केवळ बोलणे शिकवत नाही, तर आत्मविश्वास वाढवून, प्रभावी वक्तृत्वाची कला आत्मसात करण्यासाठी तुम्हाला दिशा दाखवते.




## हास्यालॉजी

लेखक : डॉ. गणेश कुटे

**२५६ पाने । ३०० रुपये**

डॉ. गणेशचे लिखाण हे मिलेनियल जनरेशन म्हणजे आमच्या पिढीच्या नजरेतून केलेले आहे. त्याचे निरीक्षण अतिशय अचूक असून आजच्या मध्यमवर्गीय जीवनातील बारकावे त्याने छान टिपले आहेत. त्याला मानवी स्वभावाची आणि नातेसंबंधाची सखोल जाण असल्याने, त्याची पात्रे ही जिवंत शब्दचित्रे ठरतात व आपल्याला थेट मराठवाड्यात घेऊन जातात. त्याच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे ते नर्मविनोदी, मार्मिक असून, आपल्या चेहऱ्यावर स्मित आणण्यास कारणीभूत ठरतेच, पण नकळत विचार करण्यासही प्रवृत्त करते. गणेशला लेखन प्रपंचासाठी मनापासून शुभेच्छा.

डॉ. अभिनव देशमुख (IPS)




# ही 'श्री'ची इच्छा

लेखक : श्री ठाणेदार

**१८९ पाने । ३०० रुपये**

इच्छा असेल तर मार्ग दिसतो आणि प्रयत्न केले, तर हवं तिथं पोचू शकतो, याचं प्रत्यंतर देणारी आजच्या घडीची सत्यकथा म्हणजे ही 'श्री'ची इच्छा !

श्रीनिवास ठाणेदार म्हणजेच श्री हा बेळगावच्या शाळेतून पंचावन्न टक्के गुण मिळवून मॅट्रिक पास झालेला एक सर्वसामान्य मुलगा, नंतर मात्र एम.एससीला पहिला काय येतो, अमेरिकेतील डॉक्टरेट ही सर्वोच्च पदवी काय मिळवतो आणि यशस्वी उद्योगपती म्हणून नावलौकिक काय कमावतो, सगळंच अगदी थरारक आणि कौतुकास्पद ! एका बाजूला पैसा, प्रसिद्धी आणि यश; तर दुसऱ्या बाजूला पत्नीनं केलेली आत्महत्या, समाजानं वाळीत टाकणं आणि मग परक्या देशात दोन लहान मुलांना आई आणि बाबा होऊन वाढवणं !

यश-अपयश, सुख-दुःख, मान-अपमान सर्वच काही टोकाचं !

डॉ. श्री ठाणेदार या जिद्दी माणसानं परिस्थितीवर केलेली मात म्हणजे ही 'श्री'ची इच्छा !




## पुन्हा श्री गणेशा

लेखक : श्री ठाणेदार

**२५२ पाने । ३०० रुपये**


बेळगावसारख्या गावातून सातासमुद्रापारच्या अमेरिकेत गेलेला 'श्री ठाणेदार' नावाचा धडपड्या मराठी मुलगा !

एका सामान्य घरातला हा तरुण आपल्या चिकाटीच्या आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर मोठं यश मिळवतो, उद्योगपती होतो. पण दैवाचे फासे नेहमीच अनुकूल पडत नाहीत.

रोल्स रॉईस आणि फेरारीतून हिंडणाऱ्या अब्जाधीश 'श्री' समोर व्यवसायातील मंदीमुळे सगळी मालमत्ता बँकेनं जप्त करण्याच्या नामुष्कीची वेळ अचानक येऊन ठेपली.

कसा सामोरा गेला तो या परिस्थितीला ? कशी मात केली त्यानं या आव्हानावर ? परत एकदा त्यानं उभारी घेतली का ?

वाचूया या प्रेरणादायी पुस्तकात...




## वॉशिंग्टंन डायरी

लेखक : श्री ठाणेदार । शोभा बोंद्रे

**२१४ पाने । ३०० रुपये**

अमेरिकेच्या इतिहासात २०२२ आणि २०२४ या सालांमध्ये सलग दोनवेळा प्रथमच एक मराठमोळी व्यक्ती, मुळची भारतीय, अमेरिकन केंद्र सरकारची खासदार म्हणून निवडून आली. अमेरिकेच्या राजकारणातील हे उच्च पद प्राप्त करणाऱ्या मराठी उद्योजकाचे नाव आहे डॉ. श्री ठाणेदार.


अत्यंत बेताच्या परिस्थितीतून आलेला, बेळगावसारख्या छोट्या शहरातील एका सामान्य कुटुंबातील मुलगा; पण त्याची स्वप्ने आकाशाला गवसणी घालणारी होती. अमेरिकेत जाऊन उच्च शिक्षण घेणे, त्यानंतर आर्थिक स्थैर्यासाठी चांगली नोकरी करणे, स्वतःचा बिझनेस सुरू करणे आणि प्रचंड मेहनतीने तो यशस्वी करून दाखवणे हा त्याचा प्रवास होता.

खरं तर इथेच एखाद्याची गोष्ट संपली असती, पण डॉ. श्री ठाणेदार हे काही वेगळेच रसायन आहे. (त्यांची डॉक्टरेटही रसायनशास्त्रातील आहे !!!)

सामान्य माणसाला एका आयुष्यात अनेक आयुष्य जगण्याची संधी मिळते. मनस्वी स्वभावाने आणि ठाम ध्येयाने तो ती संधी घेतो आणि त्याचे सोने करतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. श्री ठाणेदार.

अमेरिकेच्या केंद्रीय संसदेतील एक सक्षम राजकारणी म्हणून ही भूमिका ते आता सर्व शक्तिनिशी सिद्ध करत आहेत.

अमेरिकेतील बिझनेस आणि तिथले राजकारण या दोन्ही पटांवर घडलेला नाट्यमय थरार म्हणजे श्री ठाणेदार यांची नवी गोष्टः 'वॉशिंग्टन डायरी.'





## वंगाळ

लेखक : राणाप्रताप चंद्रकांत पाटील

**१५६ पाने । २८० रुपये**

'गाव म्हटलं की मातीचा गंध, बैलजोड्यांच्या टापा, आणि चौकातली गजबज आठवते. पण या गावातल्या प्रत्येक रस्त्यावर जुनी वैरं दबा धरून बसली आहेत. सत्तेसाठीची धडपड इथं माणसामाणसांत फूट पाडते, पैलवानकीचं बळ इथं फक्त आखाड्यात नाही, तर राजकारणातही आजमावलं जातं. नदीच्या प्रवाहासारखी रहस्यं इथं सतत वाहत राहतात, आणि पोलिस ठाण्याच्या भिंती त्या रक्ताळलेल्या कहाण्यांची साक्ष देत राहतात. एक निवडणूक... खून... आणि मग गावाचं आयुष्य कायमचं बदलून जातं. वंगाळ ही फक्त कादंबरी नाही, तर रगा रगात भिनणारी हकीकत आहे जिथं प्रेम, वैर, सत्ता, विश्वासघात आणि रक्त या सगळ्यांचा संगम आहे.'





# मिथकांचे जग

लेखक : डॉ. नितीन हांडे

**३१२ पाने । ४०० रुपये**

माणूस हा गोष्टीवेल्हाळ प्राणी आहे, त्याला गोष्टीत रमायला आवडतं. किंबहुना अशा गोष्टी रचणं हेच त्याचं होमोसेपियन सेपियन म्हणजेच अतिहुषार मानव असल्याचं लक्षण आहे. आज अनेक प्राचीन गुहांमध्ये शिकारी अवस्थेतील मानवानं काढलेली चित्रं आपण जेव्हा पाहतो तेव्हा त्यात देवकल्पना साकारलेली दिसत नाही. त्यात निसर्गातील अनेक प्रतीकं दिसतात. कदाचित तेच त्याचे देवता किंवा भीतीची स्थानं असतील. मात्र जेव्हा मानव शेती करू लागला, त्यावेळेस त्याला आपल्यासारख्याच, मानवी शरीर असलेल्या, देवांची गरज भासली असावी. या अवस्थेत देवी देवता जन्माला आल्या आणि त्याबरोबर त्यांच्या मिथककथा देखील मानवांच्या कल्पनाशक्तीनं भरारी घेतली आणि पूर्ण जगामध्ये देवतांचे एकापेक्षा एक भारी अवतार जन्माला आले. त्यांच्या व्हर्जन्स अपडेट होत राहिल्या. व्यापार जसा वाढत गेला तसंतशा या मिथककथा देखील जगभर पसरत गेल्या. धारणा, भीती आणि भक्तीची प्रतिकं, भीती आणि भक्ती व्यक्त करायची साधनं या सर्वांचा प्रसार होत गेला. आफ्रिका, आशिया आणि युरोप हे खंड प्राचीन सिल्करूटच्या मार्गाने जोडले होते. इथल्या संस्कृतीमध्ये सांस्कृतिक देवाण-घेवाण झाली, त्यासोबत एकमेकांच्या धर्माचा, देवांचा आणि देवांच्या मिथककथांचा प्रभाव एकमेकांवर पडला. हे जग मिथकांच्या धाग्यानं जोडलं आहे. हा धागा उलगडत गेला तर आपल्याला मानवाचं झालेलं स्थलांतर देखील समजून घेता येतं.





# चंगेजखान

लेखक : राजा गायकवाड

**१३४ पाने । ३०० रुपये**

चंगेज खान ! मानवी इतिहासातील सर्वात आक्रमक क्रूरकर्मा. आपल्या आयुष्यात त्याने तब्बल चार कोटी लोकांची हत्या केली. आशिया खंडातील ८% पुरुष हे त्याचे वंशज आहेत, असे सिद्ध झाले आहे. रोमन लोकांनी चारशे वर्षांत जेवढा प्रदेश आपल्या अमलाखाली आणला, तेवढा चंगेज खानने फक्त २५ वर्षांत आणला. पॅसिफिक महासागर ते भूमध्य समुद्रादरम्यान अशी एकही नदी शिल्लक राहिली नाही, जिचे पाणी चंगेज खानच्या घोड्यांनी प्यायले नाही. चंगेज खानची सत्ता उत्कर्षाला पोहोचली, त्या वेळी त्याचे क्षेत्रफळ सलग अकरा ते बारा दशलक्ष चौरस मैल इतके होते. या साम्राज्याचा विस्तार सैबेरियाच्या टुंड्रा प्रदेशापासून ते उष्णकटिबंधीय भारताच्या सीमेपर्यंत, व्हिएतनामपासून हंगेरीपर्यंत आणि कोरियापासून ते बाल्कन देशापर्यंत होता. आजचा नकाशा बघाल, तर आजचे तब्बल तीस देश आणि तीनशे कोटी लोक त्याच्या अधिपत्याखालील प्रदेशात राहतात.





## बाबा तुम्ही असता तर!

लेखक : डॉ. धम्मपाल रेवण माशाळकर

**३१८ पाने । ४०० रुपये**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्य आणि कर्तृत्वाची ओळख समस्त जगाला आहे. त्यांच्या हयातीत त्यांची चळवळ सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचली. त्यांचे विचार समजले उमजले आणि ते बहरले देखील. परंतु त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर काही वर्षातच समाजाची दशा आणि दिशा बदलली. समाज दिशाहीन झाला. बाबासाहेबांच्या जाण्यानंतर ज्यांनी आंबेडकरी चळवळीचे नेतृत्व केले ते निष्फळ ठरले. सध्याच्या परिस्थितीत तर समाज विखुरलेल्या स्वरूपात दिसत आहे. तरुणाईला बाबासाहेब यांची ओळख फक्त एक व्यक्ती म्हणूनच आहे परंतु त्यांनी केलेल्या कार्याचे काय ? बाबासाहेब डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा डोक्यात घेऊन वाचल्याने समाज हित होईल हे सत्य तरुणाई विसरत चालली आहे. म्हणूनच सध्याच्या परिस्थितीत बाबासाहेब असते तर त्यांना काय वाटले असते? भावना शून्य झालेल्या समाज म्हणाला बाबासाहेबांनी काय संदेश दिला असता? याचा प्रवास म्हणजेच बाबा तुम्ही असतात तर ?




# अनस्क्रिप्टेड

लेखक : अमोल देशमुख

**२४८ पाने । ३५० रुपये**

अमोल देशमुख हे साहित्य क्षेत्रात उदयास आलेले एक सिध्द्धहस्त लेखक. मिश्कील, मार्मिक लेखन हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य. एक आगळीवेगळी व नाविन्यपूर्ण लेखनशैली यामुळे त्यांचे हेख वाचकांना भावतात. लिहू लागल्यानंतर रसिक वाचकांनी त्यांच्या लेखनाला दिलेल्या पसंतीच्या पावतीमुळे, त्यांचे एका मागून एक लेख प्रसिद्ध होऊ लागले. सर्वच हेख विचारप्रवर्तक व काही लेख सामाजिक व्यवस्थेवर भाष्य करणारे आहेत.

लेखकाचे कार्यक्षेत्र जरी 'आयटी' असले तरी अनेक सामाजिक उणीवा, विविध अनुभव, संवाद, व्यक्तीचित्रण, निरीक्षण, यातून हेखकाच्या मनः पटलावर त्रित्रित हीत गेहेहे विचार त्यांनी हेखाच्या रूपाने वाचकांच्या समोर ठेवले आणि ते वाचकांना आवडलेही. हे सर्व लेख 'अनस्क्रिप्टेड' या पुस्तक रूपाने वाचकांच्या समीर येत आहेत.




## पॅसिव्ह इन्कम

लेखक : दादासाहेब तडवळकर । विद्या तडवळकर

**२१६ पाने । ३०० रुपये**

आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे फक्त श्रीमंत असणे नव्हे, तर तुमच्या आवडीचे जीवन जगण्याची, कुटुंबासोबत अधिक वेळ घालवण्याची आणि पैशांची चिंता न करता निर्णय घेण्याची क्षमता म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य !

'पॅसिव्ह इन्कम - आर्थिक स्वातंत्र्यासाठी उत्पन्नाचे नवे मार्ग' हे पुस्तक

तुम्हाला नोकरी किंवा व्यवसायाच्या पलीकडे जाऊन स्वतःसाठी उत्पन्नाचे अनेक स्रोत कसे निर्माण करायचे हे सांगते. या पुस्तकात तुम्हाला सिद्ध आणि प्रभावी मार्गांची तपशिलवार आणि प्रत्यक्ष वापरता येण्याजोगी माहिती देण्यात आली आहे. या पुस्तकातील आयडियाज वापरून एखादा सामान्य व्यक्तीही सहजपणे उत्पन्न सुरू करू शकतो.

तुम्ही तुमच्या भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेसाठी तयार आहात का ?





## कृध्यती एक थरारक महासंग्राम

लेखक : डॉ. ऋषिकेश बोधे

**२६४ पाने । ३५० रुपये**

डॉ. ऋषिकेश बोधे यांसारख्या लेखकांनी 'कृध्यती'सारखी गहिराई असलेली साहित्यकृती साकारून मराठी फिक्शनला एक नवे परिमाण दिले आहे. या कादंबरीचे साहित्यिक मूल्य अत्यंत ठोस आहे. तिचं भाषिक सौंदर्य, मनाच्या गुंतागुंतीचा सूक्ष्म वेध आणि अंतःप्रेरणेला भिडणारी तिची शैली यामुळे ही कादंबरी एक दीर्घकाळ आठवणीत राहील अशी ठरते. खरे सांगायचे तर, बऱ्याच काळानंतर एवढं शुद्ध, विचारप्रवृत्त आणि संवेदनशील साहित्य वाचायला मिळाल्याचा आनंद झाला. मराठी साहित्यात अनेक वर्षांपासून अशा प्रकारच्या सशक्त कल्पनाविष्काराच्या अभावाची जाणीव होती; पण 'कृध्यती मुळे त्या पोकळीची भरपाई झाल्याचे समाधान वाटते. आगामी काळात ह्याचे पुढील भागही येवोत, अशा शुभेच्छा.





# सुखाच्या शोधात

लेखक : संदीप खुरुद

**१४८ पाने । २५० रुपये**

सध्याचा काळ हा मानवाच्या आता पर्यंतच्या उत्क्रांती काळामधील सर्वांत चांगला, समृद्ध व सुवर्णकाळ म्हणावा लागेल. कारण असा काळ यापूर्वी नव्हता. भविष्यातही असा समृद्ध काळ राहील असे सांगता येत नाही. आपली आजची पिढी ही सर्व सुख, सोईनी समृद्ध आहे. आपल्याकडे सर्व प्रकारची आधुनिक साधनं उपलब्ध आहेत. मानवाला सुखाने जगण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत. त्या सर्व गोष्टी आज आपल्याकडे उपलब्ध आहेत. पूर्वी माणूस भटकंती करायचा. आता माणसाला स्थैर्य लाभलं आहे. माणसाच्या अन्न, वस्त्र व निवारा या मुलभूत गरजा तर पूर्ण होतच आहेत. त्यासोबतच इतर सर्व गरजाही पूर्ण होत आहेत. आज रोजी पूर्वीच्या तुलनेत माणसाकडे सर्व सुख, सुविधा उपलब्ध आहेत. तरीही माणूस सुखी नाही. कारण माणूस समाधानी नाही.

सुख हे छोट्या छोट्या गोष्टींमध्ये दडलेलं असतं. सुख हे आपल्या मनाच्या अवस्थेवर अवलंबून असतं. मन सुखी असेल तर आपण सुखी असतो. मन दुःखी असेल तर आपण दुःखी असतो. प्रत्येक माणसाची सुखाची व्याख्या ही वेगवेगळी असते. सर्व मानव प्राण्यांच्या जीवनाचा अंतिम उद्देश हा सुखाने आणि समाधानाने जीवन व्यतीत करणे हाच आहे. आपलं मन आनंदी असेल तर सारं जगही आपल्याला आनंदी दिसतं. हे जीवन परत मिळत नाही. हे जीवन आणि हे जग खरोखरच सुंदर आहे. फक्त जगाकडे पाहण्याचा चांगला व सकारात्मक दृष्टीकोन आपल्याकडे हवा.




## **रानमेवा** अस्सल मराठी कथांचा संग्रह

लेखक : संदीप खुरूद


**१२० पाने । २५० रुपये**

संदीप खुरुद यांच्या ‘रानमेवा’ संग्रहातील गोष्टी अस्सल आहेत. मातीतल्या आहेत. अनुभवलेल्या आहेत. त्यात उसनवारी नाही. कथेचा परिसर आणि पात्र जिवंत करायची सहजता त्यांच्यात आहे.

स्वतःला थोर न मानणारे लेखक खूप निरागस वाटतात. निर्मळ वाटतात. त्यांच्या गोष्टी तुमच्या आमच्या असतात. दाद घेण्यासाठी ताणलेला आलाप नसतो. दिखाऊ स्वर नसतो.

संदीप खुरुद माणूस म्हणून साधे आहेत. त्यांची कथाही तशीच आहे. आव नसलेली. पण खूप काही सांगून जाणारी, विषयांची कमी नाही त्यांच्याकडे. स्वतःच्या प्रेमात पडलेली माणसं वारंवार आरसा पाहतात. स्वतः पलीकडे पण जग सुंदर आहे याची जाणीव असलेली माणसं गोष्टी टिपत राहतात.

संदीप खुरुद यांनी टिपलेल्या आणि सहजतेने मांडलेल्या गोष्टी वाचनीय आहेत. त्यांच्या पहिल्या वहिल्या पुस्तकासाठी खूप खूप शुभेच्छा. रानमेवा वाटत रहावा. प्रत्येकाला भेटत रहावा. असेच लिहीत रहा आणि मन जिंकत रहा.




# कृष्णामाई

लेखक : प्रदीपकुमार कांबळे-बहेकर

**१५२ पाने I २५० रुपये**

कृष्णामाई महाबळेश्वर या तीर्थक्षेत्रावर उगम पावते. सातारा, कराड, रेठरे, बहे, वाळवा, सांगली, मिरज मार्गेकर्नाटकात जाते. तिचा उगमापासून समुद्रापर्यंतचा प्रवास १४०० कि.मी.चा असून, महाराष्ट्रात ती २८२ कि. मी. धावते. कोल्हापूर जिल्ह्यातल्या नरसोबावाडीजवळ दत्तात्रयाच्या साक्षीनं कर्नाटकात प्रवेश करते. एकूण प्रवासात ती बत्तीस नद्यांसोबत घेऊन कर्नाटकातून पुढे आंध्रात राजमहेंद्री येथे बंगालच्या उपसागराला मिळते. ब्रिटिश सरकारला हादरा देणारे प्रतीसरकार याच मातीत उदयाला आले, वाढले, विस्तारले. कृष्णामाईच्या सुजलाम् सुफलाम् परिसरात अनेक रत्न जन्माला आली. स्व. यशवंतरावजी चव्हाण, यशवंतरावजी मोहिते, क्रांतिसिंह नाना पाटील, राजाराम बापू पाटील, नामदार जयंतरावजी पाटील, नागनाथ आण्णा नायकवडी, महाराष्ट्र केसरी पै. गणपतराव खेडकर, काका दह्यारीकर, मारुती माने, संगीतरत्न बालगंधर्व, संगीतकार बाळ पळसुले, लावणी सम्राट पढे बापूराव, साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे, वसंतराव दादा पाटील, नटश्रेष्ठ मा. विनायक, तंतू वाद्याची पंढरी असलेले मिरजेचे कलावंत घराणे, ज्या मंगेशकर कुटुंबाने जगाला संगीताची अनमोल देणगी दिली. त्यांच्या आयुष्यातला बराच काळ सांगलीच्या कृष्णा काठावर गेला, असे अनेक दिग्गज लेखक, कलावंत, शाहीर, राजकीय, सामाजिक नेते यांना कृष्णामाईच्या पाण्याचा परीसस्पर्श झाला आणि त्यांचे कर्तृत्व फुलले.

वनवासाला असताना काही काळ या परिसरात रामाचे वास्तव्य होते. तिथे रामलिंग हे तीर्थक्षेत्र झाले. राम विजय ग्रंथात तसा उल्लेख आढळतो. कृष्णामाईने दुष्काळ पाहिला. पावसाळ्यात महापुरामुळे जनतेच्या डोळ्यात पाणी आणले, तरीही कोणताही भेदभाव न करता असंख्य जीवांचे आयुष्य सुखी-समाधानी केले, अशा जीवनवाहिनी कृष्णामाईला शतशः वंदन.




## आम्ही असू अभिजात

लेखक : डॉ. अमोल देवळेकर

**३४० पाने । ४०० रुपये**

"पृथ्वीच्या जन्मापासून महाराष्ट्राच्या जन्मापर्यंतचा प्रवास, डार्विनच्या प्रयोगशाळेतून आणि संतांच्या अभंगातून एकाच वेळी वाचायचा असेल तर 'आम्ही असू अभिजात' हातात घ्यावाच लागतो. मराठी माती, मराठी शरीर आणि मराठी मन यांचा इतका शास्त्रीय आणि एकसंध उलगडा यापूर्वी मराठीत कुणी केलेला नाही. जीन्स, जैवरसायन, इतिहास, संतपरंपरा आणि राज्यघटना यांना जोडून मराठी अस्मितेचा घेतलेला हा समग्र वेध खरोखरच डोळे उघडणारा आहे."

"आम्ही असू अभिजात या ग्रंथात 'महाराष्ट्र धर्म' म्हणजे नेमके काय याची व्यापक जाणीव करून देणारी आणि प्रत्येक मराठी माणसाने अभ्यासावी अशी अतुलनीय माहिती आहे. हा मराठी माणसाकडे पाहण्याचा, त्याचे विश्लेषण करण्याचा शास्त्रशुद्ध प्रयत्न आहे."




## Love is Love

लेखक : आशा नेगी

**२०० पाने । ४०० रुपये**

प्रेम ही एकमेव अशी कृती आहे, जी माणसाला माणूस बनवते. ती कधीही, कुठेही, कोणालाही, कोणासोबतही, कुठल्याही वयोगटात होऊ शकते. प्रेमात माणूस हा 'माणूस' बनतो.

प्रेम ही कृतीत दिसणारी, व्यक्त होणारी आणि अनुभवता येणारी अशी एक भावना आहे, ज्यात माणूस विकसित होतो, खऱ्या अर्थाने श्वास घेतो, त्याला छान वाटतं, हलकं वाटतं. प्रेमाला शरीराचं बंधन नाही, लिंगाचं बंधन नाही, त्याला स्त्री-पुरुष कशाचंच बंधन नाही.


'रूह को जिसमें सुकून मिलता है, वो जज्बा प्यार होता है।'

शरीर तर केवळ एक माध्यम असतं, दुसऱ्या व्यक्तीपर्यंत ते प्रेम पोहोचवण्याचं. मग ते प्रेम ज्या शरीरात असतं, ते शरीर एक माध्यम निवडतं आणि समोरच्या व्यक्तीचं शरीरसुद्धा एक माध्यम बनतं.

प्रेमात दोन व्यक्तींमध्ये खरंतर इतकी सुंदर, छानसी एक स्पेस तयार होते. जिथे केवळ डोळ्यात बघून, स्पर्शातून किंवा त्या व्यक्तीच्या सुगंधातून कळतं की प्रेम आहे आणि तिथं ते व्यक्त होत राहतं. शब्दांतून आणि निःशब्दपणेही !

प्रेम ही एक अशी सुंदर फिलिंग आहे, ज्याला कुठलं बंधन नाही की कुठली चौकट नाही, हे मुक्तच असतं!

नात्यांना चौकट असते, नात्यांना बंधन असते. नात्यांना नियम किंवा मर्यादा असू शकतात. परंतु, प्रेम हे बेभान असतं, ते मुक्त असतं. आणि प्रेमात माणूस खूप छान श्वास घेतो. आपण श्वास घेतोय, आपण जिवंत आहोत, याचाच अर्थ कुठंतरी आपल्यात प्रेम आहे... आणि या प्रेमाला असंच वाहत जाऊ द्यावं, हेच मला वाटतं.





# वयमरक्षाम

लेखक : आचार्य चतुरसेन । अनुवाद : श्रीकांत ढेरंगे

**४८० पाने । ५०० रुपये**

वयम् रक्षाम हे हिंदी साहित्यातील प्रसिद्ध लेखक आचार्य चतुरसेन यांचं वैदिक कालखंडातील आणि रामायणातील रावण या पात्रावर आधारित असणारे एक महत्त्वाचं पुस्तक आहे. आचार्यांनी हिंदीमध्ये लिहिलेल्या या पुस्तकाला भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी प्रस्तावना लिहिली होती. 'रावण राजा राक्षसांचा' ही कादंबरी लिहिताना मलाही या पुस्तकाचा खूप फायदा झाला. आचार्यांनी हिंदीमध्ये लिहिलेल्या या पुस्तकात संस्कृत आणि प्राकृतमधील अनेक अवघड शब्दांचा वापर केला असल्याने मराठी वाचकांना हे पुस्तक वाचणे फारच अवघड जात होते. तेव्हापासूनच हे पुस्तक मराठीमध्ये यावे अशी माझी इच्छा होती.

हिंदीचे अभ्यासक आणि लेखक श्रीकांत ढेरंगे यांनी या पुस्तकाच्या मराठी भाषांतराचे काम हाती घेतले. वर्षभराच्या मेहनतीने त्यांनी या पुस्तकाचे अत्यंत ओघवत्या शैलीत सुंदर असे मराठी भाषांतर करून ते वाचनीय केले आहे. मराठी वाचकांना हे पुस्तक निश्चित आवडेल.




## उद्योजक


लेखक : मनोज कदम

**२८४ पाने । ४०० रुपये**

ग्रामीण भागातील एका गरीब शेतकरी कुटुंबातून सुरू झालेला प्रवास, खडतर संघर्षातून घेतलेलं शिक्षण, स्वतःच्या कर्तृत्वावर मिळवलेली नोकरी आणि त्यानंतर उद्योगाच्या क्षेत्रात उमटवलेला आपला ठसा... हा प्रवास आहे डॉ. मनोज कदम यांचा. भारत सरकारचा पहिला 'राष्ट्रीय उद्योजकता पुरस्कार' मिळवणाऱ्या एका यशस्वी उद्योजकाने आणि व्यवसाय सल्लागाराने आपल्या अनुभवाची शिदोरी या पुस्तकात उलगडली आहे.

हे पुस्तक केवळ सिद्धांतावर आधारित नसून प्रत्यक्ष उद्योग-व्यवसायाच्या क्षेत्रात आलेल्या अनुभवातून साकारले आहे. नवीन उद्योजकाने नक्की काय करावे आणि काय टाळावे, याचे अचूक मार्गदर्शन यात मिळते.

एका सामान्य तरुणाने असामान्य उद्योजक कसे बनावे, याचा हा 'प्रॅक्टिकल' रोडमॅप आहे. जर तुम्हाला तुमचा व्यवसाय केवळ सुरूच नाही, तर तो स्थिर आणि यशस्वी करायचा असेल, तर या पुस्तकातील प्रत्येक पान तुमच्यासाठी यशाची नवी कवाडं उघडेल !




# सुकाणू

लेखक : प्रा. सुरेश अडके

**२२६ पाने । ३५० रुपये**

कथेच्या प्रांतात ग्रामसंस्कृतीतील अनुभव गांभीर्याने व्यक्त करणारे अलीकडच्या काळातील कथालेखक सुरेश आडके यांची 'सुकाणू' ही कादंबरी वर्तमान ग्रामजीवनातील राजकीय वास्तवाचे चित्रण करणारी आहे. विचारहीनता, डावपेच, कुरघोड्या, द्वेषमूलकता, भेदाभेद, पैश्याचा अमाप वापर, प्रलोभने, दडपशाही अशा सर्व मार्गांचा अवलंब करणाऱ्या आजच्या सत्ताकेंद्री राजकारणाच्या भूपृष्ठस्तराचा सार्वत्रिक अनुभव त्यांनी सामर्थ्याने व्यक्त केला आहे.

मूल्यविवेक हरविलेल्या आजच्या राजकारणाचे दर्शन घडविणाऱ्या या कादंबरीचा सदानंद हा नायक उच्चशिक्षित आहे. लोकसेवा आयोगाची परीक्षा पास होवूनही चांगल्या नोकरीवर तो पाणी सोडतो. परिघावरील सर्वसामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन करण्यासाठी राजकारण मूल्याधारित व्हावे म्हणून बबनरावांसारख्या नेत्याचा पी.ए. होतो. त्यांच्या राजकारणाला विधायक दिशा देतो.

आजच्या तरुण पिढीला मूल्याधिष्ठित, विवेकी, समाजहिताचे राजकारण हवे आहे, या वास्तवाची प्रखर जाणीव ते कादंबरीतून करून देतात. नेत्याला सातत्याने राजकीय पटलावर जागृत ठेवणाऱ्या, प्रसंगी नेत्याचे संकट झेलणाऱ्या पी.ए.ला कादंबरीच्या केंद्रस्थानी आणून त्यांनी त्याचे जबाबदारीचे स्थान प्रथमच अधोरेखित केले आहे. विलक्षण गुंतागुंतीच्या व्यामिश्र अशा अनुभवचित्रणातून व्यक्त केलेला वर्तमान राजकीय व्यवस्थेतील आशय, समकालीन ग्रामजीवनातील भाषेचे नेमके, अर्थपूर्ण आणि प्रवाही उपयोजन या वैशिष्ट्यांमुळे कादंबरी मनाची पकड घेते. मराठी राजकीय कादंबरीच्या प्रांतात सुरेश आडके स्वतःची वेगळी ओळख निर्माण करतील, असा विश्वास देणारी ही त्यांची कलाकृती आहे.





# मानधुरा

लेखक : शेखर फराटे

**१७६ पाने | ३०० रुपये**

मानापानाच्या शर्यतीत उद्ध्वस्त झालेलं कुटुंब गावगाड्यात पुन्हा उभं राहतं का?
की भूतकाळाची सावली त्यांना पुन्हा गाठते?
या संघर्षात शेवटी कोण जिंकतं?
रहस्य, संघर्ष आणि भावनांनी विणलेलं कथानक जरूर वाचा...
मानधुरा मी येतोय कादंबरीतून!!




# व्होल्गा ते गंगा

लेखक : राहुल सांकृत्यायन

**३५२ पाने । ४०० रुपये**

आज आपण ज्या आधुनिक आणि प्रगत समाजात वावरतोय, त्याचा पाया नेमका कोणत्या काळात आणि कसा रचला गेला असेल? रानटी अवस्थेतील शिकारी माणूस एका सुसंस्कृत आणि स्थिर समाजरचनेकडे कसा वळला असेल ? आपल्या पूर्वजांनी निसर्गाशी आणि स्वतःच्या अस्तित्वासाठी दिलेले लढे नेमके कसे होते ?

या आणि अशा अनेक मूलभूत आणि कुतूहल जागवणाऱ्या प्रश्नांचा वेध घेणारी जागतिक कीर्तीची अजरामर कलाकृती म्हणजे महापंडित राहुल सांकृत्यायन यांचा हा 'व्होल्गा ते गंगा' कथासंग्रह !

रशियातील व्होल्गा नदीच्या काठावरील आदिम मानवापासून सुरू झालेली इतिहासाची ही सफर, २० कथांच्या माध्यमातून आपल्याला थेट गंगेच्या काठी भारतीय स्वातंत्र्यलढ्यापर्यंत घेऊन येते. यातून मानवी संस्कृतीचा उगम, विकास आणि बदलत गेलेल्या मुल्यांचा हा एक जिवंत आणि अद्भुत प्रवास आपल्याला अनुभवता येतो.





## स्वयंभू राजा शिवछत्रपती

लेखक : विनोद चव्हाण

**९६ पाने । २५० रुपये**

छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य, स्वाभिमान, धैर्य आणि न्याय यांचे जिवंत प्रतीक होते. संकटांच्या वादळात खंबीर उभे राहण्याची प्रेरणा आजही त्यांच्या विचारांतून मिळते. या कवितासंग्रहातून जाणून घ्या शिवरायांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे विचार आणि स्वराज्य उभारणीमागील अद्भुत प्रवास.




## शटरस्पीड

लेखक : संजीव कुलकर्णी

**२१६ पाने । ३५० रुपये**

हिंदी चित्रपट हा आपल्या आयुष्यातला एक अविभाज्य घटक आहे.

हिंदी चित्रपट आपली फक्त करमणूकच करतो असे नव्हे, तर आपण कसली केशभूषा करतो, कसली वेशभूषा करतो, आपण कसे बोलतो, काय बोलतो, कसा विचार करतो या सगळ्यांवर कळत-नकळत आपण पाहिलेल्या चित्रपटांचा ठसा उमटलेला असतो.


चित्रपटांचा आशय, दर्जा हा एक भाग झाला, चित्रपटांनी मिळवलेले आर्थिक यश हा दुसरा भाग झाला.

हे दोन्ही भाग Mutually Exclusive -

'परस्पर अनन्य' नसले तरी दर्जेदार आणि तिकिटांच्या बारीवर यशस्वी अशा चित्रपटांची संख्या तुलनेने कमी असते. काही सामान्य चित्रपट बॉक्स ऑफिसवर दणक्यात कमाई करतात, तर काही उत्तम दर्जाचे चित्रपट व्यावसायिक यश मिळवू शकत नाहीत.

'शटरस्पीड' या पुस्तकात काही परिचित तर काही अनवट हिंदी चित्रपटांचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

या चित्रपटांच्या सौंदर्यस्थळांची ही मीमांसा वाचून वाचकाला काही ठिकाणी पुनः प्रत्ययाचा आनंद मिळेल, तर काही अपरिचित जागा कळतील अशी आशा आहे. या पुस्तकातले न पाहिलेले चित्रपट मुद्दाम पहावे अशी वाचकाला प्रेरणा होईल असेही वाटते.





## CHHATRAPATI SHIVAJI

WRITER : DR. SHRIPAL SABNIS

**150 Pages I 400 RS**

Swaraj of King Shivaji was not limited by caste or creed. Those who saw it with a casteist perspective, wrote about it adding falsehood and distortion. You find this facet in the writings of those Brahmin and non-Brahmin writers, who are infected with Brahminism. It has resulted in the cultural mosaic of Maharashtra splitting right down the middle. Purandare, Comrade Sharad Patil and Vinod Anavrat represent three versions of writing about Swaraj which causes denigration of history. That makes it imperative to take a rational perspective of the history of Swaraj. This work, undertaken in service of both branches of King Shivaji's lineage, the Satara and the Kolhapur seats, has received fulsome praise from their present incumbents as well as from statesmen and historians alike.

My own ancestors had earned the custody of the fort in my native village as a reward for their loyal service to the Swaraj. That vein runs through me, not letting me sit quiet when the glorious and inclusive heritage of my beloved Maharashtra faces unworthy challenges. That is why I could brave the threat to my life in offering this rational presentation of the most important part of our history in order to end all unseemly controversies.




## FIDEL CASTRO


WRITER : PRANIT PRAVIN PAWAR

**200 Pages I 400 RS**

As Fidel said, "Revolution is not a bed of roses. It is a battle between the past and the future."

This book brings that battle to life. From the arrival of Columbus to the years of Spanish rule, and finally to the Cuban Revolution, this is a journey through power, resistance, and change. It turns complex history into a narrative that feels simple and deeply engaging.Fidel Castro's life stands as proof that even the strongest systems can be challenged with courage and belief.

I thank Pranit Pawar for presenting such a vast and powerful legacy in a clear and compelling manner. This is a book every young reader should read.





# CHE GUEVARA

WRITER : PRANIT PRAVIN PAWAR

**232 Pages I 400 RS**

"Let the world change you, and you can change the world," said Che.

In just 39 years of his life, Che shaped a legacy that continues to influence generations. Considered one of the most influential figures of the century, he was more than his revolutionary ideals. He showed us how to live beyond limits, larger than life.In this book, Pranit Pawar does more than trace Che's journey. He steps into the mind behind the legend, the doubts, the fire, the choices, and the cost. This is not just the story of a revolutionary, but of a man who chose to live with intensity, purpose, and conviction.If you seek to understand the meaning of both revolution and life, this book is for you.




## माहेलका

लेखक : अशोक निंबाळकर

**३०० पाने । ४०० रुपये**

मराठ्यांच्या इतिहासातील अनेक पाने आजही अपरिचित आहेत, पण रावरंभा निंबाळकर आणि माहेलका यांची ही प्रेमकथा त्या सर्वांत निराळी आहे. करमाळ्याचे पराक्रमी राजे रावरंभा, ज्यांच्या तलवारीच्या धाकाने शत्रू थरथरायचा आणि निजाम दरबारातील सुप्रसिद्ध राजनर्तकी माहेलका, जिच्या सौंदर्याने आणि बुद्धिमत्तेने काळ थबकायचा.

पेशवाई आणि निजामशाहीच्या धगधगत्या राजकारणात फुललेली ही एक 'अप्रकाशित' प्रेमकथा. जिथे धर्माच्या भिंती ओलांडून दोन जीव एकमेकांत गुंतले, पण वाटेत उभे होते मत्सर, सत्तासंघर्ष आणि अनेक मुस्लिम सरदारांचे अडथळे.

काय माहेलका आणि रावरंभा यांचे प्रेम यशस्वी झाले? की इतिहासाच्या पानांत हे नातं केवळ विरहाची एक आर्त हाक बनून राहिलं ?




# रॉयल स्कँडल्स

लेखक : राजा गायकवाड

**१६० पाने । ३०० रुपये**

खरं तर, 'गॉसिपिंग' ही एक नैसर्गिक मानवी प्रवृत्ती आहे. बहुतेकांना गप्पागोष्टींमध्ये रस असतो, पण सार्वजनिकरीत्या अशा विषयांवर चर्चा करणं हे असभ्यपणाचं लक्षण मानलं जातं. इंग्रजी साहित्यात यावर विपुल लिखाण झालं असलं, तरी मराठी साहित्यात मात्र असे विषय आजही 'टॅबू' मानले जातात.

'रॉयल स्कँडल' हे पुस्तक तत्कालीन भारतीय संस्थानिक आणि प्रसिद्ध व्यक्तींच्या आयुष्यात आलेल्या पाश्चिमात्य स्त्रिया व त्यांच्या प्रेमप्रकरणांचा लेखाजोखा आहे. इतिहासाचा हा चेहरा तुम्ही याआधी कधीच पाहिला नसेल; इतिहासातील ही माणसं, त्यांची प्रेमप्रकरणं आणि आजवर दडलेली काही 'अप्रकाशित' गुपितं तुम्हाला या पुस्तकातून वाचायला मिळतील.




# मी दिवा विझवला नाही

लेखक : गिरीश जोशी

**१०२ पाने । २५० रुपये**


गझलचा दिवा लावणारा गझलकार...

श्वास गझल निःश्वास गझल जगण्याचा विश्वास गझल द्वेषाची दुनिया बदले माणुसकीचा ध्यास गझल

'जीवा' ने गझलची वर्णिलेली ही महती म्हणजे गझलवर जीव टाकणाऱ्या आम्हा प्रत्येकाचे मनोगतच. गझलचा ध्यास घेतलेला असाच एक गझलकार म्हणजे गिरीश जोशी.

मराठी गझलच्या प्रचार-प्रसार उपक्रमांतर्गत सुरू केलेल्या 'गझल संवाद'च्या आयोजनप्रसंगी गिरीशचा परिचय झाला आणि त्याच्या गझलध्यासाची प्रचिती आली. उत्तम गझलकार आणि उत्तम शिक्षक असलेला, निर्मळ मनाचा गिरीश एक उत्तम कलावंतही आहे याचा मला विशेष आनंद वाटतो.

सोसलेल्या वंचनांचे सार गझला सोबती आहेत माझ्या चार गझला कोणत्या मापात मोजावे कळेना भावनांचा सागरी विस्तार गझला व्वा ! क्या कहने है गिरीश !!





# अराजकीय पिल्ले

लेखक : डॉ. चंद्रकांत पिल्ले

**१९० पाने | ३०० रुपये**

रोज बदलणारं राजकारण आणि अस्थिर सरकार यामुळे सामाजिक मन अस्वस्थ होत आहे. या अस्वस्थ मनाला विरंगुळा देण्याचं कार्य राजकीय व्यंग कविता व व्यंगचित्रे करीत असतात.

डॉ. चंद्रकांत पिल्ले यांच्या या राजकीय व्यंग-कविता विसंगतीवर बोटं ठेवणाऱ्या आहेत. राजकीय आणि सामाजिक अस्वस्थता आपल्या लेखणीतून व्यंगात्मक शैलीतून शब्दबद्ध करणाऱ्या हा कवितासंग्रह प्रत्येकाने संग्रही ठेवला पाहिजे!





## सायंटिस्ट खोपडी - 2

लेखक : डॉ. नितीन हांडे

**२१२ पाने । ३०० रुपये**

भविष्यात तुम्हाला काय बनायचे आहे असे विचारले असता आयपीएस, डॉक्टर आणि आयटी इंजिनियर यासाठी मुलं हात वर करतात. फार कमी जणांना शिक्षक व्हायचं असतं. मात्र मला सायंटिस्ट व्हायचं आहे असं क्वचितच कोणी म्हणत असेल. कारण या क्षेत्रामध्ये फारसं ग्लॅमर नाही. महाविद्यालयांमध्ये किंवा शाळांमध्ये जेव्हा माझी व्याख्यानं होतात त्यावेळेस जर विद्यार्थ्यांना विचारलं की पाच भारतीय सिनेकलाकार किंवा क्रिकेटर यांची नावं सांगता येतील का? मुलं म्हणतात की पाच काय दहा सांगू. मात्र जेव्हा त्यांना विचारलं की पाच भारतीय शास्त्रज्ञांची नावं सांगता येतील का? त्यावेळेस त्यांची मजल दोन-तीन शास्त्रज्ञांपर्यंत जाते. बहुतेकांना एपीजे अब्दुल कलाम आणि सी. व्ही. रमण माहिती असतात. काही मुलांना होमी भाभांचे नाव माहीत असते. मात्र हा स्कोअर पुढे जात नाही.

सायंटिस्ट खोपडी पुस्तक लिहिण्यामागे हाच उद्देश आहे की विज्ञान, वैज्ञानिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांना लोकप्रियता मिळावी. या पुस्तकात आपण शास्त्रज्ञांच्या कथा सांगताना त्यांच्या आयुष्यात वैज्ञानिक दृष्टिकोन कसा विकसित झाला याची मांडणी केली आहे. या पुस्तकाचे देखील तुम्ही मनापासून स्वागत कराल याची खात्री आहे. यातील शास्त्रज्ञांच्या गोष्टी तुम्ही कुटुंबीयांशी मित्रमंडळींशी शेअर कराल आणि तुमच्या गप्पांमध्ये शास्त्रज्ञ आणि वैज्ञानिक दृष्टिकोन हे विषय देखील असतील. कुतूहल जागं असलेली आणि आपल्या अवतीभवतीच्या निसर्गाकडे चौकसपणे पाहणारी पिढी जन्माला यावी, खेडोपाड्यातील मुलांना देखील विश्वास यावा की आपण देखील सायंटिस्ट खोपडी आहोत, भारतीय विशेषतः मराठी मातीतून शास्त्रज्ञांची नवी फळी निर्माण व्हावी या अपेक्षेने हे पुस्तक आपल्या हाती सोपवत आहोत.




# अभेद्य

लेखक : सुशील शेंडगे

**३०६ पाने । ४०० रुपये**


रेव्हेन्यू इंटेलिजन्स ब्युरो जेव्हा स्वतःच्या इतिहासातील सर्वांत धाडसी मोहिमेला आरंभ करतो, तेव्हा त्यांना प्रतिकाराची पूर्ण जाणीव असते. पण ज्याची त्यांनी कल्पनाही केलेली नसते, तो असतो विश्वासघात.

मोहिमेच्या अग्रभागी उभे आहेत दोन भिन्न संघर्षांतून घडलेले अधिकारी ! कर्तव्याच्या अखंड ध्यासाने पेटलेला सुशांत पवार... आणि केवळ सामर्थ्यशाली गुन्हेगारांशीच नव्हे, तर संशय आणि दबावाशीही झुंज देणारा तडफदार अधिकारी महादेव माळकर... कित्येक महिन्यांच्या सूक्ष्म नियोजनातून आणि काटेकोर गुप्ततेच्या आवरणाखाली, आकार घेते एक प्रचंड मोहीम... अचूक, भेदक आणि कुणीही थांबवू शकणार नाही अशी.

चूक होण्याची शक्यताच नव्हती. पण सगळंच चुकतं...

जेव्हा योजनेला तडा जाऊ लागतो आणि विश्वासाची कसोटी लागते, तेव्हा टीम खंबीरपणे उभी राहते. जखमी, पण अढळ... गुप्त पाळत, शेल कंपन्या, सांकेतिक नोंदी, लपवलेले लॉकर्स आणि दुर्गम भागातील लपण्याच्या ठिकाणांमधून पुढे सरकणारी ही कथा वेळ, दबाव आणि चलाखी यांच्या विरोधात सत्याच्या अखंड पाठपुराव्याची आहे. वास्तववादी तपास पद्धतींवर आधारित ही कादंबरी तपास प्रक्रियेचे बारकावे आणि मानवी भावनांचा संगम साधत प्रत्येक यशामागचे धैर्य, परिश्रम आणि कणखरपणा उलगडते.

विश्वासघात, जिद्द आणि पोलादी सत्याची एक थरारक तपासकथा.





# आरमार

लेखिका : मयुरी जगताप

**१८८ पाने । ३५० रुपये**

"आपण डोंगरातील माणसं, आपल्यासाठी सागर नवा जरूर आहे.
पण आपण सह्याद्रीच्या उंचीला घाबरलो नाही,
तर मग या सागराच्या लाटांना अन् खोलीला काय घाबरायचं ?
आपल्याला त्याच्या अथांग रूपास घाबरून जाण्याचं काहीच कारण नाही.
उलट दर्यास पालाण कसं घालता येईल, याचा आम्ही विचार करत आहोत.
सिद्दी अन् फिरंगी यांचे म्हणाल, तर आम्हास त्यांचं भय वाटत नाही.
ते सागरात कितीही बलाढ्य असले तरीही
बेलाग सह्याद्रीच्या तलवारींचा आजवर त्यांनी सामना केलेला नाही.
मराठे काय आहेत, हे त्यांना आता समजेल."




# या शहरानं दिलेलं रिटर्न गिफ्ट


लेखक : नैनेश तांबे

**१२६ पाने । ३५० रुपये**

नैनेश तांबे या तरुण कवीच्या ‘या शहरानं दिलेलं रिटर्न गिफ्ट’ या संग्रहातील कविता स्वतःचा आवाज, स्वतःची भाषा आणि स्वतःची शैली असलेल्या चिंतनशील कविता आहेत. कवितांना आंतरिक लय आणि नाद आहे. त्या मनात दीर्घकाळ रेंगाळत राहतात. अस्वस्थ आणि विचारप्रवृत्तही करतात. तिरकस शब्दात वास्तवाचा उभा-आडवा छेद घेत हा कवी आपला समकाळ कवेत घेतो.

नैनेशची कविता फक्त ‘कविता’ आहे. तिला कुठल्याही साच्यात बंदिस्त करता येणार नाही. शहरी, निमशहरी, महानगरी किंवा ग्रामीण असा शिक्काही तिला मारता येणार नाही.

‘या शहरानं दिलेलं रिटर्न गिफ्ट’ हा कवितासंग्रह मराठी कवितेत निश्चितच लक्षणीय ठरेल असाच आहे.




## मुक्काम पोस्ट अंदरसूल


लेखक : राजा गायकवाड

**१५६ पाने । ३०० रुपये**

अलीकडच्या काळात मराठी साहित्यातील विनोदाची परंपरा काहीशी खंडित होत चालली असताना, राजा गायकवाड यांनी 'मुक्काम पोस्ट अंदरसूल' या कथासंग्रहातून ती पुन्हा एकदा पुनरुज्जीवित केली आहे. मराठी मातीचा रांगडा गंध, प्रादेशिक बोलीभाषेची खुमासदार चव आणि रोजच्या जगण्यात घडणाऱ्या साध्यासुध्या प्रसंगांचे भन्नाट निरीक्षण यांची यात अफलातून मेजवानी आहे.

या कथांमधील पात्रे आपल्याच आसपास वावरणारी; त्यांचे संवाद कानावर पडताच ओठांवर हसू फुलवणारे, तर प्रसंग पोट धरून हसायला लावणारे असतात. उपरोध, मिश्कीलता, नाट्यमयता आणि शब्दफेकीची अचूक वेळ यामुळे यातील प्रत्येक कथा वाचकाला शेवटपर्यंत खिळवून ठेवते.

मानवी स्वभावातील गंमती-जमतींचा खमंग पंचनामा करताना हे पुस्तक केवळ हसवत नाही, तर आपल्या समाजाचे एक जिवंत, रंगतदार चित्रही उभे करते. मराठी विनोद परंपरेचा अस्सल वारसा जपणारा आणि निखळ आनंदाची हमी देणारा हा कथासंग्रह प्रत्येक रसिकाच्या संग्रहात असायलाच हवा.




# तुकाराम

लेखक : शफी पठाण

**११४ पाने I २५० रुपये**

'तुकाराम' हे पुस्तक केवळ एका अधिकाऱ्याचे चरित्र नाही, तर मूल्यांवर आधारित नेतृत्वाचा जिवंत दस्तऐवज आहे. कठीण परिस्थितीतही सचोटी कशी जपावी, अन्यायासमोर न झुकता लोकहिताला प्राधान्य कसे द्यावे आणि प्रामाणिकपणाची किंमत मोजण्याची तयारी कशी ठेवावी, याचे प्रभावी दर्शन या पुस्तकातून घडते.

या पुस्तकातील प्रत्येक प्रसंग वाचकाला विचार करायला भाग पाडतो. यश म्हणजे केवळ पद किंवा प्रसिद्धी नसून, आपल्या तत्त्वांवर ठाम राहून समाजासाठी काम करणे हेच खरे यश आहे, हा संदेश हे पुस्तक प्रभावीपणे देते. स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, प्रशासकीय सेवेत जाण्याची इच्छा असलेले तरुण, सरकारी अधिकारी तसेच प्रेरणादायी साहित्य वाचणाऱ्या प्रत्येकासाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त आहे.

संघर्ष, बदली, विरोध आणि जनहितासाठीचा अखंड लढा यांची प्रेरणादायी कहाणी उलगडणारे हे पुस्तक प्रत्येकाने एकदा तरी वाचावे.